मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आश्विन - मार्गशीर्ष, 1924

ऑक्टोबर - डिसेंबर, 2002 / खंड 26, अंक 3

- केन्सोत्तर अर्थशास्त्र
- अर्थशास्त्राचे भवितव्य काय? कालौघात हे शास्त्र मृत्यू पावले आहे काय?
- जोसेफ स्टिगलिट्झ यांचे माहिती अर्थशास्त्र
- नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक प्रभाव : काही निरीक्षणे
- आर्थिक सुधारणांचे पहिले दशक आणि लघु उद्योगांचा विकास
- जागतिकीकरणाचा अविकसीत देशांच्या जीवनशैलीवरील प्रभाव
- वनसृष्टी व्यवस्थापन : स्थानिक संस्थांची भूमिका
- अर्थ शब्दांची वाट पाहे





लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः॥

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

ऑक्टोबर - डिसेंबर, 2002 / खंड 26, अंक 3

प्रमुख संपादक
विनायक श्रीधर देशपांडे

सहायक संपादक
रवीन्द्र शंकर जोशी

सल्लागार मंडळ
(2000-03)
माधव दातार
सुहास सहस्रबुद्धे
मुक्ता जहागिरदार
सर्जेराव ठोंबरे

संपादकीय पत्रव्यवहार
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48, विद्या -विहार
प्रताप नगर, नागपूर 440 022
दूरध्वनी क्र. (0712) 2237042

## अनुक्रमणिका

- केन्सोत्तर अर्थशास्त्र ( उत्तरार्ध ) / शरद शंकर जोशी — 199
- अर्थशास्त्राचे भवितव्य काय? / नी. वि. सोवनी — 216
- जोसेफ स्टिगलिट्झ यांचे माहिती अर्थशास्त्र / माधव दातार — 219
- नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक प्रभाव : / सर्जेराव साळुंखे — 236
- आर्थिक सुधारणांचे पहिले दशक आणि लघु उद्योगांचा विकास / भागचंद खुरुद — 245
- जागतिकीकरणाचा अविकसीत देशांच्या जीवन शैलीवरील प्रभाव / श्री. आ. देशपांडे — 256
- वनसृष्टी व्यवस्थापन : स्थानिक संस्थांची भूमिका / अर्चना घटे, विनायक देशपांडे, किशोर महाबळ — 264
- अर्थ शब्दांची वाट पाहे / शि. ना.माने — 276
- भारताचा विदेशी चलन निधी : एक टिपण / श्री. पं. खेर — 279
- ग्रंथ परीक्षण / रमाकांत पितळे — 284
- विदर्भ अर्थशास्त्र शिक्षक परिषद वृतान्त / आर. जी. टाले — 287
- दृष्टीक्षेपात भारत / अरूणा सोनेगावकर — 289
- परिषदेच्या हिशेबा संबंधी निवेदन / सर्जेराव ठोंबरे — 292
- अर्थशास्त्रज्ञ ब्रम्हानंद : श्रद्धांजली / विनायक देशपांडे — 293

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ (2002-2003)


* अध्यक्ष

**संतोष दास्ताने**

* कार्याध्यक्ष

**व्यं. सु. पाटणकर**

* कार्यवाह - खजिनदार

**सर्जेराव ठोंबरे**

* प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

**विनायक श्रीधर देशपांडे**

* सदस्य

**शरणाप्पा मानकरी**
**गोविंद हडप**
**कैलास पाटील**
**दिलीप कदम**
**जनार्दन जाधव**
**कांतीलाल ठक्कर**
**चारूदत्त गोखले**
**विजय कांत**
**कुंदा दामले**
**मेधा देशपांडे**
**अमृत पोळ**
**कपूरचंद पोकरना**



* अर्थसंवादसाठी अनुदानाबद्धल आभार :

1) पश्चिम विभागीय केन्द्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद , मुंबई.

2) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.


(टीप: म.रा.सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

* कार्यालयीन पत्रव्यवहार

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, अर्थसंवाद वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी)


**डॉ. सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केन्द्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद - 431001

(दूरध्वनी : 0240 - 380702)


* परिषदेचे प्रमुख कार्यालय


मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम. एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस, फ्लॅट क्र.6 'एफ ब्लॉक', कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.


## । वर्गणी ।

(अ) परिषदेचे सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1) आजीव सदस्य | : | रु. 800 (एकरकमी) |
| 2) साधारण सदस्य | : | रु. 150 (वार्षिक) |
| 3) संस्था सदस्य | : | |
| शैक्षणिक संस्था | : | रु. 150 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : | रु. 200 (वार्षिक) |

(परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)

(आ) अर्थसंवाद वर्गणीदार

| | | |
|---|---|---|
| ग्रंथालये | : | रु. 150 (वार्षिक) |

(इ) वर्षगणना : 1 एप्रिल ते 31 मार्च

कृपया वर्गणी मनीऑर्डर वा डिमांड ड्राफ्टने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.

# केन्सोत्तर अर्थशास्त्र

(उत्तरार्ध)

● शरद शंकर जोशी

*भूतपूर्व प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,*
*सर परशुरामभाऊ महाविद्यालय पुणे*

## 11. गुंतवणूक :

उपभोग आणि गुंतवणूक हे राष्ट्रीय उत्पन्नाचे दोन घटक असतात. स्वेच्छाधीन खर्च म्हणजे गुंतवणूक. हा घटक एकूण आर्थिक व्यवहारांची पातळी ठरविणारा मुख्य घटक ठरतो. अर्थव्यवस्थेत घडून येणारे विभाजनात्मक बदल अभ्यासताना स्वेच्छाधीन खर्चाची म्हणजेच गुंतवणुकीची भूमिका लक्षात घ्यावी लागते. यातून असे ध्वनित होते की स्वेच्छाधीन खर्चाची भूमिका ठरविताना राष्ट्रीय उत्पन्नातील आपला सापेक्ष हिस्सा भांडवलदार स्वतःच ठरवितात. सर्वसाधारणपणे भांडवलदार जितकी जास्त गुंतवणूक करतात आणि जितका जास्त उपभोग घेतात तेवढा एकूण उत्पादनातील त्यांचा हिस्सा अधिक राहातो. भांडवलदार, किती अधिक उत्पन्न मिळावावयाचे ते ठरवू शकत नाहीत; किती अधिक गुंतवणूक करावयाची एवढेच ते ठरवू शकतात. कामगारांना जी उत्पन्नप्राप्ती होत असते त्यातून ते खर्च करीत असतात; भांडवलदार मात्र जो खर्च करतात त्यातून त्यांना प्राप्ती होत असते. केन्सोत्तर अर्थशास्त्रज्ञांनी कॅलेकीच्या या सारगर्भ विचाराचा धागा पकडून विश्लेषण पुढे नेले. स्वेच्छाधीन खर्च आणि त्यातील बदलाचा दर ठरविण्याच्या प्रश्नाची उकल करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कॅलेकीच्या मते नवीन भांडवली साधनसामग्रीवरील खर्चाची पातळी मागील नफ्यावर अवलंबून राहाते; कॅलेकीने मांडलेले प्रतिमान केन्सोत्तर अर्थवेत्यांच्या दृष्टीने दिग्दर्शक व पथदर्शक ठरले आहे. म्हणून कॅलेकीचा [20] उल्लेख येथे अग्रक्रमाने करावयास हवा.

मागील नफा (किंवा संयोजकांच्या अपेक्षा) गुंतवणूक ठरविणारा एकमेव घटक मानता येत नाही. त्याचप्रमाणे एकूण गुंतवणूक ही उत्पादनसंस्थांनी भांडवली साधन सामग्रीवर केलेल्या खर्चापुरती मर्यादित असते असेही नाही. निगम क्षेत्राप्रमाणे (संयोजकांप्रमाणे) स्वेच्छाधीन खर्च (गुंतवणूक खर्च) घरगुती क्षेत्र तसेच शासकीय क्षेत्र ही क्षेत्रे देखील करू शकतात.[21] अशा रीतीने विविध क्षेत्रातील स्वेच्छाधीन खर्च (गुंतवणूक) ठरविणारे घटक कोणते याच्या विश्लेषणाकडे वळावे लागते. घरगुती क्षेत्र टिकाऊ सेवनीय वस्तूंवर खर्च करते; तर शासन

सार्वजनिक आणि त्यासारख्या वस्तूंवर खर्च करते. अशा प्रकारचा खर्च कोणत्या घटकांवर अवलंबून राहातो याचा शोध घेऊन उपरोक्त मर्यादित अर्थाने गुंतवणूक (स्वेच्छाधीन खर्च) ठरविणाऱ्या घटकांसंबंधीच्या विश्लेषणाशी समन्वय घातला गेला पाहिजे. त्यातून अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांच्या दृष्टीने एकूण सर्व गुंतवणूकीची (स्वेच्छाधीन खर्चाची)कारणमीमांसा करणे जरुरीचे ठरते.

कॅलेकीने केलेले व्यष्टीय आर्थिक विश्लेषण आर्थिक गतिकीच्या समष्टीय तत्त्वाचा आधार ठरते. एकूण आर्थिक व्यवहार, रोजगार, उत्पन्नवाटप इत्यादिंवर मक्तेदारीच्या प्रमाणातील बदलाचा परिणाम होत असतो. हा परिणाम अभ्यासण्यासाठी कॅलेकीने व्यष्टीय आर्थिक विश्लेषणाचा आधार घेतला. एकूण गुंतवणुकीचे परिमाण दिलेले असताना सर्व उत्पादन संस्थांच्या बाबतीत मक्तेदारी प्रमाण स्थिर राहिल्यास पैशातील मजुरी दरात होणाऱ्या बदलांमुळे कामगार आणि भांडवलदार यांच्यातील उत्पन्न-वाटप, कामगारांचे वास्तव वेतन तसेच एकूण आर्थिक व्यवहारांची पातळी इत्यादींवर परिणाम घडून येणार नाही. पैशातील मजुरीदरात वाढ झाल्यास पैशातील किंमतीत वाढ घडून येईल, इतकेच. पैशातील मजुरीदर वाढीचे केवळ प्रतितोलन होण्यासाठी पुरेशी ठरेल, इतकी ती पैशातील किंमतवाढ राहील. याउलट, एकूण गुंतवणुकीचे परिमाण दिलेले असताना मक्तेदारीच्या प्रमाणातील बदलांमुळे एकूण आर्थिक व्यवहार, वास्तव मजुरी, उत्पन्न-वाटप यांवर परिणाम घडून येईल. पैशातील मजुरीदर वाढले आणि मक्तेदारीचे प्रमाण घटले व अशा रीतीने किंमती स्थिर राहिल्या तर कामगारांची वास्तव मजुरी वाढेल. त्यामुळे वेतन-वस्तूंकरिता (कामगार ज्या सेवनीय वस्तू सर्वसाधारणपणे वापरतात त्या वस्तूंकरिता) मागणी उंचावेल आणि परिणामतः समस्त आर्थिक व्यवहार वाढतील. तांत्रिक बदलांमुळे उत्पादनसंस्थेचा आकार वाढला आणि परिणामत; औद्योगिक संकेंद्रणाचे प्रमाण वाढले तर त्यामुळे मक्तेदारीचे प्रमाण वाढून एकूण आर्थिक व्यवहार, वास्तव मजुरी आणि उत्पन्न-वाटप यांवर नकारात्मक परिणाम घडून येईल.

भांडवलशाहीच्या विकासाविषयी विवेचन करताना कॅलेकीने असे प्रतिपादन केले की अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार पातळी कायम राखणे कठीण होईल. भांडवलदारांकडून येणाऱ्या राजकीय प्रतिक्रियांमुळे आणि निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे अर्थव्यवस्था कुंठितावस्थेकडे खेचली जाईल. बेरोजगारीतील दीर्घकालीन वाढ अटळ ठरेल. याविषयीच्या विवेचनाचा कॅलेकीचा निष्कर्ष असा की पूर्ण रोजगार प्रस्थापित करुन ती पातळी कायम राखली जाण्यासाठी भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत आणि अशा सुधारणांशी जुळवून घेण्याच्या बाबतीत किंवा समायोजन घडवून आणण्याच्या बाबतीत व्यवस्था असमर्थ ठरत असेल तर त्या व्यवस्थेचे पुनः स्थापन केले पाहिजे.[22]

युद्धोत्तर काळात विकसनशील आणि समाजवादी अर्थव्यवस्थांची वैशिष्ट्ये व अशा अर्थव्यवस्थांविषयीचे विश्लेषण कॅलेकीला महत्त्वाचे वाटू लागले. हे विषय हाताळण्यास त्याने सुरुवात केली. सन 1954 मध्ये आर्थिक गतिकीच्या सिद्धान्ताविषयीचे त्याचे लिखाण प्रसिद्ध झाले.[23]

**12. मक्तेदारीचे प्रमाण :**

कॅलेकीच्या व्यष्टीय आर्थिक विश्लेषणातील बदल प्रामुख्याने किंमत निर्धारण आणि मक्तेदारीचे प्रमाण याबाबत आहेत. उत्पादनसंस्था आपल्या वस्तूंच्या किंमती कशा ठरवितात हे विशद करताना त्याने अधिपरिव्यय (मार्क्‌अप्) किंमत निश्चितीच्या पद्धतीचा अवलंब केला नाही; उत्पादनसंस्था, सरासरी प्रत्यक्ष खर्च आणि स्पर्धकांनी

निश्चित केलेल्या किंमती या बाबींचाच विचार करीत असते, असे त्याचे प्रतिपादन होते. पण नंतर (सन 1965 च्या सुमारास) ही भूमिका बदलली; त्यानुसार त्याने नव्याने केलेले किंमतनिश्चितीचे विवेचन म्हणजे अधिपरिव्यय किंमत निर्धारण प्रक्रियेचेच विवेचन आहे.

उत्पादनसंस्था पातळीवरील व्यवहार म्हणजे व्यष्टीय व्यवहार आणि अशा व्यवहारांचे समष्टीय परिणाम यांच्यातील संबंधांचा भाग म्हणून कॅलेकीने मांडलेल्या उद्योग-किंमत समीकरणाचा उल्लेख केला पाहिजे. व्यक्तिगत उत्पादनसंस्थांच्या किमतीतील बदलांचा सरासरी उद्योग किमतीवरील परिणाम आणि परिणामत: संपूर्ण अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासण्याचे एक साधन म्हणून उद्योग किंमत समीकरण महत्त्वाचे ठरते.

उत्पादनसंस्थेचा मागणीवक्र, नफ्याचे कमालीकरण यासारख्या ज्या संकल्पना कॅलेकीने मांडल्या आणि त्याने किंमत निश्चिती विषयक जे विश्लेषण केले त्यातून वेगवेगळे निष्कर्ष काढता येणे शक्य आहे. जोन रॉबिन्सनने केलेले विश्लेषण स्वीकारुन कांहीनी असे म्हटले आहे की मक्तेदारीचे प्रमाण हे मागणीच्या किंमत लवचिकतेवर आधारित असते. अशा प्रकारचे विश्लेषण सीमान्तवादी चौकटीत बसणारे असले तरी मक्तेदारीचे प्रमाण हे मूलभूत (सांख्यिकी) आधारसामग्रीवर आधारित ठेवता येते आणि अशा माहितीचा आधारसामग्रीचा अन्वय बिगर-सीमान्तवादी रीतीने लावता येणे शक्य असतो. या विवेचनातून निघणारा निष्कर्ष असा की कॅलेकीचे उपरोक्तविश्लेषण आणि त्यांचा वेगवेगळया प्रकारे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न लक्षात घेता कॅलेकीचे व्यष्टीय विश्लेषण नवअभिमत परंपरेत किंवा पर्यायाने त्या चौकटीत न बसणाऱ्या पद्धतीने देखील विकसित करता येते.

हे विश्लेषण नवअभिमत परंपरेत विकसित करताना असे प्रतिपादन केले जाते की उत्पादनसंस्था नफ्याचे कमालीकरण करण्याच्या उद्देशाने किंमत ठरवितात, आणि मक्तेदारीचे प्रमाण व स्थूल नफा या गोष्टी एकूण विक्रीतील हिस्सा आणि संगनमत याबरोबरच मागणीच्या किंमत-लवचिकतेने ठरतात.[24]

तथापि, आर्थिक गतिकीच्या सिद्धान्ताचे विवेचन करताना मक्तेदारीच्या प्रमाणाचे किंमत लवचिकतेवर आधारित स्पष्टीकरण आणि नफा-कमालीकरणाचे गृहीत या गोष्टी कॅलेकीने वगळल्या होत्या, हे लक्षात घेतले पाहिजे. या संदर्भात काल्डर याने असा युक्तिवाद मांडला आहे की आर्थिक गतिकीच्या सिद्धान्तात कॅलेकीने मक्तेदारीचे प्रमाण व मागणीची किंमत लवचिकता यातील संबंधाला स्थान दिलेले नाही; मक्तेदारीचे प्रमाण म्हणजे किंमत आणि सरासरी प्रत्यक्ष खर्च याचे गुणोत्तर होय, असे म्हटले आहे, त्याच धर्तीवर पॉल डेव्हिडसन[25] याने युक्तिवाद केला आहे. त्यांच्या मते कॅलेकीने आर्थिक गतिकीचा सिद्धान्त मांडला तेव्हाच सीमान्तवादाचा त्याग केला.

मक्तेदारीचे प्रमाण हा विषय अनेक अर्थशास्त्रज्ञांनी हाताळला त्यापैकी पीटर रिअॅच्[26] या अभ्यासकाचा विशेष उल्लेख केला पाहिजे. त्याने केलेले मक्तेदारी प्रमाणाचे विश्लेषण अत्यंत महत्त्वाचे ठरते ते यासाठी की त्या विश्लेषणामुळे कॅलेकीच्या विश्लेषणाचा वेगळया रीतीने अन्वय लावणें शक्य आहे. किंमत आणि सरासरी प्रत्यक्ष खर्च यातील संबंध कॅलेकीच्या विश्लेषणात अंतर्भूत आहे. हा संबंध अल्पकालीन असीमान्तवादी स्वरुपाचा मानता येईल. रिअॅच् याच्या मते कॅलेकीची 'मक्तेदारी प्रमाण' ही संकल्पना बाजार-संकेंद्रण, विक्री-वाढ अप्रत्यक्ष खर्चाचे प्रत्यक्ष खर्चाशी गुणोत्तर, कामगार-संघ यासारख्या अधिक मूलभूत, स्वतंत्र व दीर्घकालीन आर्थिक घटकांवर आधारित आहे. कॅलेकीची

मांडणी म्हणजे असीमान्तवादी स्पष्टीकरण असून ती मांडणी अनुभवनिष्ठ रीतीने तपासता येण्यासारखी आहे. रिअॅच् चा हा युक्तिवाद अनेक अभ्यासकांनी[27] मान्य केला आहे. म्हणूनच मक्तेदारीच्या प्रमाणाचे अ-सीमान्तवादी स्पष्टीकरण स्वीकारण्यात आले असून अधिपरिव्यय (मार्क्अप्) किंमत सिद्धान्ताचा तो एक घटक असल्याचे सन 1980 च्या दरम्यान मान्य करण्यात आले.

केन्सच्या अर्थशास्त्राचा भर प्रामुख्याने अल्पकालखंडावर होता. केन्सचा सामान्य सिद्धांताचे दीर्घकाल खंडाच्या संदर्भात सामान्यीकरण करण्याचा प्रयत्न जोन रॉबिन्सनने केला. यात केन्स आणि कॅलेकी यांच्या विचारांचे विश्लेषण अंतर्भूत आहे. जोन रॉबिन्सनचे आर्थिक वृद्धिविषयक विश्लेषण अंशत: केन्स-कॅलेकीच्या दृष्टिकोनावर आधारित आहे. गुंतवणुकीसाठी नफ्याची जरुरी असते. हा नफा गुंतवणुकीतून निर्माण केला जातो. त्यामुळे गुंतवणुकीविषयक निर्णय नफा-संचयाशी निगडित असतात. म्हणूनच आर्थिक वृद्धिदरावर परिणाम करणारा एक घटक या दृष्टिने जोन रॉबिन्सनने नफ्यावर(निव्वळ नफ्यावर) भर दिला. जोन रॉबिन्सनने असे प्रतिपादन केले की नफ्याचे सरासरी प्रत्यक्ष खर्चाशी जे गुणोत्तर असते त्या गुणोत्तराने मक्तेदारी-प्रमाणाचे मापन करण्यात येते; परंतु मक्तेदारीचे प्रमाण मागणीच्या किंमत-लवचिकतेने ठरते, असे प्रतिपादन नाही.

### 13. किंमत, नफा, गुंतवणूक :

वृद्धीसाठी आवश्यक असणारा नफा आणि उत्पादनसंस्थेकडून निश्चित केली जाणारी किंमत या दोहोमध्ये संबंध प्रस्थापित करणे जोन रॉबिन्सनला शक्य झाले नाही. ज्या उत्पादनसंस्थांकडे किंमत-नेतृत्व असते अशा संस्था वस्तूंच्या किंमती ठरविताना गुंतवणूक-प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या नफ्याच्या दृष्टिनेच किंमतीत किती नफा अगोदरच हिशेबात धरावयाचा हे विचारात घेत असतात. तथापि, नफ्याचे प्रमाण गुंतवणुकीची उघडपणे निगडित केलेले दिसते, ते आयशनर, क्रेगेल, हॅमोडा[28] यांच्या लेखनात.

उत्पादनसंस्थेची मालकी, उत्पादन संस्थेचे नियंत्रण, तिची प्रेरणा, प्रशासित किंमती, पूर्ण परिव्यय किंमतनिश्चिती आणि आर्थिकवृद्धी इत्यादी विषयांचा उहापोह करण्याकडे अर्थशास्त्रज्ञांचा एकोणीसशे साठ काळात कल होता. वृद्धितत्त्वाच्या बाबतीत रॉबिन्सन आणि कॅल्डार यांनी विशिष्ट दृष्टिकोन विकसित केला. यांच्याखेरीज अनेकांनी, अधिपरिव्यय किंमतनिश्चिती आणि गुंतवणूक यांच्या संबंधांविषयी लेखन केले. किंमत, नफा व गुंतवणूक यातील संबंधविषयक प्रश्नांची त्यांना जाण होती. या संदर्भात जेम्स बॉल्ने केलेल्या विश्लेषणाचा उल्लेख करता येईल. वस्तूची किंमत ठरविण्यासाठी उत्पादनसंस्था अधिपरिव्यय किंमत निश्चिती प्रक्रियेचा अवलंब करतात. त्या तत्त्वानुसार ठरविल्या जाणाऱ्या किंमती बाजारात प्रत्यक्षात कार्यवाहीत आणल्या जातात आणि निदान अल्पकाळापुरत्या त्या किंमती स्थिर ठेवल्या जातात, हे त्याने मान्य केले. त्याचबरोबर, अल्पकालीन कमाल नफ्यापेक्षाही विक्रीनगसंख्येतील दीर्घकालीन वाढीत उत्पादनसंस्थांना स्वारस्य असते, हेही त्याने मान्य केले. विक्रीत वाढ घडवून आणावयाची असेल तर स्थिर भांडवलवाढीसाठी गुंतवणूक आवश्यक असते. म्हणूनच किंमत आणि गुंतवणूक विषयक निर्णय यांच्यातील संबंध अत्यंत महत्वाचा ठरतो, असा त्याचा युक्तिवाद होता. विक्रीतील वाढीबद्दल ज्या दीर्घकालीन अपेक्षा लक्षात घेऊन त्या अपेक्षांबरोबरच किंमतविषयक धोरणे आणि गुंतवणूक विषयक योजना निश्चित केल्या जात असल्यामुळे विक्रीतील अल्पकालीन बदल संबंधित उत्पादनसंस्थेला आपल्या वस्तूंची किंमत किंवा

संस्थेच्या गुंतवणूक योजना बदलण्यास प्रेरित करणार नाहीत. परिणामत: अल्पकालीन किमती स्थिर राहात असून त्या किमती बाजार-निरसन न करणाऱ्या असल्याचे आढळून येते.

आर्थिक वृद्धिविषयी जोन रॉबिन्सनने केलेल्या लिखाणामुळे अधिपरिव्यय किंमती आणि गुंतवणूक यांच्यातील संबंधाविषयीचा एक विशिष्ट दृष्टिकोन पुढे आला. कॅल्डारचे आर्थिक वृद्धीविषयक विश्लेषण देखील अशाच प्रकारे प्रेरक ठरते. तथापि, कॅल्डारप्रणीत दृष्टिकोन वेगळा आहे. रॉबिन्सन प्रणीत दृष्टिकोनाचा पाठपुरावा असिमाकोप्युलास याने केला तर कॅल्डारप्रणीत दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व क्रेग्रल, हारकोर्ट, आयशनर आदींनी केले.

जोन रॉबिन्सनने आर्थिक वृद्धीचे जे विश्लेषण केले त्याची नवी मांडणी असिमाकोप्युलास याने केली. त्याचे प्रतिपादन असे की, उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष श्रम अंतर्भूत असतात. त्यामुळे प्रामुख्याने श्रमावर आधारित किंमतनिश्चिती प्रक्रिया अवलंबविण्यात येते. सर्व संयंत्रे स्थापितक्षमतेचा पूर्ण वापर करीत असतील तर नफा मिळविण्याच्या दृष्टीने किंमत ठरविताना खर्चाव्यतिरिक्त भरुन काढावयाचा नफ्याचा भाग (खर्चावर लावावयाचा नफा) काटकसरीपणा आणि गुंतवणूक-दर यावर अवलंबून राहातो (असे त्याने दाखवून दिले). याउलट, स्थापितक्षमता पूर्णतया वापरात आणली गेली नसेल तर (नफा मिळविण्याच्या दृष्टिने) खर्चावर लावावयाचा नफ्याचा भाग मक्तेदारीच्या (विद्यमान) प्रमाणाने निश्चित होतो. स्थापितक्षमता नेहमीच्या प्रमाणात वापरली जात असताना, सर्वसाधारणपणे जो (रुढीगत) नफा-दर असतो त्या दराशी तो (खर्चावर लावावयाचा) भाग निगडीत असतो, असे असिमाकोप्युलास याने दाखवून दिले. आपल्या गुंतवणूक योजना आखताना उत्पादनसंस्था काही एक उत्पन्नदराचे लक्ष्य निश्चित करते. वस्तूची किंमत ठरविताना खर्चावर किती नफा लावावयाचा हे त्या उत्पन्नदरावर अवलंबून असते. याचा परिणाम असा की औद्योगिक संकेंद्रणामुळे मक्तेदारीच्या प्रमाणात होणाऱ्या वाढीमुळे खर्चावर लावावयाचा नफा वाढत राहील. त्यामुळे उत्पादनसंस्थेला प्रत्यक्षात मिळू शकणारा उत्पन्नदर वाढेल. प्रत्यक्षातील उच्चतर उत्पन्न-दरामुळे लक्ष्य-दर वाढविण्यास उत्पादनसंस्थेला प्रेरणा मिळेल; कार्यवाहीत आणावयाच्या गुंतवणूक प्रकल्पांची संख्या वाढेल. थोडक्यात, उत्पन्नाचा लक्ष्य-दर खर्चावर लावावयाच्या नफ्याच्या दराशी आणि अशा रीतीने किंमतीशी निगडीत करुन उत्पादनसंस्थेला आपल्या गुंतवणूक-योजनांकरिताआवश्यक असलेल्या वित्तपुरवठ्यासाठी नफा मिळविणे शक्य होईल.

वस्तूंची किंमत निश्चित करताना नफा म्हणून खर्चात मिळवावयाची रक्कम आणि गुंतवणुकीचे निर्णय यांमध्ये संबंध प्रस्थापित करणाऱ्यांपैकी क्रेगेलेचे[29] योगदान महत्त्वाचे आहे. त्याच्या मते उत्पादनसंस्थेच्या मक्तेदारीच्या प्रमाणातील वाढीमुळे किंमतीत आणि स्थूल नफ्यात वाढ होते. लाभांश आणि अवितरित नफा या दोन घटकांमध्ये नफ्याचे वाटप करता येणे किंवा त्या वाटपाच्या बाबतीत आवश्यक ते समायोजन घडवून आणणे उत्पादनसंस्थेला शक्य असते. उत्पादनसंस्था आपल्या गुंतवणूक-योजनांकरिता वित्तपुरवठ्यासाठी अवितरित नफा वापरते. गुंतवणूकविषयक निर्णय आणि नफ्याचे दर यांच्यातील रॉबिन्सनप्रणीत संबंध गृहीत धरुन क्रेगेलने असे सुचविले आहे की, उत्पादनसंस्थेच्या मक्तेदारी प्रमाणात वाढ झाल्यास, गुंतवणूक-योजनांकरिता ज्यायोगे वित्तपुरवठा करता येईल अशा रीतीने अवितरित नफा वाढविण्याच्या दृष्टिने ती संस्था लाभांश वाढवू शकते. त्याचप्रमाणे किंमतीत समाविष्ट करावयाचा नफा वाढवू शकते.

परंतु वस्तूची किंमत निश्चित करताना खर्चात अंतर्भूत करावयाच्या नफ्याच्या रकमेतील वाढीमुळे उत्पादनसंस्थेला मिळू शकणाऱ्या नफ्याचे प्रमाण वाढते; आणि त्यामुळे गुंतवणूकीचा दर वाढविण्यास प्रेरणा मिळते. किंमत-निश्चिती करताना खर्चात समाविष्ट करावयाची नफ्याची रक्कम, उत्पादनसंस्थेला मिळणाऱ्या नफ्याचा दर, अवितरित नफा आणि गुंतवणूक-विषयीचे निर्णय यांच्यातील संबंध तसेच परस्पर क्रिया व प्रतिक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. गुंतवणूकविषयक निर्णय, नियोजित गुंतवणूक प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा आणि किंमतनिश्चिती करताना खर्चात समाविष्ट करावयाचा नफा यांच्यातील नेमका संबंध स्पष्ट करता आला तर ते विश्लेषण खचितच अधिक महत्त्वाचे ठरेल.

केन्सोत्तर अर्थशास्त्रविषयक ग्रंथात क्रेगेलने असा युक्तिवाद मांडला आहे की स्थापितक्षमता-वापराचा प्रत्यक्षातील दर हा (सर्वसाधारण) लक्ष्य-दराच्या जवळपास राहील. या दृष्टीने उत्पादनसंस्थेचा प्रयत्न सुरु असतो. म्हणूनच प्रत्यक्षातील दर सर्वसाधारण दरापेक्षा बराच अधिक राहील, अशी अपेक्षा असते तेव्हा तो असमतोल दूर करण्याच्या दृष्टिने उत्पादनसंस्था योजनांची आखणी व कार्यवाही करते. गुंतवणूक-प्रकल्पांकरिता पुरेसा वित्तपुरवठा होण्याच्या दृष्टिने आवश्यक तेवढा नफा मिळविण्यासाठी वस्तूची किंमत ठरविताना वस्तूच्या उत्पादन खर्चावर नफा किती लावावयाचा (म्हणजेच, नफा म्हणून किती रक्कम खर्चात मिळवावयाची) हे उत्पादनसंस्था ठरविते. अशा रीतीने, उत्पादनसंस्थेच्या अपेक्षा आणि किफायतशीर मानला जाणारा गुंतवणूकदर यांच्याशी, पूर्वनिश्चित नफा व वस्तूची किंमत हे घटक निगडीत असतात. वस्तूच्या किंमत-निर्धारणाविषयीचे हे तंत्र म्हणजे गुंतवणूकविषयक निर्णयांशी निगडीत असलेले तंत्र म्हणता येईल. यातून असे ध्वनित होते की विक्रीतील (मागणीतील) अल्पकालीन बदलांचे समायोजन स्थापितक्षमतेच्या प्रत्यक्ष वापरातील बदलाच्या साहाय्याने केले जाते, किंमतीतील किंवा गुंतवणूकविषयक योजनांमधील बदलांनी घडवून आणले जात नाही.

पूर्वनिश्चित नफा गुंतवणूकविषयक निर्णयांशी निगडीत करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये हारकोर्टचाही[30] उल्लेख केला पाहिजे. त्याचा हा प्रयत्न कॅल्डारप्रणीत विश्लेषणाच्या धर्तीवर आहे. कॅल्डारची धारणा अशी होती की वस्तूची किंमत ठरविण्यासाठी उत्पादनखर्चात मिळवावयाचा (रुढ) अल्पकालीन पूर्वनिश्चित नफा सरतेशेवटी दीर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता व बचत-प्रवृत्ती या घटकांवर अवलंबून राहातो आणि म्हणूनच हे घटक अल्पकालीन किंमतपातळी व त्या किंमतीतील बदलांच्या दरावर परिणाम घडवून आणतात. हारकोर्ट याने मांडलेले युक्तिवाद व सैद्धान्तिक चर्चा कॅल्डारच्या या धारणेला पुष्टी देणारी आणि त्याचे प्रतिपादन संयुक्तिक ठरविणारी होती. थोडक्यात, उपरोक्त पूर्वनिश्चित अल्पकालीन नफा ठरविला जाण्याच्या बाबतीत मागणीच्या अल्पकालीन किंमत-लवचिकतेला स्थान का नसते[31] हे स्पष्ट होते.

क्रेगेल आणि हारकोर्ट यांनी केलेल्या विश्लेषणातून असे सूचित होते की, वित्तीय साधनसामग्रीच्या उपलब्धतेमुळे गुंतवणूकविषयक योजना कार्यवाहीत आणता येणे शक्य होते. हा वित्तपुरवठा अवितरित नफा, कर्जे आणि नव्या भागभांडवलाची विक्री या मार्गांनी उपलब्ध होउ शकतो. याचा अर्थ असा की भांडवलदार आणि कामगार यांची बचतप्रवृत्ती ही गुंतवणुकीवरील निर्णायक मर्यादा ठरु शकत नाही; क्रेगेल आणि हारकोर्ट यांचा हा दृष्टिकोन, गुंतवणुकीवरील मर्यादा स्पष्ट करणारा घटक या दृष्टीने, बचतप्रवृत्तीचे महत्त्व कमी लेखणारा ठरतो. वस्तूची किंमत निश्चित करताना

उत्पादनखर्चात समाविष्ट करावयाचा पूर्वनिश्चित नफा ठरविला जाण्याच्या प्रक्रियेत वित्तपुरवठ्याची भूमिका विचारात घेण्यास कॅल्डारने सुरुवात केली. उत्पादनसंस्थेचा दीर्घकालीन (पूर्वनिश्चित) नफा कसा ठरतो याविषयीचे विश्लेषण विकसित करण्याचा प्रयत्न वुड्[32] याने केला. उत्पादनसंस्थेच्या गुंतवणूकविषयक निर्णयांशी वित्तपुरवठ्याचा संबंध जोडून नफ्याच्या स्पष्टीकरणात या दोन घटकांचा एकत्रित विचार करणे कसे जरुरीचे ठरते, हे त्याने दाखवून दिले. नफ्याचे परिमाण स्पष्ट करण्यासाठी त्याने वित्तपुरवठा आणि गुंतवणूकविषयक निर्णय हे दोन घटक एकत्र आणले.

**14. अल्पजनाधिकार बाजारातील किंमत-निश्चितीची प्रक्रिया :**

केन्सोत्तर अर्थशास्त्राविषयी लिहिताना आयशनरचा उल्लेख अत्यावश्यक ठरतो. आपल्या संशोधन-विषयाच्या संदर्भात त्याने जोन रॉबिन्सनशी सन 1969 च्या सुमारास विचारविनिमय सुरु केला तेव्हापासून अमेरिकेत केन्सोत्तर अर्थशास्त्र विकसित होऊ लागले.

उत्पादनविषयक परिस्थिती आणि स्पर्धेचे स्वरुप या गोष्टी काळाच्या ओघात बदलतात. पूर्ण स्पर्धेच्या प्रतिमानाशी जुळणारी परिस्थिती व बाजारपेठेची वैशिष्टचे पूर्वी आढळत असत. तथापि, विसाव्या शतकात अमेरिकेसारख्या देशात मोठ्या उत्पादनसंस्था स्थापन होऊ लागल्या आणि विलिनीकरणाची मोहिम सुरु झाली. त्यामुळे बाजारपेठेतील परिस्थिती बरीच बदलू लागली. नवअभिमत आर्थिक सिद्धान्तात पूर्ण स्पर्धेला जे महत्व दिले गेले ते प्रत्यक्षातील बदललेली परिस्थिती पाहाता अयोग्य व अनाठायी ठरते. विसाव्या शतकात अमेरिकी अर्थव्यवस्थेत (आणि परिणामत: अन्य देशातही) निगम निकाय (मोठ्या उत्पादनसंस्था किंवा कंपन्या) प्रभावी ठरु लागल्या. अशा निगम अर्थव्यवस्थेची (मोठ्या कंपन्यांच्या प्रभावाखालील अर्थव्यवस्थेची) दीर्घकालीन वृद्धी स्पष्ट करण्याच्या बाबतीत नवअभिमत सिद्धान्त गैरलागू ठरु लागले. म्हणून निगम अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्टचे लक्षात घेऊन त्यानुसार समष्टीय अर्थशास्त्राची फेरमांडणी करण्याच्या दिशेने प्रयत्न व्हावे, असे आयशनर आदींना वाटू लागले.

आयशनरच्या प्रयत्नांमागे त्याची नैतिक मूल्ये व सामाजिक जीवनाविषयीची काळजी होती. पारंपरिक अर्थशास्त्राबद्दल नापसंती व्यक्त करताना सनातनपंथीय आर्थिक विश्लेषण अर्थव्यवस्थेच्या कार्यंयंत्रणेविषयी कशी चुकीची समजूत करुन घेते हे त्याने दाखवून दिले. अर्थात अशा चुकीच्या आकलनामुळेच शासनाच्या आर्थिक धोरणाची आखणी चुकीच्या दिशेने होत राहाते. भाववाढी चा अतिरेक आटोक्यात आणण्यासाठी देशातील बेरोजगारीत वाढ होऊ देण्याचे धोरण अवलंबिले जाणे ही गोष्ट आयशनरला खटकते. त्याने केलेल्या सैद्धान्तिक मांडणीत सामाजिक व नैतिक मूल्यांविषयीची त्याची तळमळ स्पष्टपणे दिसते.

व्यष्टीय अर्थशास्त्राची आयशनरने जी सुधारित मांडणी केली त्यामध्ये अल्पजनाधिकार या बाजारसंरचनेला, मोठ्या कंपन्यांसंबंधीच्या विश्लेषणाला महत्त्वाचे स्थान होते. विसाव्या शतकाच्या मध्याला अमेरिकी अर्थव्यवस्थेत अल्पजनाधिकार बाजारसंरचनेची विशेष वाढ होऊ लागली. अल्पजनाधिकार आणि मोठ्या कंपन्यांचे अस्तित्व कारखानदारी क्षेत्रात प्रकर्षाने जाणवू लागले. कारखानदारी उद्योग कच्च्या मालासाठी प्राथमिक उद्योगांवर आणि पक्क्या मालाच्या विक्रीसाठी तृतीय क्षेत्रावरही अवलंबून राहिल्याने अमेरिकी अर्थव्यवस्था मोठ्या कंपन्यांच्या प्रभावाखाली आल्याचे स्पष्ट होऊ

लागले. कार्यक्षमतापातळी, किंमती, उत्पन्नवाटप, साधनसामग्रीचे विविध उद्योगांमधील वाटप, आर्थिक वृद्धी इत्यादी अनेक बाबतीत अल्पजनाधिकार आणि मोठ्या कंपन्यांचा प्रभाव नंतर वाढतच राहिला. म्हणूनच मोठ्या कंपन्यांच्या वैशिष्ट्यांवर आधारित अल्पजनाधिकारा विषयीच्या अनुभवाधिष्ठित सिद्धान्ताची आवश्यकता भासू लागली.

वस्तूची किंमत ठरविताना उत्पादनखर्चाबरोबरच अपेक्षित नफा म्हणून किती रक्कम लावावयाची हे स्पष्ट करण्याचा आयशनरने प्रयत्न केला. अपेक्षित नफ्यासाठी त्याने सरासरी निगम लेव्ही ही संज्ञा वापरली. या लेव्हीमुळे उत्पादनसंस्थेला मिळणाऱ्या वित्तीय साधनसामग्रीतून गुंतवणूक वाढविता येते. अशा रीतीने किंमतनिश्चितीविषयक निर्णय गुंतवणूकविषयक नियोजनाशी निगडीत केले जातात. त्याच्या मते जादा गुंतवणूकीसाठी आवश्यक असणाऱ्या वित्तीय साधनसामग्रीसाठी जी मागणी असते त्यावर सरासरी निगम लेव्हीतील बदल अवलंबून असतो. कंपनीचा गुंतवणूकविषयक निर्णय मागील काळात वस्तूच्या विक्रीत घडून आलेल्या बदलांवर अवलंबून असतो.

अशा रीतीने अल्पजनाधिकारी बाजारातील किंमतनिश्चितीची प्रक्रिया आयशनर याने विकसित केली. यामध्ये परिव्ययजन्य किंमत निश्चिती प्रक्रिया महत्त्वाची ठरते, तसेच यामध्ये समाविष्ट असणारा दुसरा घटक - पूर्वनिश्चित नफ्याचे संयुक्तिक स्पष्टीकरण-देखील महत्त्वपूर्ण होय. पूर्वनिश्चित नफ्यामुळे उत्पादनसंस्थेला अवितरित नफा म्हणून मोठ्या रकमा मिळणे शक्य होते. पूर्वनिश्चित नफा स्पष्ट करताना आयशनर याने त्या नफ्याचा गुंतवणूक विषयक नियोजनाशी संबंध जोडला त्यामुळे अशा स्पष्टीकरणातून गुंतवणुकविषयक नियोजन किंमतविषयक निर्णय आणि वित्तपुरवठ्याविषयीचे निर्णय हे एकमेकांशी कसे निगडीत असतात, हे लक्षात येते.

आयशनरच्या मते उत्पादनसंस्थेचा गुंतवणुकविषयक निर्णय वर म्हटल्याप्रमाणे विक्रीतील बदलांवर अवलंबून असतो. गुंतवणूक-वाढीसाठी लागणारी वित्तीय साधनसामग्री वस्तूच्या किमतीत समाविष्ट असणाऱ्या सरासरी निगम लेव्हीत बदल करुन मिळविता येते. जोन रॉबिन्सनच्या मते गुंतवणुकीतील बदलाविषयीचे निर्णय उत्पादनसंस्थेला किती नफा मिळेल यावर अवलंबून असतात. उत्पादनसंस्थांचे गुंतवणूकविषयक निर्णय नेमके कोणत्या घटकांवर अवलंबून असतात हा प्रश्न अद्याप विवादित आहे.

**15. व्यष्टीय, समष्टीय उपपत्तींचे संश्लेषण :**

मोठ्या कंपनीला आपल्या गुंतवणूक-योजनांचा काही वेळा विस्तार करावयाचा असतो. त्यासाठी त्या संस्थेला वित्तपुरवठ्याचा मार्ग शोधावा लागतो. अशा वेळी ती उत्पादनसंस्था वस्तुच्या किंमतवाढीकडे वळते. अशा रीतीने आयशनरने किंमतवाढीचा प्रश्न व्यक्तिगत कंपनीच्या दृष्टिकोनातून-व्यष्टीय दृष्टिकोनातून हाताळला. जोन रॉबिन्सनने मात्र या प्रश्नाची चिकित्सा समष्टीय पातळीवर केली. संचयदरातील बदलांच्या अनुसार या प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न केला, एकंदरीत व्यष्टीय-समष्टीय उपपत्तीचे संश्लेषण विकसित करण्याशी प्रस्तुत प्रश्नांचे निराकरण निगडीत झालेले दिसते.

आर्थिक वृद्धीचे तत्त्व, भांडवल-संचय याविषयी रॉबिन्सनने केलेले विश्लेषण वेधक असल्याने आयशनर याने ते चिकित्सक रीतीने अभ्यासले. तथापि, त्याचे मत असे झाले की रॉबिन्सनच्या लिखाणातील समष्टीय गतिक वृद्धिप्रतिमान त्याच्या स्वत:च्या मताजनाधिकार तत्त्वात अनुस्युत आहे.

कॅलेकी-रॉबिन्सन-कॅल्डार यांच्या वृद्धि-प्रतिमानांमध्ये उत्पन्न वाटपाचे विश्लेषण भांडवलदार विरुद्ध कामगार अशा पद्धतीने केलेले आहे. हा वर्गाधिष्ठित दृष्टिकोन आयशनरने केलेल्या विश्लेषणाशी जुळणारा नाही. आयशनरने चित्रित केलेली मोठ्या कंपनीची वैशिष्ट्ये आणि व्यवस्थापन व मालकीहक्क यांचे विभक्तीकरण-अशापद्धतीच्या मांडणीत ती केन्सोत्तर आर्थिक वृद्धि-प्रतिमाने बसत नाहीत.

केन्सोत्तर आर्थिक वृद्धि-प्रतिमानासंबंधीच्या युक्तिवादात किंमती व उत्पादनसंस्था या घटकांची भूमिका गौण स्वरुपाची होती. मक्तेदारीचे प्रमाण (किंवा वस्तूची किंमत ठरविताना उत्पादनखर्चाबरोबरच जो नफाही मिळावा अशी अपेक्षा असते तो अपेक्षित नफा) आणि नफ्यातून व मजुरीतून केल्या जाणाऱ्या बचतीचे गुणोत्तर या गोष्टी दिलेल्या असताना एकूण निव्वळ गुंतवणुकीतून नफा उद्‌भवतो, असे मानले जात असे. तथापि, या संदर्भात आयशनरची भूमिका वेगळी होती. त्याने असे प्रतिपादन केले की, गुंतवणूक वाढविण्यासाठी वित्तीय साधनसामग्री हवी म्हणून सरासरी निगम लेव्ही बदलावी लागते; सरासरी निगम लेव्ही बदलण्याची गरज निर्माण झाल्यास मोठी कंपनी (उत्पादनसंस्था) वस्तूची किंमत बदलते. पण मग टीकाकार असा प्रश्न उपस्थित करतात की गुंतवणुकीच्या चालू दराच्या दृष्टिने प्रचलीत सरासरी निगम लेव्ही आणि परिणामत: किंमत समाधानकारक असूनही त्यात वाढ का करावी?

केन्सोत्तर अर्थवेत्त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे त्यावरील आक्षेप व त्यांचे निरसन लक्षात घेता शेवटी आयशनरची भूमिका रॉबिन्सने मान्य केली, असे दिसते. नियोजित गुंतवणुकीकरिता वित्तपुरवठा करण्यासाठी उत्पादनसंस्था सरासरी निगम लेव्हीत समायोजन घडवून आणू शकते. आयशनरनेही आपल्या मांडणीत काही बदल करण्यास सुरुवात केली. स्थापित क्षमता वापराचे विशिष्ट प्रमाण गृहीत धरले असताना गुंतवणुकीच्या दरातील बदल आणि म्हणून सरासरी निगम लेव्हीतील बदल यांच्यातील संबंध आयशनरने स्पष्ट केल्यामुळे व्यष्टीय विश्लेषण यांच्या संश्लेषणाच्या दिशेने वाटचाल शक्य झाली. समष्टीय गतिकी-विषयक केन्सोत्तर सिद्धान्तासाठी व्यष्टीय आधार उपलब्ध करुन दिला गेला.

एकंदरीत असे दिसून येते की, पूर्वनिश्चित नफ्याचे एकावयवी स्पष्टीकरण देण्यापेक्षा त्याच्या कारणमीमांसेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने समाविष्ट होणारे अनेक घटक विचारात घेणे अधिक संयुक्तिक ठरते. पूर्वनिश्चित नफ्याचे असे संश्लेणात्मक स्पष्टीकरण केन्सोत्तर व्यष्टीय विश्लेणाचे एक वैशिष्टयच ठरते. अशा स्पष्टीकरणामुळे उत्पादनसंस्थेच्या व्यवहारांचे, वर्तनाचे नीट आकलन होण्याचे दृष्टीचे मदत होते; उत्पादनसंस्थेच्या किंमतविषयक निर्णयांचे स्वरुप जाणून घेण्यासाठी आवश्यक असणारी सूक्ष्मदृष्टि त्यातून प्राप्त होते.

प्रशासित किंमत-निर्धारण तत्त्व, प्रसामान्य किंमतीचे तत्त्व, अधिपरिव्यय किंमत निर्धारण तत्त्व या सिद्धान्तांमध्ये अंतर्भूत असलेले विविध युक्तिवाद महत्वाचे ठरतात ते या अर्थाने की, त्यामुळे केन्सोत्तर किंमत निश्चितीचे तत्त्व आणि तशा तत्त्वाचे मूलाधार विकसित करण्याच्या बाबतीत उपयुक्त ठरु शकणारी सैद्धान्तिक सूक्ष्मदृष्टी लाभते.

**16. संभाव्य 'किंमतनिर्धारण तत्त्व' :**

केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषण विकसित करुन त्यातून अधिक वास्तववादी व समावेशक स्वरुपाचे (नवअभिमत नसणारे) किंमत-निर्धारण तत्त्व, मांडले जाण्यासाठी तशा तत्त्वाचा मूलाधार निश्चित करणे जरुरीचे ठरते. अनुभवाश्रित उत्पादन-आराखड्याशी निगडीत असणारे किंमत-

निर्धारणविषयक प्रतिमान विकसित करुन त्यायोगे केन्सोत्तर व्यष्टीय विश्लेषण पुढे नेता येईल.

अर्थात येथे अभिप्रेत असणारा सैद्धान्तिक मूलाधार म्हणजे किंमत-निर्धारणविषयक प्रचलीत तत्त्वांची केवळ एकत्रित मांडणी नव्हे. केवळ कॅलेकीप्रणीत बैठक किंवा मीन्सपुरस्कृत तार्किक आधार असे त्याचे स्वरुप असणारा नाही. केन्सोत्तर किंमत-निर्धारण तत्त्वात आणि त्या तत्त्वाच्या आधारामध्ये उपरोक्त तत्त्वांचा व सैद्धान्तिक चर्चेचा संश्लेषणात्मक परिपाक अंतर्भूत असू शकतो. केन्सोत्तर विश्लेषण अधिक विकसित करण्याच्या मार्गातील तो एक महत्त्वाचा टप्पा ठरु शकतो.

आधुनिक काळातील द्रव्याधिष्ठित भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वस्तूंचे उत्पादन मागणीनुसार केले जाते. मागणीविषयक अंतिम निर्णय उत्पादनसंस्था आणि रोजगार-परिमाण ठरवत असतात. पैशातील किंमती त्या निर्णयाचे व बाजारपेठेतील व्यवहारांचे माध्यम असतात. केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषण हे मुख्यत: अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे कार्य कसे चालते याविषयीच्या प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न करते. केन्सोत्तर मूल्यनिर्धारण तत्त्वाचे उपरोक्त सैद्धान्तिक दिशानिर्देशन लक्षात घेता त्याचा विकास भविष्यकाळात कसा राहील याची स्थूल कल्पना करता येईल.

नवअभिमत अर्थशास्त्रात असे मानले गेले की आर्थिक व्यवहारांचा समन्वय बाजारातील किंमतीमार्फत साधला जातो. तथापि, किमती तशा परिवर्तनक्षम नसल्याचे प्रत्यक्षात दिसते. किंमती बऱ्याच काळापर्यंत स्थिर राहू शकतात, असे अलिकडील काळातील अनुभवावरुन दिसते. अशा परिस्थितीत बाजारातील किंमतीच्या समन्वयी भूमिकेबद्दल शंका येणे स्वाभाविक आहे. मागणीविषयक अंतिम निर्णयांच्या बाबतीत किमतींची किंवा पूर्वनिश्चित नफ्याची नेमकी भूमिका अनिश्चितच राहाते.

वस्तूंची किंमत निश्चित करण्याच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक म्हणून खर्चात मिळवावयाच्या नफ्याचा विचार करणे भाग पडते. त्या नफ्याचे प्रमाण आजवर किती राहिले किंवा आता किती राहील याचे स्पष्टीकरण देण्यासाठी बदलत्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय परिस्थितीविषयक अभ्यास आवश्यक ठरतो. वस्तूची किंमत ठरविताना नफा किती लावावा याबाबत देखील रुढ संकेत, समंजसपणा, संयुक्तिकता यांचे महत्त्व गृहीत धरुनच या विषयाची मांडणी करावी लागेल. भांडवलशाहीचे आणि अशा अर्थव्यवस्थेतील मूल्यनिर्धारण तत्त्वाची मांडणी व विश्लेषण करताना केन्सोत्तर अभ्यासकांना सर्वसमावेशक दृष्टिकोन अवलंबिणे जरुरीचे ठरेल.

**17. केन्सोत्तर अर्थशास्त्रातील सुसंगतीचा प्रश्न :**

केन्सोत्तर अर्थशास्त्राचा उगम नेमका कोठे झाला, हे सांगणे कठीण आहे. या अर्थशास्त्राचे मूळ ॲडॅम स्मिथ, रिकार्डो यांच्या लिखाणात सापडू शकेल असाही दावा केला जातो. कार्ल मार्क्स, कॅलेकी, स्राफा यांनी अर्थशास्त्राच्या वैचारिक विकासात जी मोलाची भर घातली त्या योगदानाच्याही प्रभावामुळे केन्सोत्तर अर्थशास्त्राने काही वैशिष्ट्ये अंगी बाणलेली दिसतात. पारंपरिक दृष्टिकोनाला विरोध, संस्थावादाचे महत्त्व, अनिश्चितता या घटकांचा प्रभाव इत्यादी ठळक वैशिष्ट्ये केन्सोत्तर अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतात. तरी देखील केन्सोत्तर वादात (केन्सोत्तर शैलीत) एखाद्या विशिष्ट प्रश्नांबाबत विभिन्न भूमिका घेतल्या जात असल्याचे दिसून येते. अशा भूमिका परस्परांशी कितपत सुसंगत ठरतात आणि त्या सर्वांची एक मोट

बांधणे कितपत शक्य आहे, असा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित होतो.[33]

हारकोर्टच्या मते, केन्सोत्तर अर्थशास्त्रात जे विविध प्रवाह आढळतात त्या सर्वांचे संश्लेषण करुन एकसंध स्वरुपाची विचारधारा विकसित करण्याचा प्रयत्न करताना अडचणी जाणवतात. केन्सोत्तर अर्थशास्त्राचे विविध प्रवाह नवअभिमत अर्थशास्त्राची समग्र मांडणी त्याज्य ठरवितात, पण त्यांच्याजागी वेगळ्या युक्त्या योजून केन्सोत्तर अर्थशास्त्र म्हणून पर्याय उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न कितपत सफल होईल याविषयी शंका वाटते.[34]

तथापि, क्रेगेलने[35] या संदर्भात वेगळी भूमिका घेतलेली दिसते. केन्सोत्तर अर्थशास्त्राचा गाभा पारंपरिक अर्थशास्त्राच्या तुलनेत अगदी भिन्न असून केन्सोत्तर आर्थिक विश्लेषणाच्या विविध शाखा विकसित झालेल्या दिसत असल्या तरी त्या विविधतेतही एकता असल्याचे लक्षात येते. त्यामध्ये मूलतः सुसंगती आहे. केन्सोत्तर मूल्य-निर्धारण सिद्धान्तासाठी आधार म्हणून केन्सच्या 'सामान्य सिद्धान्त' या ग्रंथातील पैसाविषयक सिद्धान्त वापरण्याचा प्रयत्न करणे आणि स्राफाच्या प्रतिमानात व पॅसिनेतीच्या दृष्टिकोनात आढळणाऱ्या किमती व उत्पादन विषयक सिद्धान्ताशी याचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करुन आर्थिक विश्लेषण पुढे नेता येणे शक्य आहे.

केन्सोत्तर अर्थशास्त्रातील विविध प्रवाहांच्या बाबतीतील सुसंगतीच्या प्रश्नाचा विचार अन्य अर्थवेत्त्यांनी वेगळ्या रीतीने केला आहे. केन्सोत्तरवादाची व्याख्या, मांडणी इत्यादी पद्धतिमीमांसेच्या अंगाने[36] केली जात असल्यामुळे केन्सोत्तर अर्थशास्त्राची मांडणी वैविध्यपूर्ण असली तरी त्याची पद्धतिमीमांसा लक्षात घेता सुसंगती प्रत्ययास येते.

**18. समीक्षणात्मक(चिकित्सक)वास्तववाद :**

'केन्सोत्तर' वादातील सुसंगतीविषयी चर्चा करताना आर्स्टिस, लॉसेन[37] आदींनी समीक्षणात्मक (चिकित्सक) वास्तववादाचा निर्देश केला आहे. केन्सोत्तर अर्थशास्त्र वास्तववादी आहे. समीक्षणात्मक वास्तववाद हे केन्सोत्तर अर्थशास्त्राचे वैशिष्ट्य तर प्रत्यक्षानुसारी (किंवा प्रत्यक्षज्ञानवादी) दृष्टिकोन नवअभिमत अर्थशास्त्राचा गुणविशेष म्हणता येईल. समीक्षणात्मक वास्तववाद हा शास्त्राबद्दलचा एक विशिष्ट दृष्टिकोन होय. वास्तव प्रक्रियांच्या मुळाशी असणाऱ्या कार्यकारणात्मक संरचनेचे आकलन वाढविणे हे शास्त्राचे उद्दिष्ट होय, असे समीक्षणात्मक वास्तववादाचे पुरस्कर्ते मानतात. शास्त्राविषयीचा प्रत्यक्षानुसारी दृष्टिकोन यापेक्षा वेगळा आहे; घटनेची नियमितता ओळखणे (सिद्ध करणे) शास्त्राच्या या दृष्टिकोनाला अभिप्रेत आहे. भाववाढीचा अतिरेक ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी वास्तववादाचा पुरस्कर्ता सांख्यिकी नियमिततांचा विचार करण्यापेक्षा किंमत निश्चितीच्या मुळाशी असणाऱ्या प्रक्रियांवर लक्ष केंद्रित करतो. अर्थव्यवस्थेचे स्वरुप पूर्णतः सेंद्रीय असते, याची केन्सोत्तर अर्थवेत्त्यांना चांगलीच जाण आहे. त्यांच्या या संदर्भातील आकलनातून असे सूचित होते की पारंपरिक पठडीतील विश्लेषण अत्यंत संकुचित स्वरुपाचे ठरते. केन्सोत्तर अर्थशास्त्राचा आवाका बराच मोठा आहे. त्यांचे प्रक्रियांच्या मुळाशी असणाऱ्या (सर्व किंवा बहुतांश) कार्यकारण संबंधात्मक संरचनांचे नीट आकलन ज्यायोगे होउ शकेल असे ज्ञान मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

कसेही करुन सुसंगती आणण्याचा आग्रह धरल्यास काही अत्यंत आकुंचित अशा ठराविक पद्धती शिरोधार्य मानून त्या जोखडाखाली आर्थिक विश्लेषण करावयास लावणे कदाचित शक्य आहे. एका अर्थाने पारंपरिक विश्लेषणाचेच हे अंधानुकरण

होय. म्हणूनच हारकोर्ट आणि हॅमोडा हे साशंक असून केन्सोत्तरवादाच्या संदर्भात सुसंगतीविषयी मत व्यक्त करताना ते सावधगिरी बाळगतात. वस्तुतः आवाका आणि आशय या दृष्टिंनी केन्सोत्तर विश्लेषणात वैविध्य असून त्यामुळेच त्याची प्रयोज्यता ( लागू ठरण्याची क्षमता) वाढली असून ते समृद्ध झाले आहे. केवळ मर्यादित अर्थानेच सुसंगतीला चिकटून राहाण्यासाठी केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या गुणविशेषांची किंमत मोजणे खचितच अन्यायकारक व हानिकारक ठरेल.

सुसंगती म्हणजे विविक्षित मूळ भूमिकेशी किंवा विशिष्ट पद्धतीशी (आंधळी) निष्ठा असे मानता येत नाही. खरे तर (उपरोक्त) समीक्षात्मक वास्तववादी भूमिका घ्यावयाची झाल्यास सुसंगती ही संज्ञा समान पद्धतिमीमांसा - अभिमुखता सूचित करते. शास्त्राची उद्दिष्टे, मानवी अभिकरणाची वैशिष्ट्ये, व्यक्ति आणि समाजरचना यांच्यातील संबंध इत्यादिंच्या (गुणात्मक का होईना) सम्यक् रेखाटनाच्या पातळीवरुन सुसंगतीचा विचार करता येतो. सामाजिक वास्तव लक्षात घेऊन त्यानुसार अनुसरल्या जाणाऱ्या पद्धतींच्या बाबतीत काहीशी भिन्नता आणि परस्परविरोधी निष्कर्ष इत्यादींना भरपूर वाव दिला जाऊन देखील उपरोक्त अर्थाने सुसंगतीचा प्रत्यय येतो.

पारंपरिक आर्थिक विश्लेषणाची न्यूनता किंवा दुर्बलता दाखवून देताना लॉसन याने 'समीक्षणात्मक' (टीकात्मक) वास्तववाद या संकल्पनेचा आधार घेतलेला आहे. त्याच्या मते पारंपरिक अर्थशास्त्र मूलतः प्रत्यक्षज्ञानवादी मीमांसापद्धतीच्या (पॉझिटिव्हिस्ट मेथॉडॉलॉजी) या बंधनात आहे. सामाजिक, आर्थिक जीवन (अर्थशास्त्र?) कोणत्या दृष्टिकोनातून अभ्यासले जावे या संदर्भात मूलतः प्रत्यक्षज्ञानवादी निदेशक-तत्त्वाच्या विरोधात केन्सोत्तर अर्थशास्त्राची मांडणी केली गेली आहे. प्रत्यक्षज्ञानवादातून स्फूर्ती घेणाऱ्या दृष्टिकोनाबद्दल समीक्षणात्मक वास्तववाद अविश्वास दाखवितो; आणि त्याचबरोबर अधिक सत्याभासी किंवा (दिसायला ?) संयुक्तिक, वाजवी स्वरुपाच्या सामान्य संकल्पनापुढे ठेवतो. अशा स्वरुपाच्या आकलनातून अनेक केन्सोत्तर सिद्धान्तांचे विशदीकरण होत असते. केन्सोत्तर विश्लेषणात सामाजिक संस्थांचे आणि गतिक ऐतिहासिक प्रक्रियांचे महत्त्व अधोरेखित होत असते; म्हणूनच समीक्षणात्मक वास्तववाद अवलंबिणे आवश्यक ठरते.

सामाजिक वास्तवाचे स्वरुप नीट समजून घेण्याच्या दृष्टिने उपयुक्त ठरतील अशा विश्लेषण-पद्धती विकसित करणे जरुरीचे ठरते आणि त्याप्रमाणे केन्सोत्तर अर्थवेत्त्यांनी तशा पद्धती तयार केल्या आहेत, अवलंबिल्या आहेत. (त्यामुळेच केन्सोत्तर विश्लेषणात बहुत्ववाद सामावला जाणे शक्य झाले आहे.) अंतःप्रेरणा, विधिसंमत युक्ति वाद-पद्धती, आकारिक तर्कशास्त्रीय पद्धती, गणिती व सांख्यिकी पद्धती इत्यादींचा अवलंब, एकाच प्रश्नाच्या विविध बाजू अभ्यासताना आणि विविध स्वरुपाचे प्रश्न हाताळताना प्रस्तुत ठरत असल्याने केन्सोत्तर विश्लेषणात विषयांच्या व पद्धतींच्या दृष्टीने विविधता दिसते. परिणामरुप बहुत्वाला (अनेकतेला) केन्सोत्तर अर्थशास्त्रात स्थान देण्याचा हारकोर्टचा प्रयत्न आहे. त्यांच्या मते अर्थशास्त्रविषयक सर्व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यासाठी कोणतीही एकरुप (एकसारखी) पद्धती नाही. केन्सोत्तर अर्थशास्त्रात विविध धागेदोरे आहेत; ते निरनिराळ्या प्रश्नांशी, प्रश्नाच्या निरनिराळ्या बाजूंशी निगडीत आहेत; आणि त्यात अनुस्युत असलेल्या विविध विचारणा-पातळ्या सारख्या नाहीत.[38]

अशा रीतीने वास्तववादी भूमिकेचा सुसंगतपणे पाठपुरावा करावयाचा असेल तर अनेकविध पद्धतींचा अवलंब करता येणे शक्य असते, त्यांचे तौलनिक लाभ ठरविताना सामाजिक प्रश्नांचे (किंवा विषयाचे) नीट आकलन होण्याच्या दृष्टीने त्यांची (सापेक्ष) सूक्ष्मभेदग्राहिता कितपत आहे हे पाहिले पाहिजे; तसेच (विचाराधीन) सामाजिक वास्तवाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये त्या कितपत विशद करु शकतात, हेही लक्षात घ्यावयास हवे. हारकोर्टसारख्यांच्या अंत:प्रेरणा वास्तववाद अधोरेखित करणाऱ्या आहेत. तथापि, कोणत्या अभ्यासपद्धती आणि दृष्टिकोन वास्तववादी म्हणून समर्थनीय ठरतात आणि कोणत्या पद्धतींच्या बाबतीत असे समर्थन देणे अशक्य आहे, हे नेमकेपणाने सांगणे कठीण आहे. त्यांच्यातील भेदरेषा अद्याप ठरलेली नाही.

**19. केन्सोत्तर अर्थशास्त्राची पद्धतिमीमांसा :**

केन्सोत्तर अर्थशास्त्राची पद्धतिमीमांसा याविषयीचे विचारमंथन अद्याप सुरुच आहे. केन्सोत्तर पद्धतिमीमांसेत ओघाने अनेक विश्लेषण-पद्धती समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, आकारिक प्रतिमाने, संस्थात्मक विश्लेषण, ऐतिहासिक चिकित्सा, परिमाणात्मक विश्लेषण, अर्थमिति, अन्य अभ्यासविषयांशी संबंध इत्यादी केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील ज्ञानाच्या पद्धती, संयुक्तिकता व व्याप्तीसंबंधीच्या सिद्धान्ताविषयीची जाणीव अगदी अलिकडील काळात दिसू लागली आहे.[39] ही जाणीव पसरुन तिची परिणती अनुभवास येईल तेंव्हा केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या पद्धतिमीमांसेचे स्वरुप आणि व्याप्ती याविषयी एकवाक्यता येईल.

केन्सोत्तर (व्यष्टीय व समष्टीय) आर्थिक विश्लेषणाची व सिद्धान्ताची बैठक समजून घेतली तर (खुल्या अर्थव्यवस्थेविषयीच्या) अशा प्रकारच्या चिकित्सेसाठी अनेकविध पद्धतींचा अवलंब करणे कसे जरुरीचे ठरते, ते सहज लक्षात येते. पद्धतिवैविध्याबरोबरच केन्सोत्तर अर्थवेत्त्यांनी अवलंबविलेल्या 'सर्वसाधारण तर्कशास्त्राचा' किंवा 'मानवी तर्कशास्त्राचा' देखील येथे उल्लेख केला पाहिजे. विचाराधीन गोष्टीशी संबंधीत असणारा एकूण पुरावा आणि त्याचे स्वरुप अशा तर्कशास्त्राचे आधार असतातच, परंतु जर तसा समग्र पुरावा उपलब्ध नसेल तर संकेत(किंवा पुष्कळांची अनुमती असलेला प्रचार) हाच त्या तर्कशास्त्राचा आधार मानला जातो. सिद्धान्त हे तार्किक पायावर आधारित असतात; म्हणूनच सिद्धान्ताची मांडणी करताना अवलंबिले जाणारे तर्कशास्त्र कोणत्या स्वरुपाचे आहे हे महत्त्वाचे ठरते. केन्सोत्तर अर्थशास्त्र मानवी तर्कशास्त्रावर आधारित असून हे तर्कशास्त्र नवअभिमत अर्थशास्त्राच्या तार्किक पायाच्या तुलनेत वेगळे आहे.

सिद्धान्त-मांडणीसाठी मानवी तर्कशास्त्राचा आधार घेण्याचा एक परिणाम असा की व्यक्तीकडून केली जाणारी निवड (मानवी निवड) अगोदर ठरले आहे त्याप्रमाणे घडणारी म्हणजेच नियतिवाद-प्रेरित असते असे दर्शविणारी विधाने पूर्ण सत्य मानणे कसे अशक्य असते ते समजते; उपलब्ध ज्ञान परिपूर्ण नसल्याने सर्व सैद्धांतिक मांडणी एकाच प्रकारच्या गृहीतांवर आधारण्याची गरज नाही. नवअभिमत पंथीय विधाने त्रिकालाबाधित मानण्याची आवश्यकता नाही. आणखी असे की, आर्थिक प्रक्रियांमध्ये मानवी वर्तनाची व संस्थांची उत्क्रांती अभिप्रेत असते. त्यामुळे पारंपरिक अर्थशास्त्रात ज्या समतोलाविषयी बोलले जाते त्या अर्थाचा समतोल वास्तवाशी जुळणारा नाही; तो समतोल अप्रस्तुत ठरतो, ही बाब केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या वैचारिक विकासात ठळकपणे दिसते. मानवी तर्कशास्त्र आधारभूत मानले की सर्व ज्ञान काटेकोर गणिती पद्धतीत बसण्याची कल्पना करता

येणे कठीण आहे. मानवी व्यववहारांना तशा चौकटीत बंदिस्त करणे अमानवी ठरते. उपलब्ध (अनुभवाश्रित) पुरावा सिद्धान्ताला कितपत पुष्टी देणारा आहे हे बघणे जरुरीचे असले तरी सर्वच (अनुभवाश्रित) पुराव्याच्या बाबतीत संख्यात्मक मापनाची शक्यता असतेच असे नाही. उदाहरणार्थ, माहिती मिळविण्यासाठी ज्या प्रश्नावलीचा अवलंब केला जातो त्या प्रश्नावलीचे विशिष्ट स्वरुप किंवा मुलाखतीद्वारे संकलित केली जाणारी अनुभवसिद्ध निरीक्षणे इत्यादींच्या बाबतीत गणिती मापदंड वापरता येत नाही. काही आंशिक सिद्धांत गणिती पद्धतीने मांडले जाणे शक्य असते तर काही सिद्धांत मात्र शाब्दिक सिद्धांताची सुरुवात विशिष्ट संकेतानुसार वस्तुस्थितीच्या चित्रणाने केली जाते. केवळ पद्धतिमीमांसाविषयक कारणास्तव एखादी पद्धती दूर ठेवली जाते असे नाही.

आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थांचे सर्वसाधारण विश्लेषण करणारे हे केन्सोत्तर अर्थशास्त्र एक मुक्त वैचारिक पद्धती आहे. त्यात सामान्यीकृत भविष्यकथन करण्यासाठी पाया उपलब्ध करुन दिलेला नाही. उदाहरणार्थ, उच्च व्याजदरांमुळे गुंतवणूकदार नाऊमेद होतात, असे सामान्यीकृत भाकित करण्यापूर्वी संदर्भ अभ्यासावा लागतो. संस्था-संरचना, आर्थिक अभिकर्त्यांचे वर्तन इत्यादी स्थलकालसापेक्ष स्थिती विचारात घेण्याची जबाबदारी अर्थवेत्त्यांवर येत असते.

विनिमयसंबंध हे साधारणपणे उत्पादनविषयक स्थितीवर अवलंबून असतात, असे मानले जात असल्याने 'केन्सोत्तर' वाद विनिमयापेक्षा उत्पादनावर लक्ष केंद्रित करणारा आहे. त्यामुळे पारंपरिक स्वरुपाचे पुरवठा-मागणी विश्लेषण अवलंबिण्याकडे केन्सोत्तर अर्थशास्त्रज्ञांचा कल नाही. मागणीची स्थिती आणि पुरवठ्याची स्थिती परस्परावलंबी असतात हे लक्षात घेतले तर केन्सोत्तर अर्थवेत्ते पारंपरिक मागणी/ पुरवठा विश्लेषणपद्धती अनुसरण्यास का तयार नसतात हे समजते. वस्तुबाजारात आणि घटकबाजारात नेहमी अपूर्ण स्पर्धा असते. अशा परिस्थितीत वस्तूंच्या व उत्पादन घटकांच्या किंमत-निश्चितीचे विवेचन अपेक्षित नफा आधारित प्रतिमानानुसार केले जाते. हा अपेक्षित नफा बहिर्जात घटकांवर अवलंबून असतो, असे काही प्रतिमानात दिसते; तर काही प्रतिमाने या संदर्भात अंतर्जात घटक शोधण्याचा प्रयत्न करतात. उत्पादनसंस्थांच्या व उद्योगांच्या स्थितीची चिकित्सा करण्यासाठी वर्तनानुसारी विश्लेषणाचा अवलंब केला जातो.

पैसा हा घटक अलग मानण्यापेक्षा आर्थिक प्रक्रियेचा तो एक अविभाज्य घटक मानला जातो. हिशेब-एकक म्हणून पैशाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून अनिश्चिततेच्या परिस्थितीत पैसा धारण करण्यामुळे आधार प्राप्त होतो. अशा रीतीने आर्थिक प्रक्रियेत पैशाकडून क्रियाशील भूमिका पार पाडली जात असली तरी पैशाचे स्वरुप विचारात घेता(विकसीत अर्थव्यवस्थांच्याही) मध्यवर्ती बँका पैशाचे नियंत्रण करु शकत नाहीत. अर्थव्यवस्थेत पैशाचे नियंत्रण कितपत केले जाते हे अभ्यासण्यासाठी किंवा त्याविषयीचा कयास व्यक्त करण्यासाठी एखाद्या सामान्य सिद्धान्तावर भिस्त ठेवता येणार नाही. केन्सोत्तर विचारसरणीनुसार त्यासाठी विशिष्ट संदर्भ अभ्यासावा लागतो, अर्थव्यवस्थेची विशिष्ट स्थिती, तेथील बँक व्यवसायाची वैशिष्ट्ये तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादी बाबी लक्षात घ्याव्या लागतात. अर्थव्यवस्थेतील पैशाविषयीचे प्रश्न हाताळताना संदर्भ-विशिष्ट विश्लेषण उपयुक्त ठरते.

**20. भावी विकास :**

वास्तवाकडे व्यापक दृष्टीने पाहाता नवअभिमत अर्थशास्त्राला पर्याय म्हणून केली जाणारी

समावेशक स्वरुपाची मांडणी केवळ सैद्धान्तिक दृष्टीनेच नव्हे तर प्रत्यक्षात धोरण-निश्चितीच्या बाबतीतही उपयुक्त असावयास हवी. पर्यायी मांडणीचे स्वरुप यापुढे कसे राहील याविषयी विचार करताना काही मुद्दे वेधक ठरतात. त्या दृष्टीने केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या संभाव्य विकासाची रुपरेषा सूत्ररुपाने देता येईल.

समाजाने स्वीकारलेल्या अर्थप्रणालीला समाज-जीवनात निश्चितच महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. तथापि, अर्थप्रणालीची नेमकी भूमिका कोणती हे ठरण्यासाठी समाजव्यवस्थेचे कार्य कसे चालते हे स्पष्ट व्हावयास हवे. समाजाची कार्ययंत्रणा कशी चालते याविषयीच्या विश्लेषणात मार्क्सवाद्यांनी तसेच संस्थावाद्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांनी या विषयाचे महत्त्व नीट जाणून घेऊन त्याचा पाठपुरावा केला आहे.

समाजजीवन सुरळीतपणे सुरु राहाण्यासाठी, व विकसित होण्यासाठी अनेक प्रकारच्या संस्थांची, व्यवस्थांची व यंत्रणांची गरज भासते. तंत्रशास्त्रीय दृष्ट्या प्रगत अशा आधुनिक समाजाच्या बाबतीत, हे अधिकच खरे ठरते. आर्थिक संस्था आणि व्यवस्था म्हणजे त्यापैकी केवळ एक घटक होय. या अन्य व्यवस्था यंत्रणा कोणकोणत्या असतात याचा तपशिलवार खुलासा करणे जरुरीचे ठरते. समाजाच्या काही धारणा असतात; लोक काही विचारप्रणाली स्वीकारतात. वैशिष्ट्यपूर्ण राज्यपद्धतीत ते वावरतात. त्यांना संस्कृतीचा वारसा लाभलेला असतो. या सर्वांना समाजाच्या आर्थिक मूलाधाराची, आर्थिक विचारांची बैठक प्राप्त झालेली असते. वस्तूंच्या उत्पादनामागे असणारे तंत्रवैज्ञानिक घटक आणि उत्पादनाचे (सामाजिक) संबंध यांमधील संघर्षावर मार्क्सवाद्यांनी बोट ठेवले. हा संघर्ष म्हणजे एका अर्थाने त्या विश्लेषणातील गतिक घटक म्हणता येईल. मार्क्सवादी विश्लेषण प्रामुख्याने एवढ्याच बाजूपुरते मर्यादित असल्याने व्यापक समाजाच्या अन्य अंगांचा विशेष विचार त्यात नाही.

एकूण समाज-वर्तनाचे स्पष्टीकरण विविध व्यवस्था देत असतात. हे स्पष्टीकरण अनेक प्रकारे देता येते हे विशदीकरण कोणत्याही एखाद्या विशिष्ट चौकटीत बसणारे असले पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. किंबहुना अशा एकावयवी दृष्टिकोनापेक्षा अनेक प्रकारच्या व्यवस्थांना सामावून घेणारा व्यापक बहुआयामी दृष्टिकोन अवलंबिणे प्रस्तुत व उपयुक्त ठरेल. आर्थिक बाजू ही समाजजीवनाची एक बाजू असू शकते, एकमेव नव्हे.

केन्सोत्तर अर्थशास्त्र आर्थिक बाजूचा अद्याप काहीसा अलगपणेच विचार करते. आर्थिक व्यवस्था जिचा केवळ एक भाग असतो, त्या बहुआयामी व्यवस्थेकडे साकल्याने पाहाण्याचा प्रयत्न यात फारसा नाही. तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे घडून येणाऱ्या अनेक परिणामांपैकी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे सामाजिक संस्थांमध्ये अपरिहार्यपणे बदल घडून येतात. याचा गांभीर्याने अंतर्भाव करावयाचा झाल्यास केन्सोत्तर विश्लेषणात मूलभूत व दूरगामी बदल अटळ ठरतात. अर्थात याचा परिणाम म्हणून दीर्घकालीन आर्थिक वृद्धीचे ठरीव स्वरुपाचे स्पष्टीकरण देण्याच्या बाबतीत केन्सोत्तर अर्थशास्त्र कदाचित कमी पडेल. तंत्रवैज्ञानिक प्रगतीची आणि त्या प्रगतीच्या सामाजिक परिणामांची दखल देऊन त्यानुसार केन्सोत्तर अर्थशास्त्र पुढे विकसित करण्यामध्ये अडचणी आहेत, हे निश्चित. पण समाजजीवनाच्या अन्य अंगांचा विचार करुन त्यांचा अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने केन्सोत्तर अर्थशास्त्राची चौकट अधिक विशाल केल्यास त्या अडचणी कमी होतील.

केन्सोत्तर अर्थशास्त्राची भावी वाटचाल

अन्य दिशांनी होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, एखादी अर्थव्यवस्था दीर्घकालीन विस्तारप्रक्रिया अनुभवत असताना काही कारणामुळे, एखाद्या बहिर्जात अडथळ्यामुळे ती अर्थव्यवस्था प्रगतीपथापासून विचलित झाली तर कोणते परिणाम घडून येतील आणि अर्थव्यवस्थेची एकूण स्थिती कशी राहील, याविषयीची चिकित्सा धोरणनिश्चितीच्या दृष्टीने निश्चितच उपयुक्त ठरेल. अशा असमतोल वृद्धीची चिकित्सा केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

वास्तवाचे नीट आकलन होण्यासाठी केवळ विकसित देशांचा विचार करणे पुरेसे ठरणार नाही; नव्या सुधारित मांडणीत विकसनशील जगताला देखील स्थान दिले गेले पाहिजे. राष्ट्रीय पातळी ओलांडली की अधिकाधिक गुंतागुंतीच्या अशा अनेक यंत्रणांचा व संस्थांचा विचार करणे भाग पडते. जागतिक चलनव्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता संचार व त्यांना मिळणारे स्वातंत्र्य, विकसित व विकसनशील देशांचे परस्परसंबंध इत्यादी सारख्या घटकांना सामावून घ्यावे लागेल.

## संदर्भ सूची

20. Kalechi, M. (1971) Selected essays on the dyamics of the capitalist economy 1933-1970, London : Cambridge University Press.

21. Eichner, A. S. (1976) The megacorp and oligopoly, Microfoundations of macro dynamics, New York : Cambridge University Press.

22. Henely, A. (1988) "Political Aspects of Full Employment : A Reassessment of Kalecki" The Political Quarterly, 59 (October-December).

23. Osiatynski, J. (Ed.) (1991) Collected Works of Michal Kalecki, Vol.II Capitalism : Economic Dynamics, Oxford : Clarendon Press, [Kalecki, M. Theory of Economic Dynamics : An Essay on Cyclical and Long-run Changes in Capitalist Economy, in Osiatynski (1991)].

24. Sawyer, M.C. (1982a) Macroeconomics in Question : The Keynesian Monetarist Orthodoxies and the Kaleckian Alternative, Armonk, New York : M.E., Sharpe. Sawyer, M.C. (1985) The Economics of Michal Kalecki, London : Macmillan.

25. Davidson, P. (1960) Theories of Aggregate Income Distribution, New Brunswick: Rutgers University Press.

26. Riach, P.A. (1971) "Kalecki's Degree of Monopoly Recosidered", Australian Economic Papers 10 (June) : 50-60

27. Reynolds, P.J. (1987) Political Economy : A Synthesis of Kaleckian and Post Keynesian Economics, New York : St. Martin's Press.

Kriesler, P. (1987) Kalechi's Microeconomics: The Development of Kolecki's Analysis of Pricing and Distribution, Cambridge : Cambridge University Press.

28. Hamouda, O.F. (1991) " Joan Robinson's Post keynesianism" in I. H. Rima(ed.). The Joan Robinso Legacy, Armonk, ew York : M.E. Sharpe.

29. Kregel, J. A. (1971) Rate of Profit, Distribution and Growth : Two Views, Chicago: Aldine & Atherton.

Kregel, J.A. (1973) The Reconstruction of Political Economy : An Introduction to Post-Keyesian Economics, London : Macmillan.

30. Harcourt, G.C., (1972) Some Cambridge Controversies in the Theory of Capital, Cambridge : Cambridge University Press.

31. Rimmer, R. (1993) Income Distribution in a Corporate Economy, Aldershot : Edward Elgar.

32. Wood, A. (1975) A Theory of Profits, London : Cambridge University Press.

33. Arestis Phillip, Gabriel Palma & Sawyer Malcom (ed.) (1997) Capital Controversy,

Post-Keynesian Ecoomics and History of Economics- Essays in honour of Geoff Harcourt, Vol. I, London : Routledge. [Stephe Pratte : Coherencei Post-Keyesian Economics, P. 285].

34.Harcourt. G.C. and Hamouda, O.F. (1988) " Post-Keynesianism : from criticism of coherence " as reprinted in Harcourt, G.C. (1992) on Political Economists and Modern Political Economy : Selected Essays of G.C. Harcourt, Ed. S. Sardoni, London : Routledge.

35.Kregel, J.A. (1991) The orgaising principle in Post-Keyesian economics" in W. Adriansen and J. Van der Linden (eds.) Post Keynesian Thought in Perspective, Groingen : Wolters-Noordhof.

36.Dow, S.C. (1995) Iterview in J.E. King, Conversations with post-Keynesians, London : Macmillan.

37.Lawson, T. (1997) Economics and Reality, London : Routldge.

38.Harcourt, G.. and Hamouda, O.F. (1988).

39.Davis, John, B.; Hands, D. Wade, Maki Uskali (Ed.) (1998) The Handbook of Economic Methodology, Cheltenham, U.K. : Edward Elgar, Northumpton, M.A., U.S.A., p. 378.

● ● ●

## आजीव सदस्य वर्गणीत वाढ

अर्थसंवाद आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचा विविध उपक्रमांवरील वाढता खर्च लक्षात घेता आजीव सदस्य वर्गणीत येत्या आर्थिक वर्षापासून वाढ करण्यात यावी असा निर्णय परळी वैजनाथ येथे झालेल्या परिषदेच्या अधिवेशनातील सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.

आता आजीव सदस्य वर्गणी रु. ८०० वरुन रु. 1200 पर्यंत वाढविण्यात आली आहे. एप्रिल 2003 पासून वाढीव वर्गणी आकारण्यात येईल. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

एप्रिल 2003 पूर्वी रु.८०० वर्गणी भरुन आजीव सदस्यत्व प्राप्त करता येईल. साधारण सदस्य / संस्था सदस्य यांच्या वर्गणीत बदल करण्यात आलेला नाही. इच्छुकांनी वर्गणीची रक्कम मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह/खजिनदार यांच्या कडे डिमांड ड्राफ्टने पाठवावी.

सर्जेराव ठोंबरे

कार्यवाह/खजिनदार

# अर्थशास्त्राचे भवितव्य काय ? कालौघात हे शास्त्र मृत्यू पावले आहे काय?

● नी. वि. सोवनी, पुणे

*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद*

अर्थशास्त्र हे गडबड व गोंधळ यात सापडलेले शास्त्र आहे. खरे तर त्याची अवस्था नेहमीच तशी राहिली आहे. 1945 नंतर एक दोन दशके त्यात काही आशादायक चिन्हे दिसू लागली होती. विश्लेषणशास्त्रात क्रान्ती होऊन त्यावेळी अर्थशास्त्र हे विद्वान साहित्यिकांचे कलात्मक शास्त्र न राहता खरोखरीचे वैज्ञानिक शास्त्र (विज्ञान) होईल असा पुष्कळांना विश्वास वाटू लागला होता. गणित, संख्याशास्त्र व आकारिक सैद्धांतिक प्रतिमाने यांच्या मदतीने पुढचा प्रगतीचा नवा मार्ग दिसत होता. सुधारलेली पूर्वानुमाने व शास्त्रीय रीतीने सिद्ध झालेली आर्थिक धोरणे यात हे परिणत होईल असे वाटत होते. परंतु हाय ! गणित राहिले पण त्यामागचा आशावाद मावळला. सुस्पष्टता आणि निश्चितता यांनी या शास्त्राच्या हातावर तुरी दिली आहे. मग सार्वजनिक आदरापासून ते वंचित राहिले तर त्यात नवल काय ?

अर्थशास्त्र कुठे भरकटले आहे ? Journal of Economic Perspectives या नियतकालिकाच्या अलीकडच्या एका खास अंकात या शास्त्राच्या भवितव्याबद्दल निरनिराळया दृष्टिकोनातून विचार मंथन आयोजित करण्यात आले होते. त्यात काही वेधक निष्कर्ष सुचविले आहेत.

या खिन्न (उद्वेगजनक) शास्त्राच्या भक्तांना अर्थशास्त्रावरील या आपत्तीचे प्रमुख कारण असे वाटते की शास्त्राला झालेला हा रोग जटिल व दु:साध्य नसून नेहमीच्या घटत्या प्रत्ययाची ही व्यथा आहे. पण ह्या पहिल्या शक्यतेकडे दुर्लक्ष झाले. एकप्रकारे आर्थिक व्यवहाराच्या वागणुकीमागील अनन्त जटिल मानसिक व्यापारांवर जेवढा प्रकाश आतापर्यंत टाकला गेला आहे त्यापेक्षा अधिक प्रकाश पडेल, अशी अपेक्षा करणे फोल आहे. अर्थात सूक्ष्म आणि सूक्ष्मतर अशा तऱ्हेची यासंबंधीची तपशिलवार माहिती गोळा करणे शक्य आहे. यामुळेच विद्यापीठांतून या विषयाचे विशेषीकरण झाले आहे व होत आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहारांचे चित्र अधिक पारदर्शक व विश्वासदायक होणार नाही किंवा त्यामुळे अर्थशास्त्राचे सामान्य सिद्धान्त टोकदार होतील अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही असा युक्तिवाद तुम्ही करु शकाल. प्रत्यक्षात यातून सर्वसामान्य (अर्थव्यवहारांचे) चित्र अधिक अपारदर्शी होईल व त्यामुळे सर्वसामान्य सिद्धांताच्यामागे धावणे सोडावे लागेल.

पण असा विचार हा हताश करणारा आहे. यापेक्षा अर्थशास्त्र आतापर्यंत बऱ्याच मोठ्या चुका करीत आलेले आहे, हा विचार जास्त सह्य आहे. चुका दुरुस्त करता येतात व घटते प्रत्याय मागे परतविता येतात. वरील निबंध सत्रातील दोन निबंध असे सुचवितात की कमी जास्त मानाने अर्थशास्त्र एकच चूक करीत आलेले आहे. या दोन लेखांचे लेखक जरी जुन्या पठडीतील असले तरी ही चूक दुरुस्त करण्याचे ते अगदी निरनिराळे मार्ग सुचवितात.

मिडबरी कॉलेजचे डेव्हिड कोलँडर हे 21व्या शतकाच्या मध्यावरील अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून मागे पाहताना त्यांना सध्याच्या अर्थशास्त्रातील मुख्य दोष त्याला पायाभूत असणाऱ्या सार्वत्रिक आर्थिक समतोलाचे प्रतिमान आहे असे वाटते. त्यांच्या मते सध्याचा ढगळ (सैल अन्वायोजनी) प्रत्यक्षानुसारी दृष्टिकोन म्हणजे सध्याच्या प्रमाणित गृहीतावर आधारलेले प्रतिमान उभारुन मग ते वास्तवाशी ताडून पाहणे-ऐवजी ढगळ फलवादी दृष्टिकोन स्वीकारणे चांगले. सैद्धांतिक चर्चा विसरुन उपलब्ध माहितीच्या विश्लेषणाने त्यातील आकृती बंध शोधणे.

त्यांचा असा दृष्टिकोन सध्या शास्त्रमंडळींना जाणवत असलेल्या विज्ञानाच्या वाढत्या गहनतेशी व जटिलत्वाशी सुसंगत असेल. संगणक चालविणारे, उपलब्ध माहिती सांख्यिकीय विश्लेषणाच्या जात्यात दळून काही प्रकारचे सिद्धांत त्यातूनही मिळण्याची, निदान काही नियमितता तरी त्यांना भेटेल अशी आशा करता येईल. पण हे सिद्धांत तात्पुरते व सतत बदलणारे असतील. मुख्य दावा असा की उपलब्ध माहितीत न बदलणारे कायमचे आकृतिबंध अस्तित्वातच नसतात. जटिल आर्थिक संव्यवस्था प्रत्यक्षात विस्तारतात व उत्क्रांत होतात. अगदी मूळ स्तरावर सुद्धा आकृतिबंध अल्पकालीन असतात. या सर्व दृष्टिकोनातून निघणाऱ्या फलिताला अर्थशास्त्र म्हणावयाचे की काय, हे चिंत्य आहे.

रिचर्ड थेलर (शिकागो विद्यापीठ) यांनी मांडलेला दुसरा दृष्टिकोन परंपरागत अर्थशास्त्रीय विश्लेषणाशी जास्त मिळता जुळता आहे. सध्याचे अर्थशास्त्र चुकीच्या मार्गावर भरकटले आहे हे त्यास मान्य आहे. पण या चुका दुरुस्त करता येतील असे त्यांना वाटते. प्रत्यक्षात अधिक घट्ट व चपखल अन्वायोजन करण्याचा मार्ग ते सुचवितात. त्यासाठी मानवासंबंधीच्या अनुभवसिद्ध ज्ञानाचा अर्थशास्त्राच्या गाळ्यात समावेश करावा असे त्यांना वाटते.

परंपरागत अर्थशास्त्राचे सिद्धांत मानव तर्कशुद्धपणे वागतात असे गृहीत धरते. हे सर्वज्ञात आहे. प्रत्यक्षात असे वागणे तर्कशुद्ध नसते पण तसे पाहिले तर ते विक्षिप्त (छांदिष्ट) नसते व बहुतप्रकारे अकार्यक्षम नसते. सामान्य माणसे तर्कशुद्ध वागण्याचा प्रयत्न करतात पण काही प्रमाणात अंदाज बांधता येईल अशा ठराविक तऱ्हेने तर्कशुद्ध वागत नाहीत हे अर्थशास्त्र जर समजून घेईल तर प्रत्यक्षानुसारी अर्थशास्त्राला अधिक बळकट पाया मिळेल. थोडक्यात, थेलर यांच्या मते अर्थशास्त्र व मानसशास्त्र यांच्यातील संबंध आतापेक्षा अधिक निकटतर व्हावयास हवेत.

अशा तऱ्हेच्या निकटतर संबंधांची सुरुवातही झाली आहे. 'सीमित तर्कशुद्धता' वा 'जवळ जवळ तर्कशुद्ध वर्तन'' यावरील चर्चेचे निबंध प्रसिद्ध होउ लागले आहेत. या नवीन विचार मंथनाच्या फलितात एक मानसशास्त्रीय आन्तरदृष्टी प्राप्त झाली आहे. ती म्हणजे 'प्रत्याशा सिद्धान्त' (Prospect Theory). या सिद्धान्ताप्रमाणे सामान्य माणसांना तोटा झाल्याचे दु:ख हे, तेवढाच फायदा झाल्यापेक्षाच्या आनंदापेक्षा जास्त वाटते. ते तर्कशुद्धतेच्या विरुद्ध आहे पण पर्यायी तत्व म्हणून सैद्धांतिक हाताळणीस सोईचे आहे. माणसांच्या आर्थिक वागणुकीचे वास्तव प्रतिमान या प्रारंभबिंदू पासून उभारता येईल.

थेलर भविष्यकाळाकडे नजर ठेवून अशा

संशोधनाच्या काही नव्या दिशा सुचवितात. सीमित तर्कशुद्ध वर्तनाचा विचार चालू आहे पण सीमित स्मरणशक्तीचा विचार अजून झालेला नाही. उदाहरणार्थ, विस्मृतिमुळे अर्थव्यवहारे (भागधारक) ज्याप्रकारे त्यांच्या प्रतिनिधींना (कंपन्यांच्या व्यवस्थापकांना) वागवितात याचा परिणाम अर्थव्यवहारांच्या सिद्धांतावर काय होतो याचा विचार करावा. विस्मृतीयुक्त व्यवहारांना (भागधारकांना) त्यांच्या प्रतिनिधींच्या (व्यवस्थापकांच्या) विजय व पराभवात फरक करणे कठीण जाते. कारण होऊन गेलेली पराभवाची कुठलीही घटना ही पुर्वानुमानीय होती असे वाटते. (पार्श्वदर्शन पूर्वग्रह हे प्रस्थापित मानसशास्त्रीय तत्व आहे.) आर्थिक वर्तनामागची भावनांची कामगिरी अद्याप असंशोधित आहे. पुष्कळ वेळा माणसे आर्थिक फायदा व्हावा म्हणून नव्हे तर प्रेमभावनेमुळे वा द्वेषभावनेमुळे वागतात.

प्रतिमाने उपयोगी (दर्शक) ठरण्यास ती प्रत्यक्षापेक्षा सुलभ व साधी असली पाहिजेत. हे उपयोगी सुलभीकरणाचे आव्हान आहे. त्यामुळे प्रतिमाने अनुपयोगीपणे अवजड न होता वास्तवदर्शी होतील. या उलट मार्गाने जाणे व परंपरागत शास्त्रीय विश्लेषण पद्धती सोडून देणे यामुळे कदाचित पुर्वानुमाने सुधारतील. पण संख्यात्मक माहिती विश्लेषणाच्या जात्यात घालून दळण्यापेक्षा माणसे कां व कशी वागतात यासंबंधी विचार करणे जास्त प्रस्तुत व वेधक दिसते. अर्थशास्त्राने अधिक मनोरंजक व्हावे हे नव्या काळाचे आव्हान आहे.

**पूरक टिपण :**

वरील भाषांतरित लेखाला पुरवणी म्हणून मला दोन गोष्टींकडे लक्ष वेधावयाचे आहे.

1. अर्थशास्त्राच्या प्रगतीविषयी अपेक्षाभंग झाल्याचा वरील लेखात उल्लेख आहे. त्यात पुढे म्हटले आहे की गणित राहिले पण त्यामागचा आशावाद नाहीसा झाला. अर्थशास्त्राला गणिताने पछाडण्यात व्यत्यय आलेला नाही ही चिंतेची बाब आहे. हे पछाडणे किती जबरदस्त आहे याची सहजपणे कल्पना येत नाही. अलीकडच्या काळातील अर्थशास्त्राची तीन नोबेल पारितोषिके ही गणितज्ञांना (अर्थशास्त्रज्ञांना नव्हे) दिली गेली आहेत. Economist मध्ये एका पत्रलेखकाने ही गोष्ट कळवली होती. तो लिहितो: "नॅश हे अर्थशास्त्रज्ञ नसून अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळविणारे पहिले गृहस्थ नाहीत. हरबर्ट सायमन व जीराड ड्रब्रेडे हे त्यापूर्वीचे नोबेल पारितोषिक विजेते अनुक्रमे संज्ञान-संगणक शास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ गणिती होते. माझ्या माहितीप्रमाणे यापैकी कोणीही मी अर्थशास्त्रज्ञ आहे असा दावा केलेला नाही".(29-9-2002) यावर अधिक भाष्याची गरज नाही.

2. मूळ लेखात थेलर यांच्या मते अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र यांच्यातील संबंध अधिक दृढ झाल्यास प्रगती साधता येईल असे सुचविले आहे. ही त्यांची शिफारस नोबेल पारितोषिकांच्या निवड समितीस यंदा तरी महत्वाची वाटली असावी.कारण या वर्षीचे (2002) अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक डॅनिएल कानेमान (प्रिन्स्टन) व व्हर्नान स्मिथ (जॉर्ज मेसन विद्यापीठ) या दोघात विभागले आहे. त्यापैकी कानेमान हे मानसशास्त्रज्ञ आहेत व स्मिथ हे आर्थिक वागणुकीचे मानसिक प्रयोगात्मक अभ्यासक आहेत.(Economist 12-10-2002) आता गणित नाही तर मानसशास्त्राकडे हा झुकाव दिसतो. कोणतेही स्वतंत्र शास्त्र इतके परप्रत्ययनेय असू शकते कां ?

इकॉनॉमिस्ट या प्रसिद्ध नियतकालिकात 4 मार्च 2002 रोजी Economic Focus या सदरात प्रसिद्ध झालेल्या लेखाचा स्वैर मराठी अनुवाद

● ● ●

# जोसेफ स्टिगलिट्झ यांचे माहिती अर्थशास्त्र

● **माधव दातार**

*भारतीय औद्योगिक विकास बँक, मुंबई*

1999 साली अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर सेन यांच्या अर्थशास्त्रीय विचारांबाबत जे सामान्य कुतुहल निर्माण झाले होते त्यात सेन यांच्या अर्थशास्त्रीय विचारांपेक्षा ते भारतीय असण्याचा वाटा मोठा होता हे मान्य केले म्हणजे 2001 च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते - जॉर्ज ॲकरलोव्ह, स्पेन्स व जोसेफ स्टिगलिट्झ या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांबाबत फारशी चर्चा झाली नाही याचे आश्चर्य वाटण्याचे काही कारण उरत नाही. वृत्तपत्रीय चर्चा देखील नोबेल समितीने पारितोषिक पात्र ठरविलेल्या या तिघांच्या विचारांतील समान बाबींवरच केन्द्रित राहिली हे ही समजण्याजोगेच आहे. परंतु अनेक कारणांमुळे 2001 च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञांच्या योगदानाबाबत जास्त विचार होणे आवश्यक आहे. एकतर वास्तवातील बाजारपेठांच्या कार्यपद्धतीवर अर्थशास्त्रज्ञांच्या या त्रयीने जे विवेचन केले आहे ते नावीन्यपूर्ण तर आहेच पण त्याचे परिणाम अर्थशास्त्राच्या कक्षेबाहेर पोचणारे आहेत. बाजारपेठांच्या कार्यपद्धतीबाबत रुढ अर्थशास्त्राच्या ज्या अपेक्षा किंवा गृहिते आहेत त्या खूप लोकप्रिय आहेत व अनेक लोकप्रिय गोष्टींप्रमाणे त्याची सत्यता प्रत्यक्ष पडताळण्यापेक्षा गृहितांवर आधारलेली आहे. शिवाय या गृहितांचा संबंध सरकारच्या आर्थिक धोरणांची गरज, त्याचे स्वरुप यांच्याशी निगडित असल्याने नोबल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा परिचय करुन घेणे व या विचारांचा धोरणात्मक बाबींवर होणारा परिणाम समजावून घेणे उपयुक्त ठरेल. या परिचयाचा उद्देश या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांकडे लक्ष वेधणे एवढाच असल्याने या तिघांच्या विचारांचा वेगळा विचार न करता स्थूलमानाने या तिघांनी घेतलेल्या भूमिकेचा विचार करणे सोपे व इष्ट ठरेल. शिवाय वास्तवातील बाजारपेठांची कार्यपद्धती रुढ अर्थशास्त्राच्या अपेक्षा व गृहितांपेक्षा वेगळी असल्याच्या धोरणात्मक परिणामांबाबत जोसेफ स्टिगलिट्झ यांनी सविस्तर विचार केलेला असल्याने या निबंधाची रचना सर्वस्वी स्टिगलिट्झ यांच्या विचारांच्या संदर्भातच केली आहे. 2001 सालच्या नोबेल पारितोषिकामुळे स्टिगलिट्झ यांच्या विचारांकडे बघण्याची संधी उपलब्ध होत आहे. स्टिगलिट्झ यांचे लिखाण वेळोवेळी इतर

सहकाऱ्यांबरोबर झाले आहे. या ठिकाणी ज्या विचारधारेचा परिचय करवून द्यायचा आहे त्याच्या उगम व विकासात 2001च्या नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञांप्रमाणेच इतरांचाही हातभार लागला आहे ही गोष्ट विसरली जाउ नये. त्यामुळे या निबंधात वारंवार स्टिगलिट्झ यांचा नामोल्लेख होत असला तरी तो केवळ सोयीचा भाग समजावा. स्टिगलिट्झ यांच्या विवेचनाची ढोबळ दिशा वास्तवातील बाजारपेठा रुढ अर्थशास्त्राच्या अपेक्षांपेक्षा निराळ्या पद्धतीने कार्य करतात हे दाखवणे, वास्तविक बाजारपेठांच्या कार्य पद्धतीचा अभ्यास करणे व या दोहोंचा सरकारच्या धोरणाशी संबंधित विविध बाबींवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे अशी असल्याने त्याच्या विचारांचा परिचय करुन घेताना प्रथम बाजारपेठांबाबत रुढ अर्थशास्त्राच्या अपेक्षा व गृहिते यांबाबत विचार करणे उपयुक्त होईल.

**रुढ अर्थशास्त्र व बाजारपेठा :**

बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्थेत प्रत्येकाने स्वहित साधण्याचा प्रयत्न केला तरीही सर्वांच्या प्रयत्नाचा अटळ परिणाम सर्वांचे हित साधण्यात होतो हे ॲडम स्मिथ यांचे विवेचन सुप्रसिद्ध आहे. नवसनातन अर्थशास्त्राने हा आशय अधिक नेमका व सैद्धान्तिकदृष्टया परिपूर्ण बनविण्याचा प्रयत्न केला. बाजारपेठेच्या कार्यातून निर्माण झालेली प्रत्येक समतोलाची स्थिती पॅरेटो पर्याप्त[1] असते हा कल्याणाच्या अर्थशास्त्रातील पहिला मूलभूत नियम समजला जातो. कोणतेही सैद्धांतिक निष्कर्ष गृहितांवर अवलंबून असतात त्याप्रमाणे हा नियमही गृहितांवर आधारलेला आहे. अनेक लिखित वा अलिखित गृहिते अशी आहेत की जी वास्तवाशी मिळतीजुळती नाहीत. उदा. मागणी पुरवठ्यातील संतुलन किंमत बदलांद्वारे दूर होते व समतोलाच्या परिस्थितीत मागणी व पुरवठा समान राहतील असे एक गृहित असते. पण मागणी व पुरवठा समान नसतानाही समतोलाची स्थिती असू शकते असे आता दिसून आले आहे. उदा. बेकारीची स्थिती असताना श्रमिकांचा पुरवठा जास्त असतो व ही स्थिती समतोलाची असते कारण ही स्थिती आपोआप बदलण्याची प्रवृती नसते किंवा कर्ज बाजारपेठेत मागणी वाढली तर कर्जाचा पुरवठा मागणीपेक्षा कमी असतो व कर्जाचे वाटप किंमतीशिवाय (म्हणजे व्याजाच्या दर) इतर घटकांच्या आधारे केले जाते. याशिवाय किंमती या रेषीय असतील असेही एक गृहित साधारण स्पर्धात्मक प्रतिमानात असते. प्रत्यक्षात मात्र जास्त माल घेतला तर सूट मिळण्याची पद्धत खूप सामान्य आहे.

माहिती-विशेषत: तिची उपलब्धता, ती गोळा करण्याची स्थिती याबाबतची गृहिते व वास्तव यातील फरक खूपच लक्षणीय आहे. माहिती सर्वांना उपलब्ध असते. माहिती गोळा करण्यास खर्च येत नाही. (हा खर्च वास्तविक स्वरुपातील असल्याने यांत वेळेचाही समावेश असायला हवा). या शिवाय या विवेचनात असेही अनुस्यूत आहे की माहिती निश्चित स्वरुपात (उपलब्ध) असते व त्यात इतर घटना व किंमत बदल यामुळे परिवर्तन होत नाही. दुसरे गृहित असे आहे की सर्व प्रकारच्या जोखीमींची बाजारपेठेत खरेदी विक्री होऊ शकते. या बाबींची वास्तवात पूर्तता होत नसेल तर शासकीय हस्तक्षेपाद्वारे जास्त चांगली स्थिती निर्माण करण्यास वाव उरतो. माहिती अपर्याप्त असेल व बाजारपेठा अपूर्ण असतील तर वैयक्तिक निर्णयाचे असे सार्वत्रिक परिणाम होतात जे व्यक्ती विचारांत घेत नाहीत व घेउ शकत नाहीत. उदा. विमा उतरवला म्हणून ज्या जोखीमीसाठी विमा उतरवला त्याबाबत व्यक्ती निष्काळजी बनल्या तर जोखीम वाढेल व विम्याची किंमतही. त्याला नैतिक जोखीम (Moral Hazard) ची समस्या म्हणतात. सरकारे आपल्या कर/ सवलत धोरणांचा उपयोग व्यक्तींचे

वर्तन बदलविण्यासाठी करु शकतात. खरे तर सरकारची कुवत वा वेगळेपण माहिती गोळा करणे किंवा तिचा चांगला उपयोग यांच्याशी निगडीत नाही. लोकांवर कर आकारणे, विविक्षित वर्तनास प्रतिबंध करणे या गोष्टी फक्त शासनालाच शक्य असतात. यात शासनाचे वेगळेपण आहे. वरील विवेचनावरुन सरकारला संभाव्य भूमिका आहे एवढेच सूचित होते प्रत्यक्षात शासन असेच करेल का हे, शासन ही मूलत: राजकीय संस्था असल्याने राजकीय कारणांवरही अवलंबून असेल.

माहिती बाबतच्या गृहितांचा संबंध इतर गृहितांशी देखील आहे. बाजारांची अपूर्णता देवघेवीच्या खर्चामुळेही (यांचा संबंध माहिती गोळा करण्याच्या खर्चाशी निगडित आहेच) उद्‌भवते. देवघेवीचा खर्च नगण्य नसला म्हणजे कित्येक वस्तुंच्या बाजारपेठा अस्तित्वात येणारच नाहीत. शिवाय संपूर्ण बाजार व स्पर्धात्मक बाजार या गोष्टीही परस्परविरोधी आहेत. वस्तुंची व्याख्या जेवढी नेमकी त्या प्रमाणात वस्तुंची संख्या जास्त व या बाजारातील खरेदी विक्री करणाऱ्यांची संख्या कमी असेल व अशा बाजारपेठा स्पर्धात्मक असणार नाहीत. उदा. धान्य ही एक वस्तु मानली तर या बाजारपेठेत विविध धान्याची खरेदी विक्री करणाऱ्यांची संख्या जास्त असेल व बाजारात स्पर्धात्मकताही असेल. पण धान्या ऐवजी वस्तुची व्याख्या गहू किंवा शरबती गहू अशी अधिक नेमकी केली की बाजारपेठेतील स्पर्धा कमी होण्याची शक्यता असते.

बाजारात देवघेव करणाऱ्या दोन व्यक्तींना माहितीची उपलब्धता भिन्न असणे याला माहितीची असमरुपता असे म्हणतात. या स्थितीत बाजारपेठेतील देवघेव मर्यादित राहाते व याचा परिणाम बाजारातील तरलता व स्पर्धात्मकता यावर अटळपणे होतो. विकसित देशांत वस्तुंचे वायदे बाजार प्रचलित आहेत पण खूप शेतकरी त्याचा फायदा घेत नाहीत कारण सट्टेबाजांची माहिती जास्त (बरोबर) असेल तर त्यांचाच फायदा होईल व अशा देवघेवी करणे शेतकऱ्यांच्या नुकसानीचे ठरेल. त्यामुळे सट्टेबाजांकडून फसवणूक करवून घेण्यापेक्षा किंमतीमधील चढ-उतारापासून येणारी जोखीम बहुतेक शेतकरी पत्करतात. अशीच परिस्थिती श्रम बाजारपेठेतही निर्माण होते. उदा. जे नोकरी शोधतात त्यांना स्वत:ची कुवत, प्रामाणिकपणा याबद्दल जेवढी माहिती असते तेवढी माहिती नोकरी देणाऱ्यांना नसते. समभागाच्या बाजारपेठेत व्यवसायाची खरी स्थिती फक्त प्रवर्तकांना माहिती असते; ही सर्व माहिती गुंतवणूकदारांना नसते. यामुळे समभागात होणारी गुंतवणूक पर्याप्त पातळीपेक्षा कमी प्रमाणात होईल. वित्तीय स्थितीबाबत जास्त (खरी) माहिती असते त्यामुळे ज्या कंपन्या विमा घ्यायला तयार आहेत त्यांना विमा संरक्षण देण्यास विमा कंपन्या तयार होणार नाहीत. किंमतीमधून किती माहिती प्रक्षेपित केली जाते हे बाजारपेठेच्या कार्यपद्धतीवर अवलंबून राहिल. माहितगार बाजार व संपूर्ण बाजार यांतही परस्पर विरोध दडला आहे. सर्व माहिती सर्वांना उपलब्ध असेल तर, माहिती गोळा करण्यातून काहीच फायदा होणार नाही व त्यामुळे कोणी माहिती गोळा करण्यात रुचि राखणार नाही. शिवाय नवीन सुधारणा व संशोधन यातून ज्या वस्तु भविष्यात वापरांत येतील त्यांच्या वायदे बाजारपेठा अगोदरपासून अस्तित्वात येतील असे मानणे तर्कदुष्ट आहे.

माहिती मिळवणे खर्चिक असेल तर त्याचा परिणाम बाजार पेठेतील स्पर्धेवर होईल. रुढ अर्थशास्त्र बाजार पूर्ण स्पर्धा युक्त असतील असे गृहित धरते. प्रत्यक्षात स्पर्धा असते पण ती परिपूर्ण नव्हे तर मक्तेदारीयुक्त असते. शिवाय स्थिर खर्चाच्या अस्तित्वामुळे सुद्धा स्पर्धेवर मर्यादा येतात. या व अशा अनेक कारणामुळे वास्तवातील बाजार पूर्ण स्पर्धायुक्त राहात नाहीत. या पैकी प्रत्येक घटकाचा सुटा परिणाम

वास्तवातील स्पर्धा पूर्ण स्पर्धेपेक्षा थोडीशी वेगळी होण्यात होत असेल पण अशा अनेक छोट्या कारणांचा एकत्रित परिणाम लक्षणीय होऊ शकतो. माहिती विषयक समस्या हाताळण्यात बाजारपेठा (निदान सरकारच्या तुलनेत) यशस्वी ठरतील असा दावा करण्यात येतो पण माहिती जमवणे खर्चिक असताना मुद्दाम ग्राहकांना गोंधळात टाकण्याचे प्रयत्न केले जातात. माहिती गोळा करण्याचे प्रयत्न सर्व ग्राहक करित नाहीत हे माहिती असल्याने कांही कंपन्या जास्त किंमत आकारुनही व्यवसायात राहू शकतात.

माहिती अर्थशास्त्राच्या आधारे ज्या बाजारपेठेतील समस्यांचा निर्देश होतो त्या ''जुन्या'' समस्यांपेक्षा जास्त व्यापक आहेत. जुन्या समस्या सार्वजनिक वस्तु वा प्रदुषण यासारख्या स्थितीत निर्माण होत असत. अशी परिस्थिती मर्यादित व सहजी ओळखता येण्याजोगी मानता येते. तुलनेत नवीन समस्या अधिक व्यापक आहेत. सर्व बाजारपेठा अपूर्ण आहेत, त्यात माहितीच्या समस्या असतात, व अशा स्थितीत शासनाच्या हस्तक्षेपाला वाव निर्माण होतो. समाजवादी व्यवस्थांनीही या समस्यांचा नीट विचार केलेला आढळत नाही. वास्तविक बाजारपेठात माहिती समस्या सामान्य असतील तर शासन त्या दूर करु शकेल का, त्यात काय राजकीय अडचणी उद्‌भवतील या प्रश्नांचा सैद्धांतिक व व्यावहारिक विचार झाला नाही.

**माहिती अर्थशास्त्र :**

कल्याणाच्या अर्थशास्त्रातील पहिला मूलभूत नियम असे मानतो की बाजारपेठेद्वारे कार्यक्षमता साध्य केली जाईल. माहिती अर्थशास्त्र बाबतच्या घडामोडींमुळे याबाबतच्या सैद्धांतिक भूमिकेला धक्का पोहचतो. कल्याणाच्या अर्थशास्त्रातील दुसरा मूलभूत नियम असे सांगतो की सर्व संभाव्य पॅरेटो पर्याप्त अवस्था बाजारपेठेद्वारे प्राप्त करता येतात. अडचण फक्त अशी असू शकते की संपत्ती व साधनांचे वाटप इष्ट पातळीवर नसेल तर सरकारला फेर वाटपाद्वारे आवश्यक ते वाटप साध्य करता येईल. याचा अर्थ असा लावण्यात येतो की वाटप व कार्यक्षमता यांचा जैविक संबंध नसतो; त्यांचा सुटा विचार करता येतो. बाजारव्यवस्थेतून जे वाटप होते ते मान्य नसेल तर सुरुवातीचे वाटप एका हप्त्यात दुरुस्त करावे लागेल. पण समतेचे उल्लंघन न करता असे करण्यासाठी सरकार जवळ पुरेशी माहिती नसते. सरकारच्या कररचनेचा आधार उत्पन्न, खर्च अशा दिसू शकणाऱ्या बाबी असतात; यांत बदल करता येउ शकतो व त्या प्रमाणात या पद्धतीत विरुपण येते. माहिती बाबतच्या समस्या विचारात घेतल्या की सरकारच्या योग्य फेरवाटपाच्या कुवतीवर मर्यादा पडतात. या मर्यादा नेमक्या किती प्रमाणात असतील हेही सुरुवातीच्या उत्पन्न वाटपावर अवलंबून असते. पण याबाबत प्रमुख व्यावहारिक अडचण अशी की सुरुवातीच्या वाटपात शासनाच्या हस्तक्षेपाद्वारे आवश्यक ते बदल करावे लागतात. पण हे प्रत्यक्षात शक्य नसते. किती पुनर्वाटप आवश्यक ठरेल हे निश्चित करणे सोपे नाही. शिवाय समानशील करांच्या द्वारे आवश्यक ते फेरवाटप साधणे प्रत्यक्षात कठीण जाते. हे असे होण्याचे कारण कराचा आधार नेहमीच उत्पन्न, किंवा संपत्ती यासारखे चल असतात व कर आकारणीला पायाभूत निकषात बदल केले जाउ शकतात. याचा परिणाम असा होतो की वाटपाचे व कार्यक्षमतेचे प्रश्न परस्परांशी निगडित बनतात. परंतु सुरुवातीचे उत्पन्न, वाटप व माहिती या बाबतच्या समस्या यांचा असमानता व कार्यक्षमता यांच्यातील नेमक्या संबंधावर परिणाम होतो. वाटपाच्या आणि योग्य प्रोत्साहने (Incentives) आखण्याचा समस्येचा जवळचा संबंध आहे. शेतीच्या वाटपात विषमता असेल तर जमीनीची मालकी व मजूर यांच्यात फार अंतर निर्माण होते. याचा परिणाम शेतीच्या

कार्यक्षमतेवर अटळपणे होतो. जमीनीचे वाटप असमान झाले म्हणजे बटाई (Share cropping) पद्धतीचा उदय होतो. सुरुवातीच्या काळात ही पद्धत अकार्यक्षमतेचे द्योतक मानली गेली. पण माहिती सिद्धांताच्या संदर्भात विचार करता जमीनदार व कुळे यांच्यात जोखीम वाटपाचा एक पर्याय या स्वरुपात बटाई पद्धत विचारांत घेता येते. परंतु काही वेळा असमानतेमुळे देखील कार्यक्षमतेच्या समस्या उत्पन्न होउ शकतात. उदा. मोठ्या प्रमाणात उत्पादनासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते. समभागाची मालकी असमान असेल तर कांही वेळा कंपनी व्यवस्थापन अधिक परिणामकारक ठरु शकते.

दुसऱ्या मूलभूत नियमाचा एक अर्थ असा की विकेन्द्रीकरण संभाव्यच नव्हे तर इष्टही आहे, कारण पॅराटो पर्याप्त असे कोणतेही वाटप सरकारच्या हस्तक्षेप किमान पातळीवर ठेवून किंमत व्यवस्थेद्वारे प्रत्यक्षात आणता येउ शकते. पण पॅरेटोपर्याप्त विकेन्द्रीकरण साध्य करण्यात खूपच अडचणी येतात. सरकारचा हस्तक्षेप जर फक्त रेषीय अप्रत्यक्ष करांच्या द्वारे होणार असेल तर असे शक्य होउ शकेल पण प्रत्यक्षात विकेंद्रीकरणाद्वारे पॅरेटोपर्याप्त वाटप संभवनीय नाही. माहिती अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून बाजारपेठा व समाजवाद या विषयांकडे बघणे उद्बोधक ठरते. बाजारपेठ सरस की समाजवाद ही चर्चा आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबवणाऱ्या भारतासारख्या अर्थव्यवस्थांनाही लागू पडते.

**भांडवलशाही व समाजवाद :**

साम्यवादी व समाजवादी व्यवस्था नेहमीच भांडवलशाही व्यवस्थेच्या तुलनेत, तिचा पर्याय म्हणून पाहिल्या गेल्या. रशियन क्रांतीनंतर बाजारपेठांच्या अभावी साम्यवादी/समाजवादी अर्थव्यवस्थांचे कामकाज कसे चालेल याबाबत वादविवाद घडले. हा वादविवाद होत असताना बाजारपेठेमार्फत मागणी-पुरवठ्यातील संतुलन किंमतबदलांद्वारे राखण्याचे काम नियोजित अर्थव्यवस्थेत नियोजन मंडळ करु शकेल कारण विविध वस्तुंचा पुरवठा व मागणी याबाबतची सविस्तर माहिती नियोजन मंडळाकडे असेल व या माहितीचा उपयोग करुन प्रयोग व प्रमाद पद्धतीने नियोजन मंडळाला किंमती ठरवता येतील असे मानले गेले. विविध वस्तुंची मागणी पुरवठा दर्शवणारी समीकरणे सोडवण्यासाठी पुरेसा मोठा संगणक नियोजन मंडळाकडे असला म्हणजे झाले ! भांडवलशाही व समाजवाद याची तुलनात्मक कामगिरी कशी आहे याचाही विविध प्रसंगी विचार झाला पण अशा तुलनेचे निकष सामान्यपणे तुलना करणाऱ्याच्या विचारांनुसार अभिनति स्वरुपाचे (Biased) राहिले. तरीपण निदान सहाव्या दशकाच्या मध्यापर्यंत साम्यवादी अर्थव्यवस्थांची कामगिरी भांडवलशाही व्यवस्थांच्या तुलनेत वरचढ समजली गेली. आर्थिक वाढीबरोबरच सामान्य लोकांना शिक्षण, आरोग्य, घरे व रोजगार यांचा पुरेसा पुरवठा ही साम्यवादी व्यवस्थांची मोठी उपलब्धी मानली गेली. नंतरच्या काळांत मात्र ही स्थिती बदलत गेली. साम्यवादी/समाजवादी व्यवस्थांसमोर पेचप्रसंग उभा झाला व विसाव्या शतकाच्या शेवटी प्रथम युरोपीय समाजवादी देशांनी बाजारपेठांचा मार्ग स्वीकारला तर पाठोपाठ सोविएत युनियनचे विघटन होउन त्याची भांडवलशाहीकडे वाटचाल सुरु झाली. साम्यवादी राजवटींचा अस्त होउन तेथे भांडवलशाहीची पुनर्स्थापना होणे हा अर्थातच भांडवलशाहीचा विजय मानण्यात आला.

साम्यवादी अर्थव्यवस्थांपुढे ज्या समस्या निर्माण झाल्या किंवा भूतपूर्व साम्यवादी अर्थव्यवस्थांनी बाजार पेठेकडील संक्रमण यशस्वीरित्या कसे पूर्ण करावे याबाबत अर्थशास्त्रीय सिद्धांतांपासून कांही मार्गदर्शन होईल का असा प्रश्न निर्माण होणे सहाजिकच म्हणावे लागेल. दुर्दैवाने

याबाबत रुढ अर्थशास्त्रीय सिद्धांतांपासून याबद्दल फारसे उपयुक्त मार्गदर्शन होत नाही. याचे कारण असे आहे की बाजारपेठांचे कार्य कसे चालते याबाबत रुढ अर्थशास्त्राचे मत खरे किंवा वास्तवाशी मिळते जुळते असते तर साम्यवादी अर्थव्यवस्था अत्यंत सुस्थितीत असायला हव्या होत्या ! या अनुभवावरुन रुढ अर्थशास्त्रास बाजारपेठेबाबत, विशेषत: त्यांच्या कार्यपद्धतीबाबत, जे म्हणायचे आहे त्याची वैय्यर्थता स्पष्ट होते. सैद्धांतिक घडामोडींचा विचार केला तर काही बाबी समाजवादी अर्थव्यवस्थांच्या बाजूने तर कांही विरुद्ध जातात. उदा. अस्तित्वातील बाजारपेठा, विशेषत: वायदे बाजार अपूर्ण असतात. त्या स्थितीत बाजार व्यवस्थेतील निर्णय अपर्याप्त राहू शकतात व सरकारी हस्तक्षेपाला वाव निर्माण होतो. समाजवादी व्यवस्थेत पुरेशा प्रोत्साहनांचा प्रश्न निर्माण होईल जो भांडवलशाहीत निर्माण होणार नाही असे मानले गेले. पण खरे तर भांडवलशाहीतही मोठ्या उद्योगात भांडवलाचे मालक व व्यवस्थापक अशी विभागणी होते व प्रोत्साहनांचा प्रश्न तेथेही उद्‌भवतो. त्यामुळे या समस्येची भांडवलशाहीत कशी सोडवणूक होते याचा विचार महत्वाचा ठरतो.

केन्स यांनी असे दाखविले की बेकारी सारख्या गंभीर समष्टीय समस्यांची भांडवलशाहीची चौकट न मोडता सोडवणूक करणे शक्य आहे व त्यामुळे समाजवादी व्यवस्थांची गरज कमी प्रमाणात भासेल. भांडवलशाहीतील स्पर्धेबाबत असे मानण्यात आले की स्पर्धात्मक बाजारपेठेबाबतचे विवेचन वास्तवातील भांडवलशाही व्यवस्थांना लागू पडत नाही, कारण वास्तवातील बाजारपेठा मक्तेदारी प्रवृत्तीमुळे स्पर्धात्मक राहात नाही किंवा स्पर्धेचे स्वरुप बदलते. त्यामुळे तुलना करायची तर ती स्पर्धात्मक बाजार व समाजवादी व्यवस्था अशी न करता मक्तेदारीयुक्त भांडवलशाही व समाजवादी व्यवस्था अशी व्हायला हवी. थोडक्यात, बाजारपेठेच्या व्यवस्थेचे अवास्तविक प्रतिमान व समाजवादी व्यवस्थेचे अपुरे प्रतिमान यांची तुलना करण्याचा हा प्रकार आहे.

**बाजारपेठा व बाजार समाजवाद : कांही मिथ्थे**

अलिकडील कित्येक वर्षात समाजवादाची आवश्यकता व शक्यता याबाबत चर्चा झालेली नाही. भांडवली अर्थव्यवस्थांनी आर्थिक आघाडीवर केलेली प्रगती हे यामागचे एक कारण असले तरी, निदान विद्यापीठीय वर्तुळात लागू पडणारे दुसरे कारण असे की बाजारपेठीय व्यवस्थेचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारी दैदिप्यमान आर्थिक सैद्धांतिक प्रमेये. पण अमेरिकेव्यतिरिक्त इतरत्र बाजारपेठेच्या श्रेष्ठत्वाकडे तेवढ्या श्रद्धेने कधीच बघितले गेले नाही. सरकारच्या भूमिकेबाबत गैरसमज पसरवणाऱ्या पाच महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख करणे उपयुक्त ठरेल. पहिली अतिशयोक्त बाब म्हणजे भांडवली व्यवस्थेतील किंमतीचे महत्व. एकतर असे समजण्यात कंपनी अंतर्गत व्यवहारांकडे दुर्लक्ष होते. काही बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आकार, व्यवहार छोट्या राष्ट्रांच्या उत्पन्नाबरोबरीने असतात हे लक्षात घेतले तर हा घटक दुर्लक्षणीय नाही हे स्पष्ट होते. शिवाय कंपन्या किंमती शिवाय ज्या इतर अनेक घटकांचा विचार करतात. उदा. वस्तुंचे साठे, त्याकडेही लक्ष दिले जात नाही. शिवाय आर्थिक व्यवहारांत पत (वट) या घटकांचे खूप महत्वाचे स्थान असते.

दुसरी अतिशयोक्ती सार्वजनिक क्षेत्रातील सामाजिक उद्दिष्टांशी संबंधित आहे. खाजगी कंपन्या त्यांच्या हिताचाच विचार करतात व प्रसंगी सामाजिक हिताचा बळी देतात व याला आळा घालण्याचे काम सार्वजनिक क्षेत्रात असते. पण प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्रातही अशा आस्थापनातील कामगार वा व्यवस्थापक यांच्या हिताचाच विचार होताना दिसतो. अमेरिकेतील सर्वात धोकादायक अणु प्रकल्प,

पर्यावरणबाबतचे नियम धाब्यावर बसवणारे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात आढळतात तर रसायन, अणुप्रकल्पातील रशियन सुरक्षा व्यवस्था पश्चिमी देशांच्या तुलनेत कमी दर्जाची आहे. उद्योगधंदे चालवताना उद्योगाचे व्यवस्थापक, मग ते खाजगी क्षेत्रातील असो वा सार्वजनिक, स्वत:चे हित साधताना इतर गोष्टींचा विचार करणार नाहीत ही बाब सर्व मोठ्या उद्योगात संभवते. व्यवस्थापक व मालक वेगळे असले की हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष टाळता येत नाही. सार्वजनिक क्षेत्राच्या संदर्भात विचार करताना सामाजिक हिताचा (त्याची नेमकी व्याख्या करण्यातल्या अडचणीचा विचार न करताही) प्रश्न उत्पन्न होतो. खाजगी क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या बाबतही असेच प्रश्न निर्माण होतात. भागधारकांचे हित व व्यवस्थापकांचे हित, छोट्या भागधारकांचे हित, याशिवाय कामगार, ग्राहक पुरवठादार अशा भिन्न घटकांचे हितसंबंध कंपनीचे व्यवस्थापन कशारीतीने चालते याच्याशी निगडित असते. हे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांबाबतही तेवढेच खरे आहे. अलिकडच्या काळांत हे प्रश्न निगम शासन या सदरात चर्चिले जातात. पण हे प्रश्न सार्वजनिक क्षेत्राबाबतही तेवढेच लागू आहेत.

बाजारपेठांवर आधारित व्यवस्थेवर घेण्यात येणारा आणखी एक आक्षेप असा की नियोजित अर्थव्यवस्थेत नियोजनाचा वापर केला जातो; तसे बाजार व्यवस्थेत होत नाही. पूर्वीच्या काळांत बाजारांतील किंमतीद्वारे विविध क्षेत्रात सुसूत्रता राखली जाते असे या आक्षेपाला उत्तर देण्यात येत असे. माहिती अर्थशास्त्राच्या चौकटीत असे म्हणता येत नाही कारण बाजारपेठा संपूर्ण असल्याशिवाय किंमतीद्वारे सुसूत्रता राखणे शक्य नसते हे आता मान्य होत आहे. पण बाजारपेठीय व्यवस्थेत नियोजन नसते असे मानणेही बरोबर नाही कारण कंपनी पातळीवर नियोजनाचा वापर होतोच व भिन्न कंपन्यात सुसूत्रताही राखली जाते. समग्र पातळीवरील नियोजन किती शक्य आहे, ते किती परिणामकारक ठरेल, याबाबत मतभिन्नता संभवत असली तरी विशिष्ट प्रकल्पांच्या उभारणीसाठी खूप सविस्तर नियोजनाची गरज असतेच. भिन्न आर्थिक व्यवस्थांचा विचार करताना केन्द्रीकरण व विकेन्द्रीकरण हा मुद्दा उपस्थित केला जातो. पण नियोजनाच्या मिथकाप्रमाणेच विकेन्द्रीकरणाचा मुद्दा खूप ताणला जातो असे दिसते. कोणत्याही व्यवस्थेत पूर्ण केन्द्रीकरण शक्य नसते. तसेच विकेन्द्रीत बाजारव्यवस्थेतही, कंपन्यांच्या अंतर्गत व्यवहारात बरेचसे निर्णय केन्द्रीकृत पद्धतीने घेतले जातात. त्यामुळे खरा मुद्दा केन्द्रीकरण का विकेन्द्रीकरण असा नसून रास्त प्रमाणातील विकेन्द्रीकरण निवडण्याशी संबंधित आहे. मालकी हक्कांचे महत्वही बऱ्याच वेळा अतिशयोक्त पद्धतीने मांडले जाते. एकदा मालकी हक्क व्यवस्थितरित्या प्रस्थापित झाले, मग ते कुणालाही मिळोत, कार्यक्षमतेचा प्रश्न सोडवला जाईल. मालकी हक्कांचे वाटप रास्त नसेल तर तो प्रश्न प्रत्यक्ष कराद्वारे सोडवता येईल अशी भूमिका घेतली जाते व खाजगीकरणावर अवाजवी भर देण्यात येतो. या प्रक्रियेत इतर महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होते. सर्वात मोठी समजूत म्हणजे निवडीसाठी फक्त दोन पर्याय/ मार्ग (समाजवाद व भांडवलशाही) आहेत असे मानणे. साम्यवादी राजवटीच्या अस्तानंतर तर एकच मार्ग उरतो ! पण असे मानणे खरे नाही हे थोडासा विचार केला तर लक्षात येईल. एक तर भांडवलशाही व्यवस्थेत एकवाक्यता नसल्याने भिन्न भांडवलशाही मार्गात निवड संभवू शकते. जपान, कोरिया वा सिंगापूर या देशांतील शासनाची भूमिका केवळ निर्हस्तक्षेपाची नव्हती. या देशांतील शासनाची भूमिका, बँका व वित्तीय संस्थांची भूमिका युरोप अमेरिकेतील भूमिकांपेक्षा वेगळी होती. यूरोप/अमेरिका व आशियातील अर्थव्यवस्था भांडवली पद्धतीच्या

असल्या तरी त्यांच्यातील संस्थागत फरक लक्षणीय आहेत व त्यातील निवड सोपी वा उघड नाही. दुसऱ्या पातळीवर, ना नफा तत्वावर काम करणाऱ्या संस्था, किंवा सहकारी तत्वावरील संस्था स्थानिक पातळीवरील प्रश्नांबाबत जास्त उपयुक्त ठरतात. या संस्थाही भांडवलशाहीला एक संभाव्य पर्याय ठरु शकतात.

**किंमती व प्रोत्साहने :**

समाजवादाच्या पुरस्कर्त्यांनी बाजारपेठ व नियोजन यांच्यातील साम्य दाखवताना किंमतीचे महत्व मान्य केले; प्रश्न फक्त किंमती कशा ठरतील याबाबत होता. बाजारपेठा मागणी पुरवठ्याच्या संतुलनातून किंमती ठरवतात हेच काम सरकारचा दृष्य हात करु शकेल असे लांज व टेलर[2] यांचे प्रतिपादन होते. याचा एक परिणाम असा झाला की सर्व चर्चा सरकारे ''रास्त'' किंमती ठरवू शकतील का त्यावरच केन्द्रीय झाली व किंमतीच्या भुमिकेबाबत कांहीच चर्चा झाली नाही. याचा परिणाम किमतींना अवाजवी महत्व मिळण्यात झाला. याकडे बाजारपेठेच्या पुरस्कर्त्याप्रमाणेच समाजवादाच्या पाठीराख्यांनीही दुर्लक्ष केले. समाजवादी व्यवस्थेत प्रोत्साहनांचा प्रश्न व्यवस्थितरित्या हाताळला जाणार नाही असे म्हटले गेले पण खरे तर या प्रश्नाकडे नव सनातन पंथानेही दुर्लक्षच केले. कामगाराला 8 तास कामाबद्दल पगार मिळतो. त्याने काम न केले तर पगारच मिळणार नाही. पण व्यवहारात कामगारावर देखरेख ठेवून त्यांच्याकडून पूर्ण वेळ, नीट काम करवून घेण्याचा प्रश्न महत्वाचा असतोच. पैसे उसने देणाऱ्यांना कर्जाचा उपयोग नीट होतो का नाही ही चिंता असते. पण आर्थिक सिद्धांत मांडताना या सर्व समस्या विवेचनातून वगळल्या जातात. हवी असलेली माहिती सहजासहजी मिळवता येते असे गृहित धरले आहे. अनिश्चिततेला वगळले की निर्णय घेण्यातले नाट्य संपते. तिसरी गोष्ट अशी की करारांची अंमलबजावणी सुलभतेने होते. ही तिन्ही गृहिते वास्तवात उतरत नाहीत व प्रोत्साहनांचा प्रश्न उत्पन्न होतो. मात्र या समस्या फक्त सोविएत युनियनच्या संदर्भात विचारांत घेतल्या गेल्या व असे समजले गेले की खाजगी मालमत्ता व बाजारपेठा अस्तित्वात आणल्या की या समस्या चुटकीसरशी सुटतील. पण असे समजणे बरेचसे बालिशपणाचे आहे कारण खाजगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगातही अशा समस्या उद्‌भवतातच.

मोठ्या कंपन्यात व्यवस्थापन व मालकी हक्क यांच्यात विभागणी झालेली असते. व्यवस्थापकांनी समभागधारकांचे हित लक्षात ठेवून कारभार करावा अशी अपेक्षा असते. समभाग धारकांना व्यवस्थापक नेमण्याचा व त्यांना कामावरुन काढण्याचा पूर्ण अधिकार असतो. पण व्यवहारांत भागधारकांचे हित कशात असते, सर्व भागधारक सहभागी नसतील तर त्यांचे हित कशात आहे हे कसे ठरवायचे, ही एक समस्या उत्पन्न होते. समभागधारकांचे हित व व्यवस्थापकांचे हित यांत विरोध निर्माण झाला तर व्यवस्थापक स्वतःचे हित साधण्याचा प्रयत्न करणार नाहीत याची तजवीज कशी करता येईल हा दुसरा प्रश्न उत्पन्न होतो. व्यवहारांत भागधारकांचा एक गट व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवू शकतो. अशा स्थितीत छोट्या भागधारकांचे हित कसे साधले जाईल हा देखील एक गहन प्रश्न बनतो. वास्तवात समभागधारकांच्या लोकशाहीचे स्वरुप काय असते, व्यवस्थापकांवर परिणामकारक नियंत्रण कसे ठेवावे, त्यांचे वेतन त्यांच्या कामाशी कसे निगडित करता येईल. यासर्व समस्या भांडवलशाही देशात आजही सुटलेल्या नाहीत. मुळात वेतनांचा संबंध उत्पादनाशी/कामाशी जोडणे सोपे नाही. बहुतेक व्यवस्थापकीय निर्णय समाईक रितीने घेतले जातात त्यामुळे यशापयशाची जबाबदारी व्यक्तिगत पातळीवर निश्चित करणे कठीण जाते किंबहुना तसे

करता येऊ नये हा हेतू ठेवूनच निर्णय प्रक्रिया आखली जाते. उत्पादनाधारित वेतनाची रचना गुंतागुंतीची असते व फक्त वेतनदराशीच निगडित नसते. याचे स्पष्टीकरण माहिती अर्थशास्त्राच्या चौकटीत करता येते. व्यवस्थापकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम अप्रत्यक्षपणे भांडवल बाजारामार्फत होते कारण बाजारातून समभागाची खरेदी करुन अकार्यक्षम व्यवस्थापकांना काढून टाकणे शक्य असते. प्रत्यक्षात कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याची बाजारपेठ किती कार्यक्षम आहे याबाबतही वादविवाद होतात. कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भांडवली बाजारपेठांना पर्याय म्हणून बँका व इतर वित्तीय संस्थांचा उपयोग करण्याची परंपरा जपान व जर्मनी या देशांत आहे. या सर्व घटकांचा विचार पूर्व साम्यवादी देशांच्या संदर्भात करायला हवा पण खाजगी मालमत्तेचा हक्क व बाजारपेठा प्रस्थापित करुन या सर्व समस्या सुटतीलच असे म्हणता येत नाही. खरे तर चीनच्या अनुभवावरुन, विशेषतः दक्षिणेकडील राज्यातील प्रगती सर्व स्तरावरील खाजगी व शासकीय तसेच, केन्द्र, राज्य व स्थानिय-संस्थांपर्यंत झिरपली असल्याने तेथे संस्था नियंत्रणाच्या नव्या पद्धती अनुसरल्या असल्या पाहिजेत असे दिसते. अशा पद्धतींचा विचार भांडवलशाही देशांनाही उपयुक्त ठरेल.

**बाजारपेठा व किंमती :**

किंमतीना रुढ अर्थशास्त्रात महत्वाचे स्थान आहे. मागणी पुरवठ्यातील बदलानुसार बाजारातील किंमती ठरतात व किमती बदलानुसार अर्थव्यवहार नियंत्रित होतात असे रुढ अर्थशास्त्र मानते. लांज, टेलर यांची टीका किंमतीच्या महत्वाबाबतची नव्हती; लांज व टेलर यांना किंमतीचे महत्व मान्यच होते. पण त्यांचे म्हणणे असेही होते की बाजारपेठांच्या अभावी सरकार किंवा नियोजन मंडळ किंमती ठरवू शकेल व या किंमतीना नियोजित अर्थव्यवस्थेत तेच स्थान असेल जे बाजार पेठेतील किंमतीना भांडवलशाही व्यवस्थेत असते. अनिश्चितता व अपुरी माहिती हे घटक विचारांत घेतले म्हणजे अर्थव्यवस्थेतील किंमतीच्या स्थानाबद्दल फेरविचार आवश्यक बनतो.

वस्तुंचा बारकाईने विचार करता असे आढळते की वास्तवात वस्तुंमध्ये खूप विविधता असते. गहू वा ज्वारी या ''वस्तु'' चा वास्तवातील आविष्कार खूप जटील असतो. या दोहोंच्या भिन्न जाती तर असतातच पण त्याशिवाय ठिकाण, काळ यानुसार फरक पडतो. औद्योगिक वस्तुंच्याबाबत जास्तच जटिलता उद्‌भवते. याचा परिणाम असा होतो की या भिन्न वस्तुंच्या किंमती नियोजन मंडळाला ठरविता येत नाहीत. वस्तुंचे गुणदोष विनिर्देशित करण्यात आले व प्रत्येक वस्तुंची किमत ठरवली तरी असे केल्याने उत्पादनात बदल करुन खर्च कमी करण्याचे प्रयत्नांत अडथळा निर्माण होईल. रुढ अर्थशास्त्र व समाजवादाचे पुरस्कर्ते यांनी मानल्याप्रमाणे वस्तुंचे उत्पादक व ग्राहक यांच्यातील संबंध फक्त किंमतीच्या चौकटीत मर्यादित राहात नाहीत. ग्राहकांच्या गरजा जाणून त्याप्रमाणे वस्तु निर्माण करणे ही एका अर्थी सौदेबाजी आहे पण त्यात किमतीशिवाय ग्राहकांच्या इतर गरजांचाही विचार होत असतो. वस्तुचा दर्जा, अचूक माप, सोईस्कर वाटप या गोष्टी विचारांत घेऊन ग्राहक जादा किंमत देण्यास तयार असतात हे सहज मान्य होईल.

वास्तवात असणाऱ्या वस्तुजगतातील व्यामिश्रतेमुळे वस्तुंच्या बाजारपेठा पूर्ण स्पर्धायुक्त नसतात. याच कारणामुळे वस्तुंविषयीची माहिती परिपूर्ण तर नसतेच पण माहिती गोळा करण्यात त्रास/ खर्च होतो. या स्थितीत किंमतीचा परिणाम वस्तुंच्या सरासरी दर्जावर होतो. श्रम बाजारपेठेत जास्त वेतनदरावर काम करण्यास चांगले कामगार मिळतात

हा सामान्य अनुभव आहे. व्याजाच्या दरावर कर्जाचा दर्जा (कर्जाची परतफेड होईल का नाही) अवलंबून असतो. जास्त व्याज दरावर '' अप्रामाणिक'' कर्जदारच कर्जे घेतील. या पद्धतीने किंमतीवर वस्तुंचा दर्जा अवलंबून राहात असताना समतोलाच्या स्थितीत मागणी व पुरवठा सारखे नसतात; अतिरिक्त मागणीचे रेशनिंग होते. या कारणामुळेच बेकारीच्या स्थितीत वेतनाचे दर कमी करुन ''समतोल'' साधला जात नाही व एका मर्यादेनंतर बँका जास्त दराने (जोखमी) कर्जे न देता पत नियंत्रण करतात. यावरुन किंमतीचे महत्व आर्थिक सिद्धांतात मानले जाते त्यापेक्षा पुष्कळच वेगळे असते. हे लक्षात येते ज्याबाजारात मागणी-पुरवठा समान पातळीवर येउ शकत नाहीत तेथे बिगर-किंमत घटकांचे महत्व नजरेआड करता येत नाही. वस्तुंच्या टंचाईबाबत किंमती इतकाच त्यांच्या साठ्यातील बदलां बद्दलच्या माहितीचा उपयोग होउ शकतो. अशा स्थितीत किंमतीद्वारे वस्तुंच्या टंचाई बाबतची माहिती प्रक्षेपित झाली नाही तरी वस्तुंच्या दर्जाविषयी मिळतो. बिगर किंमत घटकांचे महत्व बाजार व्यवस्थेतही दुर्लक्षणीय नसते. उत्पादनाचे बरेच व्यवहार कंपनी अंतर्गत होतात. बहुराष्ट्रीय कंपन्यात हे फारच सहजासहजी होते. हे निर्णय किंमतीवर, त्यातल्या त्यात बाजार किंमतीवर अवलंबून नसतात. भांडवलाचे वाटपही लिलाव पद्धतीने जो जास्त दराने व्याज देईल त्याला (भांडवली) कर्जाचे वाटप होत नाही. करार पाळणे व लौकिक टिकवणे या गोष्टी या संदर्भात विशेष लक्षणीय आहेत. सर्व करारांमध्ये किंमतीशिवाय इतर घटकांना (उदा.तारण, इतर मार्गाने कर्ज उभारण्यावर बंदी इ.) महत्व असते. लौकिकाचे व्यवहारातील महत्व विचारांत घेतले म्हणजे खंडाचे महत्व लक्षांत येते. या स्थितीत किंमती सीमान्त खर्चाच्या पातळीवर ठरतील असे मानणे चूक ठरते.

**स्पर्धा :**

स्पर्धेच्या आवश्यकतेबाबत - विशेषत:पूर्ण स्पर्धेच्या - आणि तिच्या इष्टतेबाबत अर्थशास्त्रज्ञ नेहमीच ठाम व अनुकूल भूमिका घेतात. पण व्यापार उद्योगातील लोकांचे तसे नसते. बऱ्याच वेळा तो अन्याय / गळेकापू स्पर्धेविषयी जास्त चिंतित असतात. यातील एक भाग स्वत:च्या संकुचित हित साधण्यासाठी स्पर्धेला खीळ घालणे असा असू शकतो. पण या मत भिन्नतेतून स्पर्धेकडे पहाण्याचे भिन्न प्रकार दिसून येतात. स्पर्धेबाबतचा विचार बाजारपेठा, प्रोत्साहने व विकेन्द्रीकरण या तीन बाबींशी संबंधित असतो. स्पर्धेपासूनचे फायदे या घटकांपासून मिळतात. व्यवहारात स्पर्धेबाबतच्या कल्पना भिन्न तर असतातच पण त्या अर्थशास्त्रज्ञांना प्रिय असणाऱ्या पूर्ण स्पर्धेपेक्षा निराळ्या असतात. प्रत्यक्ष व्यवहारात आढळणारी स्पर्धा निरनिराळया कारणांमुळे - विशेषत: अपुऱ्या माहितीमुळे - अपूर्णच राहाते. त्यामुळे स्पर्धा हा घटक महत्वाचा असला तरी त्याचा परिणाम वेगळ्या रितीने लक्षात घेतला पाहिजे.

पूर्ण स्पर्धेची नव सनातन कल्पना मागणी वक्र क्ष अक्षाशी समांतर असण्यातून व्यक्त होते. उत्पादक वा विक्रेते यांची संख्या एवढी जास्त असते की बाजारातील किंमतीवर कोणा एकाचाच प्रभाव पडू शकत नाही. दिलेल्या बाजार किंमती लक्षात ठेवून उत्पादन करणे एवढेच उत्पादकांच्या हातात असते. या स्थितीत नवीन तंत्राचा वापर करणे किंवा इतर कोणताही बदल करुन विक्री / नफा वाढवण्याला कांहीच प्रोत्साहन नसते. एका अर्थी पूर्ण स्पर्धा ही स्पर्धा नसतेच कारण बाजारातील समतोल बिघडवण्याचे सामर्थ्य कोणातच नसते. पण प्रत्यक्षात मागणी वक्र क्ष अक्षाशी समांतर आहे. असा उत्पादकांचा अनुभव नसतो. प्रत्यक्षातील स्पर्धा अपूर्ण, मक्तेदारी युक्त असते किंवा शुम्पिटर यांनी

कल्पिल्याप्रमाणे असते. पण या सर्व कल्पना ॲरो/ डेब्रु यांच्या प्रतिमानातील स्पर्धेपेक्षा खूपच वेगळ्या असतात.

समजण्यास सोपी अशी स्पर्धेची कल्पना म्हणजे शर्यत. शर्यतीत तुम्ही इतरांच्या तुलनेत कसे आहात याला महत्व असते. शर्यतीत सहभागी लोक हिरिरीने जास्त चांगले, लवकर काम करण्याचा प्रयत्न करतात. शर्यतीतून महत्वाची माहिती मिळते. चांगले काम कोण करत आहे हे शर्यत/ स्पर्धे मधूनच समजते. जपानी कार उत्पादक अमेरिकन उत्पादकांपेक्षा जास्त कार्यक्षम आहेत हे जपानने अमेरिकेत कारखाने काढल्यावरच सिद्ध झाले. मात्र कांही वेळा स्पर्धेतून हेवेदावे उत्पन्न होतात व ती निरोगी राहात नाही. मुख्य म्हणजे स्पर्धा किंमतींबाबतच मर्यादित राहात नाही. ती तंत्रशास्त्र, वस्तुचा दर्जा, विक्री व्यवस्था यासर्वांशी निगडित बनते. शर्यतीचा परिणाम आर्थिक कार्यक्षमता वाढण्यात होतो का याचे नेमके उत्तर देणे (याबाबत अर्थशास्त्रज्ञाचे एकमत असले तरी) शक्य नाही. परिपूर्ण स्पर्धा असेल तर निश्चितपणे होकारार्थी उत्तर देता येईल पण अपूर्ण स्पर्धेबाबत असे सोपे उत्तर शक्य नाही. एकस्व (पेटंट) मिळविण्याच्या शर्यतीचा परिणाम कदाचित संशोधन व विकास यावर अनाठायी खर्च होण्यात होउ शकेल.

स्पर्धेला बिगर अर्थशास्त्रीय बाजू पण आहेत. स्पर्धेमुळे व्यक्ती समाजशील बनते, गटाचा भाग बनणे सोपे होते. यामुळे सहकार्य सुलभ बनते. याभुळे शिक्षणात सांघिक खेळांना महत्व मिळते व कंपन्यात ही उत्पादनाची रचना परस्परांशी स्पर्धा करणाऱ्या गटात केली जाते. पण स्पर्धेचे विपरित परिणामही होतात. जसे इतरांच्या हिताचा विचार न करता किंवा जरुर तर त्याचा बळी देउन स्वतःचे संकुचित हित साध्य करण्यासाठी एकत्र येउन केले जाते म्हणजे संगनमत केले जाते.

**स्पर्धा नीति :**

वास्तवात परिपूर्ण स्पर्धा नसल्याने, मोठ्या उत्पादक विक्रेत्यांना परस्पर संगनमताने ग्राहक हिताचा बळी देता येऊ नये म्हणून सरकारने स्पर्धात्मकता टिकवावी असा विचार मांडला गेला. परंतु मोठ्या उत्पादनाचे फायदे असतात त्या क्षेत्रात स्पर्धा टिकवण्यासाठी कशा स्वरुपाचा हस्तक्षेप असावा हे स्पष्ट नव्हते. त्यामुळे मोठ्या उत्पादनाचे फायदे मिळावेत म्हणून कंपन्यांचा आकार मोठा होउ द्यावा की मक्तेदारीतून निर्माण होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी त्यांच्या विस्तारावर बंधने असावीत याचे स्पष्ट उत्तर देणे कठीण बनले होते. स्पर्धानितीचा वापर करु नये याचे एक कारण ॲरनोल्ड हॅरबर्गर यांनी दिले आहे. त्याचे विवेचन असे की, मक्तेदार गिऱ्हाइकांना जास्त किंमती आकारतील. पण याचे प्रमाण एकंदर राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत खूप कमी असेल. दुसरा मुद्दा असा की मक्तेदारीत जास्त किंमतीमुळे उत्पन्नाचे वाटप कांहीसे अवाजवी होईल व करधोरणात आवश्यक बदल करुन उत्पन्न वाटप सुधारणे शक्य असेल. स्पर्धा नीति आखून तिची अंमलबजावणी करण्यापेक्षा कररचनेत बदल करणे खूपच सोपे असेल. स्पर्धा नीतिचा फोलपणा सिद्ध करण्याचा दुसरा प्रयत्न जास्त परिणामकारक ठरला. मक्तेदारही किंमती फार जास्त प्रमाणात वाढवू शकणार नाहीत कारण प्रत्यक्ष स्पर्धा किती आहे याला महत्व नसून संभाव्य स्पर्धा किती आहे ही बाब महत्वाची आहे. स्पर्धेवर कोणत्याच वास्तविक मर्यादा नसतात या गृहितावर हे विवेचन आधारलेले आहे. ज्या बाजारात संभाव्य स्पर्धेमुळे उत्पादकांना स्पर्धात्मक बाजारपेठेत असल्याप्रमाणेच वागावे लागते अशा बाजारांना चढाओढीचा बाजार म्हणतात व अशा बाजारपेठा प्रत्यक्षात असल्या तर स्पर्धानिती अनावश्यक बनते.

या युक्तिवादाचा प्रतिवाद स्टिगलिट्झ यांनी

केला आहे. त्यांचे हे विवेचन तीन बाबींवर आधारलेले आहे. 1. प्रत्यक्षातील बाजारपेठेतील अपूर्णतेने नवीन प्रवेशावर व स्पर्धेवर खूप मर्यादा येतात. अपूर्ण स्पर्धा असताना उत्पादक अशा खूप गोष्टी करतात ज्यामुळे उत्पादक परस्परांशी संगनमत करतील व स्पर्धेवर मर्यादा येतील, यामुळे केवळ जास्त किंमतीच आकारल्या जातील असे नव्हे तर त्यामुळे इतर अकार्यक्षमता उद्‌भवतील. मक्तेदारीमुळे होणारे जन कल्याणातील नुकसान हॅरबर्गर यांच्या अंदाजापेक्षा खूप जास्त असेल. प्रत्यक्षातील बाजारपेठांकडे एक नजर टाकल्यास त्यामधील उत्पादक त्यांच्यासमोर क्ष अक्षाशी समांतर मागणी वक्र आहे असे समजत नाहीत हे स्पष्ट होईल. कित्येक उद्योगात उत्पादकांची संख्या थोडी असते. माहितीची अपूर्णता हा अजून एक महत्वाचा घटक आहे. वस्तुंच्या किंमती, त्याचा दर्जा याबाबतची पूर्ण माहिती ग्राहकांना नसते, त्यांना ती मिळत नाही किंवा त्यात त्याना रस नसतो. या स्थितीत किंमत वाढवली तर उत्पादक सर्व ग्राहक गमावतील वा किंमत कमी केली तर सर्व बाजारपेठ ताब्यात घेउ शकतात असे होत नाही. या स्थितीत स्पर्धात्मक किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारणे कठीण नसते व परस्परांशी संगनमत करुन किंमती मक्तेदारी पातळीपर्यंत देखील वाढवता येतात. वित्तीय बाजारपेठांत माहिती अपूर्णता हा घटक अधिक महत्वाचा बनतो. माहितीच्या अपूर्णतेमुळे वित्तीय बाजारपेठेतील स्पर्धा अपुरी राहाते. निमग्न परिव्यया (Sunk cost)मुळे नवीन प्रवेशाला बंधने पडतात ही गोष्ट सर्वमान्य आहे.परंतु या संदर्भात महत्वाची बाब, आज किती नफा आहे ही नसून नवीन प्रवेशानंतर किंमती काय असतील व नफा किती राहिल हे महत्वाचे आहे. नवीन प्रवेशानंतर किंमती मुद्दाम खाली आणण्याची शक्यता असेल तर नवीन प्रवेशावर मर्यादा पडतीलच. एकदा मक्तेदारी निर्माण झाली की ती चालू राहाण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे संभाव्य स्पर्धेचा परिणाम खूपच मर्यादित राहातो. बाजारपेठेकडे वाटचाल करणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या संदर्भात स्पर्धेचा मुद्दा खाजगीकरणाच्या गतीशी निगडित असतो असे समजण्यात येते. मात्र वेगवान खाजगीकरणाने स्पर्धात्मकता त्वरित निर्माण होईल असे मानता येत नाही. स्पर्धेसाठी व्यवस्थित कार्य करणाऱ्या वित्तीय बाजारपेठा आवश्यक असतात. करारांचे पालन होईल व दिवाळखोरीच्या कायद्यांची अंमलबजावणी होईल अशी कायदे व्यवस्था ही अजून एक पूर्व अट आहे. स्पर्धेला सरकारची संमती आहे असा सार्वत्रिक विश्वास निर्माण व्हायला हवा. त्याशिवाय स्पर्धात्मक व्यवस्था प्रत्यक्षात येणे कठीण आहे.

**शोध व तांत्रिक प्रगती :**

गेल्या शतकांत नवनवीन शोध व तांत्रिक बदलांनी कामगारांची उत्पादकता वाढली, लोकांच्या जीवनमानात सुधारणा झाली. असे तांत्रिक बदल घडण्यास अनुकूल वातावरण निर्माण होते हे भांडवलशाहीच्या यशाचे एक महत्वाचे कारण आहे. दुसऱ्या बाजूने साम्यवादी देशांना लष्कराशी संबंधित कांही क्षेत्रे वगळता नवे शोध व तांत्रिक प्रगतीला पोषक वातावरण राखता आले नाही हे समाजवादाच्या पाडावाचे एक महत्वाचे कारण आहे. बाजारपेठा व नियोजित व्यवस्था यामधील चर्चेत वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीला काही स्थान नव्हते त्याच प्रमाणे अर्थव्यवस्थेच्या नवसनातन पंथीय प्रतिमानातसुद्धा या गोष्टींना काहीच महत्व नव्हते. ॲरो-डेब्रु यांचे प्रतिमान बाजारपेठेचे सर्वात प्रगत विवेचन आहे व ते बाजारव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे समर्थन करते. या प्रतिमानात तंत्रशास्त्रीय बदलांचा विचार होत नाही कारण तसे बदल होत नाहीत असे गृहित धरले आहे. नवसनातन पंथीयांनी तांत्रिक बदलांकडे लक्ष दिले नाही याचा परिणाम असा झाला की ज्यांना

बाजारव्यवस्थेला पर्याय निर्माण करायचा होता त्यांनीही त्याकडे दुर्लक्षच केले / ॲरो-डेब्रु यांच्या प्रतिमानात तांत्रिक बदलांकडे दुर्लक्षच झाले आहे असे नाही तर या प्रतिमानाची चौकट तंत्रशास्त्रीय बदलांचा विचार करण्यास उपयुक्त नाही. कांही वर्षांपूर्वी असे सुचविले गेले असते की प्रथम तंत्रशास्त्रीय बदलांसारखे किचकट घटक बाजूला ठेवून अर्थव्यवस्थेचे कामकाज समजून घेतल्यानंतर या घटकाचे विवेचन करण्यासाठी प्रतिमानात थोडेसे बदल करता येतील. आज तसे म्हणणे कठीण आहे कारण तंत्रशास्त्रीय बदलांकडे लक्ष न देता आजच्या उद्योगांचा अभ्यास करताच येणार नाही. माहिती/ज्ञान निर्मितीची क्षेत्रे इतर वस्तु निर्मिती करणाऱ्या क्षेत्रांपेक्षा भिन्न असतात व म्हणून वस्तुनिर्मितीच्या क्षेत्राबाबतचे विवेचन माहिती/ज्ञान निर्मिती या क्षेत्राला लागू करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरतात. ज्या वस्तु ज्ञात आहेत त्या वस्तुंच्या बाजारपेठा देखील ॲरो-डेब्रु यांच्या अर्थाने पूर्ण नसतात मग ज्या वस्तू आज पूर्णतः माहितच नाहीत त्याच्या बाजारपेठा पूर्ण नसतील यात आश्चर्यकारक कांहीच नाही. माहिती क्षेत्रात वस्तू एकजिनसी नसतात त्यात भिन्नता असते याचा परिणामही स्पर्धेच्या स्वरुपावर होतो. माहितीच्या स्वरुपाबाबतचे गृहित माहिती/ज्ञानाच्या बाजारांत खरे नसतेच. विक्रेत्या-उत्पादकाला वस्तुची सविस्तर माहिती असते पण खरेदीदाराला ती माहिती नसते. पण खरेदीदाराला पूर्ण माहिती आधीच मिळाली तर मग साहजिकच तो ती विकत घेणार नाही. प्रत्यक्षात माहिती/ज्ञान याबाबतचे व्यवहार होत असतात पण या बाजारपेठा ॲरो-डेब्रु यांच्या प्रतिमानापेक्षा फारच वेगळ्यारितीने कार्य करतात. माहिती व ज्ञान या सार्वजनिक वस्तुशी खुप साम्य राखतात. माहिती/ज्ञान यांचे सर्व फायदे संशोधकाला मिळतातच असे नाही. एकस्व (Patent) व्यवस्थेत असे संरक्षण कांही प्रमाणात मिळते पण एकंदरीत माहिती/ ज्ञान यांचे सुपरिणाम इतरांपासून राखून ठेवता येत नाहीत. इतरांबरोबर वाटून घेतल्यामुळे या वस्तु कमी होत नाहीत हे सार्वजनिक वस्तुंप्रमाणेच माहिती/ज्ञान याबाबतही खरे आहे. पण असे असूनही साम्यवादी राजवटींना तंत्रशास्त्रीय प्रगती, संरक्षण क्षेत्रापुरतीच करता आली कारण फक्त या क्षेत्रातच उद्दिष्टे आखणे व त्याचा आढावा घेणे केन्द्रीय पद्धतीत शक्य असते. परंतु इतर क्षेत्रात असे करणे शक्य होत नाही. किंमतींच्या द्वारे माहिती प्रसारित होत नसल्याने ग्राहक व उत्पादक यांच्यात, तसेच विविध उत्पादकांमध्ये सतत संपर्क आवश्यक असतो. असे करणे केन्द्रीय, नियोजित व्यवस्थेपेक्षा विकेन्द्रीत बाजारव्यवस्थेत अधिक सोपे बनते.

संशोधनावर खर्च केला जातो कारण त्यापासून नफा मिळणे अपेक्षित असते. पण स्पर्धा अपुरी असल्याशिवाय असा नफा मिळणे दुरापास्तच ठरेल. सरकारे मात्र ही अडचण ओळखतात व एकस्व (Patent) द्वारे कांही कालावधीपर्यंत संरक्षण पुरवतात. केवळ तंत्रशास्त्रीय बदल होण्यासाठीच अपुरी स्पर्धा आवश्यक असते असे नव्हे. तंत्रशास्त्रीय बदलांमुळे स्पर्धा अधिकच अपुरी होते. कांही गोष्टी पुन्हा पुन्हा केल्याने त्या करणे सोपे व व कमी खर्चाचे होते. उत्पादन जेवढ्या मोठ्या प्रमाणावर तेवढे असे फायदे देखील लक्षणीय ठरतात. त्यामुळे अपेक्षेपेक्षा खूप जास्त क्षेत्रे नैसर्गिक मक्तेदारी ठरतात. संशोधन व विकास यावरील खर्च स्थिर खर्चाप्रमाणे नवीन प्रवेशावर अडथळा ठरतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेची खूप क्षेत्रे नैसर्गिक मक्तेदारी जरी नाही तरी नैसर्गिक अल्पजनाधिकार (Oligopoly) ठरतात. याचा परिणाम म्हणजे प्रत्यक्ष व संभाव्य स्पर्धा मर्यादित होते. अशा रीतीने मर्यादित स्पर्धेची क्षेत्रे खूप सामान्य होतात. या स्थितीचा संशोधन विकासाच्या गतीवर काय परिणाम होतो हा अजून एक निराळा प्रश्न आहे.

**विकेन्द्रीकरण :**

विकेंद्रीकरण म्हणजे निर्णयाचे स्वातंत्र्य व जबाबदारी वरच्या पातळीवरुन खालच्या पातळीवर हस्तांतरित होणे होय. केंद्रीकरण व विकेंद्रीकरण या संज्ञा पुरेशा भिन्न असल्या तरी संस्थांची केंद्रीत आणि विकेंद्रित अशी सरळ वाटणी कठीण आहे कारण कोणतीच संस्था पूर्णतः केंद्रित वा विकेंद्रित नसते. कांही निर्णय (उदा. उत्पादन, संशोधन) केंद्रीय पातळीवर घेतले जातात तर कांही (उदा. विक्री) विकेंद्रित स्वरुपात घेतले जातात. बाह्य फायद्यांमुळे बऱ्याचशा घटकांबाबत केंद्रीकरण संभाव्य फायद्याचे असते पण केन्द्राची माहिती गोळा करुन त्यावर निर्णय घेण्याची क्षमता मर्यादित असल्याने विकेंद्रीकरण आवश्यक ठरते. केन्द्रीकृत व्यवस्था आहे की विकेंद्रित याचा निर्णय प्रक्रियेवर व निर्णयांवर परिणाम होतो. विकेंद्रीकरणाचे कांही फायदे आहेत तसेच कांही तोटेही. विकेंद्रित व्यवस्थेत अचूक निर्णय घेण्याची जास्त शक्यता असेल. विकेंद्रित व्यवस्थेतच स्पर्धा असू शकते व स्थानिक घटकांचा पुरेसा विचार होउ शकतो. निर्णय प्रक्रियेत जास्त व्यक्तींचा समावेश असल्याने भिन्न प्रकारांतून प्रयोगक्षमतेला चालना मिळण्याची शक्यता आहे. उलटपक्षी, विभिन्न पातळीवरील निर्णयात सुसूत्रता राखणे कठीण आहे. किंमतव्यवस्थेतून हे काम होते असा समज असला तरी प्रत्यक्षात तसे होत नाही. बाह्य स्वरुपाचे फायदे/तोटे असले म्हणजे बाजार व्यवस्था कोलमडते. यावर एक उपाय म्हणजे कंपन्यांचा आकार मोठा करुन हे बाह्य परिणाम अंतर्गत बनवणे; यातून केंद्रीकरण वाढीला लागेल. मात्र केंद्रीकरण विकेंद्रीकरणाचा प्रश्न फक्त आर्थिक निकषांपुरताच मर्यादित नाही. विकेंद्रीकरणाचा परिणाम व्यक्ती आपल्या संस्थांशी कितपत एकरुप होउ शकतात व निर्णय प्रक्रियेत आपण सहभागी आहोत असे त्यांना वाटते का यावर होतो. या गोष्टींचा संबंध संस्थांचे यशापयश, त्यांचे अस्तित्व यांच्याशी निगडित बनतो. विकेंद्रीकरणाचा राजकीय संदर्भ- लोकशाही, स्वातंत्र्य या घटकांशी संबंधित आहे.

**खाजगीकरण :**

बाजारपेठेच्या वाटेवर असलेल्या भूतपूर्व समाजवादी देशांसमोर सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे खाजगीकरण करणे हे एक मोठे आव्हान आहे. अर्थव्यवहारात सरकारने हस्तक्षेप करावा किंवा करु नये याबाबत खूप चर्चा होत असली तरी सरकारी उत्पादन विरुद्ध खाजगी उत्पादन याचा फारसा विचार होत नाही. सामान्यपणे खाजगी क्षेत्र सामाजिक उद्दिष्टांचा विचार करणार नाही या आधारे सार्वजनिक उत्पादनाचा पुरस्कार करण्यात येतो. मात्र कर व सवलतींचा उपयोग केला तर खाजगी क्षेत्राला योग्य त्या दिशेने सरकविता येते यासाठी सरकारला उत्पादनाच्या प्रक्रियेत पडण्याची गरज नाही. खरे तर व्यवस्थापकीय दृष्टीकोनातून बघता खाजगी व सार्वजनिक उत्पादनात खूप साम्य असते असे आढळून येते. समभागधारक व निवडलेले लोक प्रतिनिधी व्यक्तिशः ''त्यांच्या - खाजगी व सार्वजनिक - उपक्रमांचे नियंत्रण करत नाहीत. याचा अर्थ राष्ट्रीयीकरणाचे फायदे मर्यादित असतील असा होतो. त्याचप्रमाणे खाजगीकरणाचेही लाभ त्याचे पुरस्कर्ते म्हणतात त्यापेक्षा कमी असतील असाही होतो.

खाजगीकरणाचे फायदे मर्यादित असणे हे कोस[3] यांच्या सिद्धांताशी विपरीत आहे. कोस यांच्यामते सरकारने केवळ मालमत्तेचे हक्क स्पष्ट पणे विशद करावे. एकदा हे झाले म्हणजे आर्थिक कार्यक्षमता आपोआप साध्य होईल. यादृष्टिने विचार करता साम्यवादी राजवटीच्या अपयशाचे मुख्य कारण असे की तेथे शासन वगळता कोणालाच मालकी हक्क नसतात. जी गोष्ट सर्वांच्या मालकीची असते ती कोणाच्याच मालकीची नसते. या दृष्टिकोनातून

समाजवादात सुधारणा अशक्य आहे. खाजगीकरणाला पर्याय नाही. पण कोस यांचे विवेचन उलाढाल करण्यात किंवा माहिती जमा करण्यात काहीच खर्च नसेल तरच लागू पडते. पण प्रत्यक्षात यातील काहीच खरे नसल्याने मालकी हक्क कळीचे महत्व राखतात का व कसे या बाबत कोस यांचे विवेचन फारसे उपयुक्त ठरु शकत नाही. मोठ्या संघटनामध्ये मालकी विशेष महत्वाची नसेल व अशा ठिकाणी ज्या समस्या उत्पन्न होतात त्या खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही ठिकाणी समान असतील. चीन मधील विशेषत: गुडांग प्रांतातील जलद आर्थिक प्रगतीमुळे मालकी हक्कांची निश्चिती विशेष महत्वाची नसते असे दिसून येईल. कोस यांचे म्हणणे असे आहे की मालकी हक्क एकदा निश्चित झाले की या हक्काची कशीही वाटणी झाली तरी आर्थिक कार्यक्षमतेवर परिणाम होणार नाही कारण देवघेवीतून मालकी हक्कांचे पर्याप्त फेर वाटप होऊ शकते. पण अपूरी माहिती, माहिती गोळा करण्यातील अडचणी/ खर्च इत्यादी घटक लक्षात घेता बाजारपेठेवर अवलंबून राहाणे योग्य ठरत नाही. खाजगीकरणाची राजकीय बाजू महत्वाची आहे.खाजगीकरणामुळे समाजवादी व्यवस्थांमध्ये विकेंद्रीकरणाला चालना मिळेल व शासनाच्या हाती एकवटलेली सत्ता कमी होईल. घटलेल्या आर्थिक सत्तेमुळे राजकीय शक्तिवरही मर्यादा येतील.

**वित्तीय बाजारपेठा :**

भांडवलशाहीत भांडवलाचे स्थान महत्वाचे असावे तर भांडवल बाजाराचे स्थान भांडवलशाहीच्या कार्यप्रणालीत मध्यवर्ती असावे. परंतु भांडवल बाजारांच्या कार्यपद्धती बाबत आर्थिक सिद्धांतात वेगळा विचार क्वचितच होतो. भांडवलाची बाजारपेठ इतर वस्तूंच्या बाजारपेठां प्रमाणेच अजून एक बाजारपेठ समजली जाते. साम्यवादाकडून बाजारपेठेकडे वाटचाल करणाऱ्या देशांसमोरही भांडवल व इतर वित्तीय बाजारपेठा प्रस्थापित करणे व त्या सुस्थितीत राखणे हे महत्वाचे आव्हान आहे. वित्तीय बाजारपेठेची कार्ये महत्वाची व बहुविध असल्याने त्यांचा विस्ताराने विचार करायला हवा. वित्तीय बाजार पेठांची कार्ये या प्रमाणे -

1) बचत करणाऱ्यांकडून गुंतवणुकदारांकडे संसाधने हस्तांतरित करणे.

2) भांडवलाचे एकत्रिकरण करणे.

3) योग्य प्रकल्पांची निवड करणे, त्यावर देखरेख ठेवणे.

4) करारांची अंमलबजावणी करणे. ज्यांनी कर्जे घेतली आहे त्यांनी ती परत केलीच पाहिजे अशी स्थिती निर्माण करणे.

5) जोखिमांचे एकत्रिकरण, व्यवस्थापन व वाटप.

6) व्यवहारांची नोंदणी.

ही विविध कार्ये वित्तीय बाजारांनी कालौघात करायला सुरुवात केली. आज ही सर्व कार्ये एक संस्था करते असे नव्हे तर विविक्षीत कार्ये करणाऱ्या विशेषीकृत संस्था उदयाला येतात. स्पर्धात्मक बाजार पेठेच्या रुढ प्रतिमानाप्रमाणे वरील पैकी बहुतेक बाबी महत्वाच्या ठरणार नाहीत. व्यवहार करण्यास कोणताच खर्च लागणार नाही त्यामुळे व्यवहारांची नोंद करणे, संसाधने हस्तांतरीत करणे ही कामे करणाऱ्या संस्थांची आवश्यकता भासणार नाही. व्यवहार करण्यात काहीच खर्च लागत नसल्याने जोखीम वाटप व्यवस्थापनाच्या संस्था निरुपयोगी ठरतील. कारण हे काम प्रत्येक जण स्वतंत्रपणे करु शकेल. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे नसल्यामुळे भांडवलाचे एकत्रिकरण करण्याची गरज भासणार नाही. मुख्य म्हणजे माहिती संबंधी काहीच अडचणी या कल्पित जगात नसल्याने प्रकल्पांची

निवड करणे, त्यावर देखरेख करणे या गोष्टी अनावश्यक होतात व करारांची अंमलबजावणी होते असे गृहीतच धरले असते. वित्तीय बाजार पेठेत केवळ आंतरकालीक देवघेवच होते असे नव्हे तर तिचा जोखिमेशीही संबंध येतो. जोखमीच्या संदर्भा शिवाय वित्तीय बाजारांचा विचार देखील करता येत नाही कारण प्रत्येक व्यवहारात नेहमीच जोखीम असते. या व्यवहारात आजच्या रोखीच्या बदल्यात भविष्यात पैसे देण्याचा वायदा असल्याने नेहमीच हा वायदा पूर्ण केला जाणार नाही ही शक्यता असतेच. यामुळे वित्तीय बाजारपेठा इतर वस्तु बाजार पेठांपेक्षा भिन्न असतात. किंमत बदलांनुसार मागणी पुरवठ्यात समतोल राखला जात नाही. तर कर्ज पुरवठ्याचे मित वाटप (रेशनिंग) करण्यात येते. त्यामुळेच वित्तीय बाजारात निवड करण्याची गरज असते. वस्तु बाजारपेठेत तसे करण्याची गरज नसते कारण जो जास्त बोली बोलेल त्याचीच निवड होते. वित्तीय बाजार पेठांचा संबंध एकंदर देण्या घेण्याच्या व्यवहारांशी असल्याने वित्तीय बाजार सुस्थितीत असणे एकंदर अर्थव्यवस्थेच्या स्थैर्या साठी आवश्यक बनते. त्यामुळे वित्तीय बाजारांबाबतचा सरकारचा दृष्टिकोन इतर वस्तु बाजारांपेक्षा निराळा असतो. वित्तीय बाजारात सरकारचा हस्तक्षेप जास्त व्यापक व सहज होतो. ग्राहकांचे (उदा. ठेवीदार) हित जोपासणे, बँकांची तरलता राखणे या उद्देशाने जसा सरकारचा हस्तक्षेप होतो तसेच बँका व इतर वित्तिय संस्थांनी अवाजवी जोखीम घेऊ नये म्हणून त्यांच्या व्यवहारांवर काही नियंत्रणे लादण्यात येतात.

**सरकारचा अर्थव्यवहारातील हस्तक्षेप :**

या सर्व गोष्टी विचारात घेता सरकारचा अर्थव्यवहारातील हस्तक्षेप ही बाब हो किंवा नाही या साध्या स्वरुपात विचारात घेता येत नाही. एकतर सरकारचा हस्तक्षेप हा बाजार यंत्रणेला पर्याय या स्वरुपात बघता येत नाही. बाजारपेठांचे कार्य व्यवस्थित चालावे, बाजारपेठेचे नियम सर्वांनी पाळावे, ग्राहकांच्या हितांचे रक्षण व्हावे व बाजारातील स्पर्धा टिकून रहावी यासाठी आवश्यक ते नियम तयार करणे त्यांची अंमलबजावणी करणे या गोष्टी शासनालाच कराव्या लागतात. त्यामुळे प्रश्न सरकारने हस्तक्षेप करावा किंवा करु नये असा नसून रास्त हस्तक्षेप कोणत्या प्रकारचा असावा हे ठरविण्याचा असतो. असा रास्त हस्तक्षेप कसा असेल हे ठरविण्याचे असे ठोकताळे उपलब्ध नाहीत जे सर्व ठिकाणी, सर्व काळी लागू होतील. किंबहुना बदलत्या स्थितीनुसार सरकारचा हस्तक्षेप बदलत्या स्वरुपाचा असला पाहिजे. माहिती अर्थशास्त्राचा विचार करता सरकारी हस्तक्षेपाला नवसनातन अर्थशास्त्र मानते त्यापेक्षा जास्त वाव असेल येवढे म्हणता येते. पण याचा अर्थ सरकारी हस्तक्षेप सरकारची मालकी किंवा मक्तेदारी, किंमत व वाटपावर सरकारचे नियंत्रण असा होत नाही. बदलत्या स्थितीनुसार सरकारचा बदलता हस्तक्षेप हे धोरण सरकारला प्रत्यक्षात अमलात आणणे कठीण जाते. कारण विशिष्ट सरकारी हस्तक्षेपामुळे जे हितसंबंध निर्माण होतात त्यांचा दबाव हस्तक्षेपाचे स्वरुप बदलण्यास विरोध करणारा असतो. सरकारच्या हस्तक्षेपाचे स्वरुप ठरण्यात, टिकण्यात व त्यातील बदलात हितसंबंधांचा मुद्दा प्रत्यही महत्वाचा बनतो. सरकारच्या हस्तक्षेपाचा विचार करताना या हितसंबंधाचा (पक्षीय राजकारणाचा) संदर्भ टाळता येत नाही. त्यामुळे या घटकांचा अभ्यास हा अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मानावा लागेल.

**टीपा**

1.परेटो पर्याप्त अवस्था ही कल्याणाच्या अर्थशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे. उत्पादन फेर वाटणीतून सामाजिक कल्याणाची अवस्था बदलता येणे शक्य असते हे मान्य केले तरी ज्या

व्यक्तीचे उत्पन्न कमी होते तिला होणारे नुकसान जास्त उत्पन्न मिळविणाऱ्याचा लाभ यांची तुलना करुन एका व्यक्तिचा तोटा दुसऱ्या व्यक्तीच्या लाभापेक्षा कमी आहे असे मानल्याशिवाय / दाखविल्याशिवाय उत्पादन वाटणीमुळे समाजाचा लाभ झाला असे दाखवता येत नाही. परेटो पर्याप्तता म्हणजे अशी स्थिती ज्यात एकाला नुकसान न करता दुसऱ्या कोणाला लाभ पोचविता येत नाही.

2. रशियन क्रांतीनंतर, बाजारपेठांच्या अभावी समाजवादी, साम्यवादी व्यवस्था टिकतील काय याबाबत अर्थशास्त्रज्ञांत वादळी चर्चा झाल्या. लांज व टेलर यांनी बाजारपेठेच्या अभावी साम्यवादी व्यवस्था काम करु शकतील अशी बाजू मांडली.

3. रोनाल्ड कोस यांनी संस्थागत अर्थशास्त्राचा पाया रचला असे मानण्यात येते. त्यांना 1991 साली अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. अर्थशास्त्रीय निर्णयात संस्थाचे महत्व त्यांनी विशद केले.

## संदर्भ सूची


1) Hoff Karla and Stiglitz Joseph, 'Modern Economic Theory and Development in Meier Gerald M & Stiglitz

Jeseh E (eds)(2001),'Frontiers of Development Economics' OUP pp 359-389

2) Stiglitz J( 1994) 'The Role of the state in Financial Markets,' in Bruno M & Pleskovic B(eds) Proceedings of the World Bank Annual Conference on Development Economicsy Washington.

3) Stiglitz Joseph E(1996) 'Whither Socialism? MIT Press Cambridge'

Stiglitz Joseh E (eds) (2001),' Frontiers of Development Economics' OUP pp 227-268

4) Yusuf Shahid and Stiglitz Joseph Development Issues: Settled and Open in Meier Gerald M & Stiglitz


● ● ●


## अर्थसंवाद चा अंक मिळत नसल्यास

अर्थसंवाद आपणास नियमितपणे प्राप्त होत नसल्यास त्या बाबतची विचारणा प्रमुख संपादकांकडे करावी. आपण परिषदेचे आजीव सदस्य असल्यास किंवा वार्षिक वर्गणीदार असल्यास सदस्य क्रमांक देउन पत्रव्यवहार प्रमुख संपादकाकडे करावा. आपला पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. अंक पाठविण्याची व्यवस्था प्रमुख संपादकामार्फत करता येईल. अर्थसंवादसाठी वर्गणी मनीऑर्डर ने पाठविल्यास आपला पत्ता सुस्पष्ट लिहावा.

अंक पाठविणे सोयीचे व्हावे या दृष्टिने सहकार्य करावे. वर्गणी कार्यवाहांकडेच पाठवावी.

**सर्जेराव ढोंबरे**
कार्यवाह/खजिनदार

# नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक प्रभाव : काही निरीक्षणे

● सर्जेराव साळुंखे

*प्रपाठक, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

**प्रस्तावना :**

1991 पासून भारत सरकारने आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. नवे आर्थिक धोरण या नावाने तो सुपरिचित आहे. त्याला 2001 मध्ये 10 वर्षे पूर्ण झाली आहेत. 1990-91च्या सुमारास भारतीय अर्थव्यवस्था विविध प्रकारच्या संकटांनी ग्रासली होती. भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील आर्थिक पेचप्रसंगाचा तो काळ होता. परकीय विनिमयासाठीच्या चलनातील घट, तुफान चलन फुगवटा, राजकोषीय तुट आणि प्रमाणाबाहेर वाढलेले परकीय आणि अंतर्गत कर्ज यामुळे अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली होती. भारताची अर्थव्यवस्था कर्जाच्या सापळ्यात सापडली होती. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची पत ढासळली होती. त्यामुळे आणखी कर्ज मिळणे दुरापास्त होते. निर्यातीतून मिळणारे उत्पन्न कमी आणि आयातीवरील खर्च जास्त होता. त्यामुळे परकीय विनिमय व्यवहारात तुटीचे प्रमाण वाढले होते.

1980 च्या दशकाच्या पूर्वार्धातील चालू खात्यावरील तूट त्या दशकाच्या उत्तरार्धात दुपटीहून अधिक (चालू वार्षिक सरासरी तूट 2.3 अब्ज डॉलर्स वरुन 5.5 अब्ज डॉलर्सवर) झाली होती. 1980-81 ते 1990-91 या दहा वर्षात परकीय कर्जाचा बोझा अडीचपटीहून अधिक (23.8 अब्ज डॉलर्स वरुन 62.3 अब्ज डॉलर्स इतका) वाढला होता. महत्वाची बाब म्हणजे, परकीय कर्जाचा विनियोग गुंतवणुकीसाठी कमी तर उपभोगासाठीच अधिक प्रमाणात होत होता. एका बाजूला परकीय कर्जाचा बोझा वाढत असताना दुसऱ्या बाजूला अंतर्गत कर्जही सातत्याने वाढत गेले होते. शासनाकडे जमा होणारी रक्कम आणि शासकीय खर्च या दोहोतील अंतर वाढत गेल्याने 1980 च्या दशकात वित्तीय तुटीचे संकट ओढवले होते. ही तूट भरुन काढण्यासाठी सातत्याने अंतर्गत कर्ज घेतले जात होते. 1990-91 अखेर 485 अब्ज रुपये (एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 35 टक्के) इतका अंतर्गत कर्जाचा बोझा वाढला होता. विशेष म्हणजे या अंतर्गत कर्जाची रक्कमदेखील उपभोगासाठीच अधिक प्रमाणात वापरली जात होती. कर्जाची जी काही रक्कम गुंतवणुकीसाठी वापरली जात होती,त्यातून

मिळणाऱ्या परताव्यातून कर्जाच्या रकमेवरील व्याज भागविणे देखील अशक्य झाले होते. अशा प्रकारे, परकीय कर्ज, अंतर्गत कर्ज, वित्तीय तूट या आर्थिक अरिष्टांच्या विळख्यात सापडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला सुस्थिती प्राप्त करुन देण्यासाठी कठोर आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. भारत सरकारचे नवे आर्थिक धोरण हे आर्थिक अरिष्टांमुळे स्वीकारावे लागलेले धोरण आहे. नवे आर्थिक धोरण हा व्यूहरचनात्मक ऐच्छिक पर्याय म्हणून दूरदृष्टीने आणि नियोजनपूर्वक आखलेला आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम असे त्याचे स्वरुप नाही, असे काही टीकाकारांचे मत आहे.(थोरात,1997:2 तेलतुंबडे 1997:1)

**नव्या आर्थिक धोरणाचे स्वरुप :**

भारताने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणात दोन प्रमुख कार्यक्रमांचा अंतर्भाव आहे. समग्र पातळीवरील आर्थिक स्थिरीकरण कार्यक्रम आणि संरचनात्मक समायोजन कार्यक्रम. आर्थिक सुधारणांच्या या कार्यक्रमांचा आराखडा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या दोन वित्तीय संस्थानी तयार केला आहे.

समग्र आर्थिक स्थिरीकरणाच्या कार्यक्रमात, विनिमय दर अधिक वास्तववादी करण्यासाठी देशी चलनाचे अवमूल्यन घडवून आणणे,आयातीवरील निर्बंध उठविणे, वित्तीय तूट भरुन काढणे, अंतर्गत कर्जाचा बोझा घटविणे, किंमती, विनिमय आणि व्याजदरावरील नियंत्रणे काढून टाकणे, शासकीय अनुदानात कपात करणे किंवा ती बंद करणे, परकीय वित्तीय संस्थांना आपली दारे खुली करणे, केंद्रीय बँकेला स्वायत्तता देणे आदी उपायांचा अंतर्भाव होतो. वित्तीय धोरण आणि मुद्राविषयक धोरण ही आर्थिक स्थिरीकरणाची दोन प्रमुख साधने आहेत. या दोन प्रकारच्या धोरणात असा समन्वय साधला जातो की ज्यामुळे एकूण मागणीच्या पातळीत घट होते आणि देशी चलनाचे अवमूल्यन घडवून आणून वित्तीय तूट भरुन काढली जाते. या सर्व उपयांच्या एकत्रित परिणामामुळे समग्र पातळीवर आर्थिक स्थैर्य प्रस्थापित होते अशी धारणा आहे.

संरचनात्मक समायोजन कार्यक्रमात उद्योगांवरील शासकीय निर्बंध उठविणे, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण घडवून आणणे, निर्यात दर वाढविण्यासाठी योग्य ते बदल करणे, परकीय भांडवल आणि तंत्रज्ञानाला आपली दारे खुली करणे, परदेशी कंपन्या, उद्योगांना देशात प्रवेश देणे, भांडवल आणि इतर निधीवरील आंतरराष्ट्रीय निर्बंध उठविणे, बौद्धिक मालमत्तेच्या हक्काच्या संरक्षणासाठी कायदे करणे आदी उपायांचा अंतर्भाव होतो. व्यापारी मालाची उत्पादन-वाढ आणि निर्यात-वृद्धीचे लक्ष्य गाठण्यासाठी साधन सामग्री तिकडे वळविणे, शासकीय क्षेत्राकडून खाजगी क्षेत्राकडे साधनसामग्री वळविणे, खाजगी क्षेत्राला अधिक उत्तेजन देणे या बाबी संरचनात्मक समायोजनातील मूलभूत घटक आहेत.

मागणीत घट घडवून आणणे हा आर्थिक स्थिरीकरणाच्या कार्यक्रमाचा मुख्य गाभा तर पुरवठा-वृद्धी हे संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाचे मुख्य उद्दीष्ट होय. (तेलतुंबडे, 1997 : 1-2, थोरात, 1997 : 1-4). नवे आर्थिक धोरण हे आर्थिक उदारीकरण खाजगीकरण आणि जागतिकीकरण या तीन प्रक्रियांना चालना देणारे धोरण आहे. या धोरणाचे परिणाम केवळ देशांतर्गत अर्थव्यवस्थेपुरतेच मर्यादित राहाणारे नसून राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रेही त्यामुळे यथावकाश ढवळून निघणार आहेत.

नव्या आर्थिक धोरणाचे भारतीय समाजावर कोणते प्रभाव पडत आहेत याविषयीचे चिकित्सक परीक्षण संशोधक करीत आहेत. प्रस्तुत निबंध नव्या

आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावासंबंधीच्या निवडक संशोधनात्मक साहित्यावर आधारित आहे.

**सामाजिक क्षेत्रातील शासकीय गुंतवणुकीच्या अभ्यासाचे महत्व :**

समाजव्यवस्था ही परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी घटकानी मिळून बनलेली असते. त्यामुळे समाजव्यवस्थेच्या कोणत्याही एका उपव्यवस्थेत बदल झाला की त्याचा प्रभाव समाजव्यवस्थेच्या अन्य उपव्यवस्थांवर होतो आणि यथावकाश समाजव्यवस्थेत परिवर्तन घडून येते असा समाजाच्या अभ्यासाविषयीचा व्यवस्था दृष्टिकोन आहे. अर्थव्यवस्था ही समाजातील मूलभूत आणि अतिशय महत्वाची उपव्यवस्था असल्याने अर्थव्यवस्थेत झालेल्या किंवा घडवून आणलेल्या बदलांमुळे समाजाच्या अन्य भागांवर त्यांचा प्रभाव पडणे अगदीच स्वाभाविक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेला आर्थिक अरिष्टांतून बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयोग नव्या आर्थिक धोरणाच्या रुपाने सुरु आहे. अर्थव्यवस्थेत घडवून आणल्या जाणाऱ्या बदलांचा सामाजिक जीवनाच्या अन्य क्षेत्रावर परिणाम होणे अगदी स्वाभाविक आहे. पण नव्या आर्थिक धोरणाचे सामाजिक परिणाम प्रत्यक्ष आविष्कृत होणे ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सामाजिक जीवन गुंतागुंतीचे असल्याने झालेला परिणाम केवळ नव्या आर्थिक धोरणामुळेच घडून आला आहे असे दाखवून देणे कठीण आहे. शिवाय नव्या आर्थिक धोरणाचा प्रभाव भारतीय समाजातील सर्व समाजघटकांवर सारखाच पडेल असे नाही. भारतीय समाजात जाती, जमाती आणि वर्ग तसेच नागरी आणि ग्रामीण अशी कमालीची विषमता आहे. स्त्री-पुरुष विषमताही आहे. तेंव्हा आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावाच्या गुंतागुंतीच्या परिमिती आहेत. तरीही, आर्थिक सुधारणांना प्रारंभ होण्यापूर्वीची समाजजीवनातील विशिष्ट क्षेत्राची, विशिष्ट प्रवर्गाची स्थिती आणि आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतरच्या कालखंडातील त्या क्षेत्राची किंवा प्रवर्गाची स्थिती यांचा तौलनिक अभ्यास केल्यास त्या विशिष्ट क्षेत्रांत काही नवे परिवर्तन घडून येत आहे का आणि असल्यास कोणत्या दिशेने हे परिवर्तन घडून येत आहे, याविषयीचे सर्वसाधारण प्रवृत्तीनिदर्शक निष्कर्ष काढता येतील.

नव्या आर्थिक धोरणाचे सामाजिक परिणाम, त्याचे स्वरुप, दिशा आणि वेग या बाबी सामाजिक क्षेत्रात शासनाकडून होणाऱ्या साधनसंपत्तीच्या गुंतवणुकीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहतील. म्हणून नव्या आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावाचे स्थूल स्वरुप आणि दिशा समजून घेण्यासाठी सुधारणापूर्व आणि सुधारणाकाळात होणाऱ्या गुंतवणुकीच्या विश्लेषणाला महत्व आहे. अशा विश्लेषणावरुन काही प्रवृत्तीनिदर्शक निष्कर्ष काढता येतील.

शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय सेवासुविधा, पोषण, पाणी-पुरवठा व जलनिस्सारण, गृहनिर्माण, नगरविकास, नागरी सेवासुविधा, अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण, कामगार कल्याण, कला, क्रिडा, सामाजिक सुरक्षा, नैसर्गिक आपत्तीच्या काळात केली जाणारी मदत आदी घटकांचा अंतर्भाव, 'सामाजिक सेवा क्षेत्र' या प्रवर्गात होतो. (पंचमुखी, 2000 : 836, पाटील आणि गावडे, 2001 : 2-3). साकल्याने विचार करता, या सर्व घटकांचा संबंध मानवी भांडवलाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होतो.

मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या दृष्टीने सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक महत्वाची आहे. हे वादातीत आहे. पण याशिवाय, दारिद्र्य, बेरोजगारी,

गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अज्ञान-अंधश्रद्धा यासारख्या सामाजिक समस्या आणि काही सामाजिक मूल्यांशीही सामाजिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा प्रत्यक्षपणे नसला तरी अप्रत्यक्षरित्या महत्वाचा संबंध आहे. त्यामुळेच नव्या आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावाची दिशा समजून घेण्यासाठी सामाजिक क्षेत्रातील शासनाच्या गुंतवणुकीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**सामाजिक क्षेत्रावरील शासकीय गुंतवणूक : आर्थिक सुधारणापूर्व काळ आणि सुधारणा काळ**

केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक सुधारणापूर्व काळात सामाजिक क्षेत्रावर केला जाणारा खर्च आणि सुधारणा काळात केला जाणारा खर्च याविषयीच्या सांख्यिकीय माहितीच्या तुलनात्मक अभ्यासावरुन नव्या आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावाची दिशा स्पष्ट होईल.

सामाजिक क्षेत्रावरील खर्च हा सामान्यत: विकासविषयक खर्च मानला जातो. सुधारणा-पूर्व आणि आर्थिक सुधारणांच्या काळातील नियोजन आणि विकासावरील केंद्र सरकारच्या खर्चाचा तौलनिक अभ्यास पंचमुखी (2000: 838-839) यांनी केला आहे. या संदर्भातील सांख्यिकीय माहितीवरुन असे दिसून येते की, 1985 ते 1990 या सुधारणा-पूर्व काळात नियोजन खर्च, विकासविषयक खर्च आणि भांडवली खर्च या शीर्षकाखाली एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या अनुक्रमे 6.80 टक्के, 11.50 टक्के आणि 6.10 टक्के इतका खर्च झाला होता. 1991 मध्ये आर्थिक सुधारणा पर्वास प्रारंभ झाला. 1991 ते 97 या आर्थिक सुधारणांच्या काळात वरील तिन्ही शीर्षकाखालील खर्च एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या अनुक्रमे 4.80 टक्के, 8.50 टक्के आणि 4.0 टक्के इतका होता. या आकडेवारीवरुन असा निष्कर्ष निघतो की, आर्थिक सुधारणांच्या काळात शासनाचे सामाजिक क्षेत्राकडे दुर्लक्ष होत असून, नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक क्षेत्रावर त्यातील गुंतवणुकीच्या दृष्टीने प्रतिकूल परिणाम होत आहे.

सुधारणा-पूर्व आणि सुधारणा काळातील पंचवार्षिक योजनांमधील सामाजिक क्षेत्रावरील खर्चाची तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च यांची तुलना केली असता देखील वरीलप्रमाणेच गुंतवणुकीच्या बाबतची प्रवृत्ती दिसून येते. उदाहरणार्थ, 6व्या आणि 7व्या योजनेतील (सुधारणा-पूर्व काळ) सामाजिक क्षेत्रावरील खर्चाची तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च आणि 8व्या योजनेअंतर्गत वरील संदर्भातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, आर्थिक तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमीच होतो. यावरुन पंचमुखी यांनी अशीच परिस्थिती सुधारणा काळात यापुढेही सुरु राहण्याची शक्यता वर्तविली आहे.

भारतातील विविध राज्य सरकारांकडून विकासविषयक आणि सामाजिक क्षेत्रांतर्गत विविध घटकांवर होणाऱ्या नियोजन आणि नियोजनबाह्य खर्चात सुधारणा-पूर्व काळाच्या तुलनेत सुधारणाकाळात घटच झालेली दिसून येते. उदा. 1985 ते 91 या सुधारणा-पूर्व काळात, राज्यांकडून होणारा नियोजित विकास खर्च सरासरी 20.75 टक्के आणि नियोजनबाह्य खर्च 47.95 टक्के इतका होता. तो सुधारणाकाळात अनुक्रमे 17.70 टक्के आणि 43.87 टक्के इतका घसरला. एकंदरीत एकूण विकासविषयक खर्चाचे प्रमाणे 68.70 टक्क्यावरुन 61.57 टक्के इतके घसरले. सामाजिक सेवांवर होणाऱ्या खर्चातही अशीच घसरण दिसून येते. उदा. सुधारणापूर्व काळात सामाजिक सेवांवरील नियोजित खर्च 9.15 टक्के, नियोजनबाह्य खर्च 30.18 टक्के, तर एकूण खर्च 39.32 टक्के इतका होता. सुधारणाकाळात अशाच खर्चाची आकडेवारी अनुक्रमे 8.68 टक्के, 27.28 टक्के आणि 35.95

टक्के अशी घसरली. यावरुन असे म्हणता येईल की, केंद्र आणि राज्य सरकारे या दोहोंकडूनही आर्थिक सुधारणांच्या काळात सामाजिक क्षेत्राकडे दुर्लक्ष होत असून नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

तात्पर्य, नव्या आर्थिक धोरणाचा सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव नकारात्मक स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे. महेंद्र देव (2000 : 834) यानीही असे म्हटले आहे की, सुधारणा काळातील पहिल्या काही वर्षात सामाजिक क्षेत्रावरील खर्चात लक्षणीय घट झाली असल्याचे अनेक अभ्यासकांनी निदर्शनास आणून दिले आहे. मानवी विकासाच्या निर्देशकांवर सामाजिक क्षेत्रातील घटत्या खर्चाचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. देव यानी दिलेल्या आकडेवारीवरुन असे स्पष्ट दिसून येते की, सर्व राज्यांच्या खर्चाचा एकत्र विचार करता, 1990-91 च्या तुलनेत सामाजिक क्षेत्रावरील दरडोई खर्च 1994-95 पर्यत कमीच होता. (2000 : 833).

**नवे आर्थिक धोरण : शिक्षण, आरोग्य आणि गृहनिर्माण**

सामाजिक क्षेत्रांतर्गत शिक्षणावर होणाऱ्या खर्चाला अनन्यसाधारण महत्व आहे. मानव संसाधन विकासात शिक्षणाचे महत्व वादातीत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर शिक्षणाचा सर्वाधिक प्रमाणावर प्रभाव पडतो. त्यामुळे शिक्षणावरील गुंतवणूक ही समग्र मानवी विकासावरील गुंतवणूक ठरते. या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रातील शासनाच्या गुंतवणुकीचा अभ्यास करणे नव्या आर्थिक धोरणाच्या सामाजिक प्रभावाची दिशा स्पष्ट करण्याच्या दृष्टिने उपयुक्त ठरेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, सरकारने एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान 6 टक्के इतका खर्च शिक्षणावर करणे आवश्यक आहे. 1992 साली केंद्र आणि राज्य सरकारांचा शिक्षणावरील खर्च एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ 3.6 टक्के इतका होता. आर्थिक सुधारणांच्याकाळात त्यातही घट झाली 1996-97 मध्ये शिक्षणावरील खर्च 3.4 टक्के इतकाच होता असे निदर्शनास आले आहे. पंचमुखी, (2000 : 833) यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, सर्व राज्यांच्या शिक्षणावरील दरडोई खर्चाचा एकत्रित विचार करता, 1991 च्या तुलनेत शिक्षणावरील खर्चात 1994-95 पर्यंत सुमारे 3 टक्के घसरण झाली. आर्थिक दृष्टच्या संपन्न असलेल्या राज्यांचा एकत्रित विचार करता (गुजरात, हरियाणा, महाराष्ट्र आणि पंजाब) हया राज्यात शिक्षणावरील दरडोई खर्चात वरील सुधारणा काळात घट झाली नसली तरी, बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या गरीब राज्यात शिक्षणावरील दरडोई खर्चात 1991च्या तुलनेत 1994-95 पर्यंत सुमारे 9 टक्के इतकी घट झाली आहे. मध्यम उत्पन्न असणाऱ्या राज्यात (आंध्र, आसाम, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल) ही घट सुमारे 1 टक्का इतकी मर्यादित आहे.

सर्व देशांचा एकत्रितपणे विचार करता, केंद्र आणि राज्य सरकारांकडून आर्थिक सुधारणांच्या काळात गुंतवणुकीच्या दृष्टीने शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून नव्या आर्थिक धोरणाचा शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचेच दिसून येते.

शिक्षणक्षेत्रांतर्गत, प्राथमिक, माध्यमिक,उच्च शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण या उपघटकांवर सुधारणा काळात होत असलेल्या खर्चाच्या आकडेवारीचे विश्लेषण करणेही उपयुक्त ठरेल. प्राथमिक शिक्षणाला प्राथमिकता देण्यात येईल, असे शासनाकडून वारंवार सांगण्यात येते. पण याबाबतची वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे असे आकडेवारीवरुन दिसून येते. पंचमुखी (2000 : 839) यानी दिलेल्या आकडेवारीवरुन असे दिसून

येते की, आर्थिक सुधारणांच्या काळात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यावरील दरडोई खर्चात घटच झालेली आहे. 1991 मध्ये प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर 494 रुपये इतका खर्च होत होता. तो 1995-96 मध्ये 492 रुपये (म्हणजे दोन रुपयानी कमी) इतका झाला होता.

विविध शैक्षणिक स्तराकरिता (प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च) शासनाकडून होणाऱ्या दरडोई वार्षिक खर्चाच्या वाढीचा दर देखील लक्षणीय प्रमाणात कमी होत आहे. उदाहरणार्थ, 1985-1990 या सुधारणा-पूर्व काळात, हा दर प्राथमिक शिक्षणाकरिता 6.9 टक्के, माध्यमिक शिक्षणाकरीता 5.0 टक्के, तर विद्यापीठीय शिक्षणाकरिता 0.2 टक्के, इतका होता. तर 1990-1996 या आर्थिक सुधारणांच्या काळात तो अनुक्रमे 1.2 टक्के, 0.0 टक्के आणि - 4.4 टक्के असा घसरला. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या दर विद्यार्थ्यामागील वार्षिक खर्चात झालेली घसरण आणि विद्यापीठीय शिक्षणाबाबत आर्थिक सुधारणापर्वात झालेली कपात या चिंतेच्या बाबी आहेत.

आर्थिक विकासातील तांत्रिक शिक्षणाला असलेल्या महत्वाचा विचार करता सुधारणा पर्वात तांत्रिक शिक्षणावरील खर्च वाढेल अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही, या उलट तांत्रिक शिक्षणावरील खर्चही सुधारणा काळात कमीच झाला आहे. उदाहरणार्थ, 1987 ते 1991 या सुधारणा-पूर्व काळात केंद्र आणि राज्य सरकारांकडून तांत्रिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या वार्षिक वाढीचा दर 13.3 टक्के इतका होता, तो आर्थिक सुधारणांच्या 1991 ते 94 या काळात 10.6 टक्के इतका घसरला. याशिवाय, केंद्र सरकारच्या एकूण शिक्षणावर होणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चापैकी तांत्रिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या वाटच्यातही घट होत आहे. उदाहरणार्थ, 1971 ते 91 या सुधारणा-पूर्व काळात, शिक्षणावरील एकूण अंदाजपत्रकीय खर्चापैकी तांत्रिक शिक्षणावरील खर्च 22 ते 29 टक्के इतका होता. तो सुधारणा काळात 18.4 टक्के इतका घसरला. सारांश, नव्या आर्थिक धोरणाचा प्राथमिक, विद्यापीठीय आणि तांत्रिक शिक्षणावर तसेच एकूण शिक्षण क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

पंचमुखी (2000 : 840) यानी असेही निदर्शनास आणून दिले आहे की, आर्थिक सुधारणांच्या काळात केंद्र शासनाकडून राज्य सरकारांना अनुदानाच्या स्वरुपात देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीच्या प्रमाणातही घट झाली आहे. सामाजिक क्षेत्रातील केंद्राच्या आणि केंद्र पुरस्कृत योजनांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात अशी घट झालेली दिसून येते. केंद्राच्या आणि केंद्र पुरस्कृत शिक्षण क्षेत्रातील योजनांना लागणाऱ्या खर्चासाठी 1991 साली 12.1 टक्के इतकी मदत मिळाली होती तर सुधारणा काळात ती कमी होत जाऊन 1997-98 साली 8 टक्क्याइतकी खाली घसरली. कल्याण कार्यक्रमांसाठी मिळणारी अशी मदत याच काळात 9.6 टक्क्यांवरुन 6 टक्क्यांवर घसरली. सामाजिक क्षेत्रातील अन्य काही घटकांना अशा स्वरुपाची मदत थोडी अधिक मिळत असली तरी त्या त्या उपक्षेत्राच्या गरजेच्या तुलनेत ती कमीच आहे. केंद्राकडून राज्याना योजना-बाह्य खर्चासाठी मिळणाऱ्या मदतीबाबतही यापेक्षा निराळे चित्र नाही. केंद्राकडून शिक्षणासाठी राज्य सरकाराना मिळणारी मदत अलीकडच्या काही वर्षात अनुदानाच्या स्वरुपात न मिळता ती कर्जाच्या स्वरुपात दिली जात आहे, ही देखील विशेष नोंद घेण्यासारखी बाब आहे.

आर्थिक सुधारणांच्या काळात, शिक्षणाप्रमाणेच आरोग्याच्या क्षेत्रातील (आरोग्य, कुटुंब, पाणी-पुरवठा आणि जलनिस्सारण)

गुंतवणुकीबाबतही निराशाजनक चित्र आहे. नियोजनखर्चातील आरोग्यासाठीच्या खर्चाची टक्केवारी उत्तरोत्तर कमी होत आहे. पहिल्या योजनेत आरोग्यासाठीचा खर्च 3.3 टक्के इतका होता, तो सातव्या योजनेत 1.7 टक्के इतका खाली घसरला होता. 1997-98 च्या वार्षिक योजनेत तो केवळ 1 टक्क्यावर येऊन ठेपला. 7व्या आणि 8व्या योजनेत आरोग्यावरील नियोजित खर्चाच्या प्रमाणात काहीच बदल झालेला नाही. तो खर्च 1.7 टक्के इतकाच राहिला आहे. लोकसंख्यावाढीचा दर लक्षात घेता आरोग्यावरील खर्च अगदीच नगण्य आहे असे म्हणता येईल. महेंद्र देव (2000 : 833) यानी दिलेल्या आकडेवारीनुसार विविध राज्य सरकारांनी आरोग्यावर (औषध आणि सार्वजनिक आरोग्य) केलेल्या दरडोई सार्वजनिक खर्चात, सर्व राज्यांमध्ये, 1990-91 च्या तुलनेत त्यापुढील सुधारणांच्या काळात घट होत असल्याची सर्वसाधारण प्रवृत्ती दिसून येते. सर्व राज्यांचा एकत्रित विचार करता, 1990-91 च्या तुलनेत, आरोग्यावरील दरडोई खर्च 1991-92 मध्ये 95 टक्क्यांवर, 92-93 मध्ये 94 टक्यांवर, 93-94 मध्ये 1990-91 इतकाच, तर 94-95 मध्ये 97 टक्के इतका होता.

आर्थिक सुधारणांच्या काळात सामाजिक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या शिक्षण, आरोग्य, कल्याण आदी क्षेत्रातील गुंतवणूक लक्षणीय प्रमाणात घटल्याचे पंचमुखी यांचे निरीक्षण आहे. त्यानी राज्यसरकारांच्या अंदाजपत्रकीय (महसूली) खर्चाची सामाजिक क्षेत्रातील विविध उपघटकांवरील खर्चाची जी आकडेवारी दिली आहे त्यावरुन असे दिसून येते की, आर्थिक सुधारणापूर्व काळात (1985 ते 91) गृहनिर्माण या शीर्षकांतर्गत 0.54 टक्के (योजनांतर्गत 0.17 टक्के आणि नियोजनबाहय 0.37 टक्के) इतका खर्च होत होता. तो आर्थिक सुधारणांच्या काळात 0.49 टक्के इतका (योजनांतर्गत तर 0.23 आणि नियोजनबाहय 0.26) खाली आला.

**नवे आर्थिक धोरण आणि दारिद्र्य निर्मूलन :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सर्वच पंचवार्षिक योजनात, विशेषत: 5व्या पंचवार्षिक योजनेनंतर दारिद्र्यनिर्मूलनाला शासकीय धोरणात महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. आर्थिक वाढीवर भर देणे आणि दारिद्र्य निर्मूलनासाठी विशेष योजना आखणे या दोन्ही मार्गाचा अवलंब यासाठी केला जात आहे. 1991 मध्ये नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर त्याचा दारिद्र्य निर्मूलन आणि रोजगार यावर प्रतिकूल परिणाम होईल की काय यावर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. भगवती आणि श्रीनिवास, तेंडूलकर, जोशी आणि लिटल् यासारख्या काही संशोधकांच्या मते सुरुवातीच्या काळात आर्थिक सुधारणांचा दारिद्र्यावर प्रतिकूल परिणाम झाला नाही. मध्यम आणि दीर्घपल्ल्याचा विचार करता, आर्थिक सुधारणांचा गरिबांवर अनुकूल परिणाम होईल तर नय्यर, घोष आणि भादुरी यासारख्या तज्ज्ञांच्या मते आर्थिक सुधारणाचा सुरुवातीच्या काळातल्या प्रमाणेच दीर्घकाळाचा विचार करता देखील गरिबांवर प्रतिकूलच परिणाम होण्याची शक्यता आहे. (महेंद्र देव, 2000 : 823)

या पार्श्वभूमीवर, आर्थिक सुधारणांच्या काळात भारतातील दारिद्र्याची स्थिती अधिक बिकट झाली आहे काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा महेंद्र देव यानी प्रयत्न केला आहे. महेंद्र देव (823-835) यानी दारिद्र्याच्या संदर्भातील आकडेवारीचा अभ्यास करुन तीन प्रमुख निष्कर्ष काढले आहेत. 1) आर्थिक सुधारणांचा पहिल्या दोन वर्षात ग्रामीण आणि नागरी भागातील दारिद्र्य वाढले, 2) 1980 च्या दशकातील दारिद्र्यात घट होण्याचे प्रमाण 1991 नंतरच्या काळात थांबले आहे. 3) सुधारणांच्या

काळात ग्रामीण भागातील दारिद्र्याच्या तुलनेत नागरी भागातील दारिद्र्यात सापेक्षत: अधिक गतीने घट झाली. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण च्या निष्कर्षाप्रमाणे 1997 मध्ये सुमारे 37 टक्के लोक दारिद्र्याच्या स्थितीत होते. राज्या-राज्यातील दारिद्र्याच्या प्रमाणाच्या तुलनेवरुन देव यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, दारिद्र्याच्या प्रमाणाच्या बाबतीत गरीब आणि श्रीमंत राज्यातील तफावत वाढत जात आहे. 1990 च्या दशकात बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि ओरिसा व गरीब राज्यातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली नाही तर आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडू, पश्चिमबंगाल आणि पंजाब या राज्यातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे.

नव्या आर्थिक धोरणाच्या मूल्य व्यवस्थेवरील परिणामांच्या संदर्भात पंचमुखी यांची निरीक्षणे या धोरणाच्या सामाजिक प्रभावाची दिशा स्पष्ट करणारी आहेत. आर्थिक सुधारणांनी उपभोगवादी वृत्तीला चालना दिली आहे, हे भारतातील उपभोगविषयक खर्चाच्या सांख्यिकीय माहितीवरुन सूचित होते. 1990 ते 1996 या काळात, तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थावरील खाजगी उपभोगखर्च 1.5 टक्क्यांवरुन 1.8 टक्के इतका वाढल्याचे, तर त्याच काळात, अन्नपदार्थावरील खर्च 48.8 टक्क्यावरुन 45.9 टक्के इतका घसरल्याचे दिसून आले आहे. हॉटेल आणि रेस्टॉरंट वरील खर्च याच काळात 1.1 टक्क्यावरुन 1.4 टक्क्यापर्यंत वाढला. फर्निचर आणि तत्सम वस्तुंवरील खर्च या काळात 3.7 टक्क्यांवरुन 4.2 टक्के इतका वाढला.

सुशिक्षित बेरोजगार युवकांमधील गुन्हेगारीचा दर अलीकडच्या काही वर्षात वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. आर्थिक सुधारणा-पूर्व काळापेक्षा सुधारणा काळात भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढल्याचे निदर्शनास येते, यावरुन सामाजिक जीवनात भ्रष्टाचाराचे प्रमाणही वाढले असल्याचे दिसून येते.

**सारांश आणि निष्कर्ष :**

सामाजिक क्षेत्रात होणारी गुंतवणूक ही मानवी संसाधनाच्या विकासासाठी केली जाणारी गुंतवणूक असते. विकास घडवून आणणे हे कोणत्याही धोरणाचे अंतिम उद्दिष्ट असते. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी, सामाजिक विषमता नष्ट होण्यासाठी, विकासाची संधी आणि प्रेरणा समाजातील दुर्बल घटकाना प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावी लागेल. दुर्बल घटकाना केवळ बाजार शक्तीच्या लहरीवर सोडून देऊन विकास साधला जाणार नाही. यासाठी समाजातील सर्वसामान्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक क्षेत्रात पर्याप्त गुंतवणूक करणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य ठरते. नव्या आर्थिक धोरणाच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारच्या सामाजिक क्षेत्रावरील खर्चात उत्तरोत्तर घट होत आहे. शिक्षण आणि आरोग्य या सारख्या महत्वाच्या क्षेत्रातही किमान अपेक्षित गुंतवणूक होत नाही. परिणामी मानवी संसाधन विकास प्रक्रिया खुंटण्याची शक्यता आहे. दारिद्र्याखालील लोकाना दारिद्र्यरेषेवर आणण्याचे प्रयत्न मंदावले आहेत. गरीब आणि श्रीमंत राज्यातील दारिद्र्याच्या प्रमाणात तफावत पडत चालली आहे. स्त्रिया, अनुसूचित जाती-जमातीवरील अन्याय अत्याचारात वाढ होत आहे. सामाजिक सेवेच्या क्षेत्राकडे दुर्लक्ष केले गेल्यामुळे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला बाजार शक्तीच्या लहरीवर सोडून दिले गेल्याचे चित्र निर्माण होत आहे.

सामाजिक सेवा क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक कमी होणे आणि सामाजिक सेवांची समाजातील उपलब्धता कमी होणे, या दोहोमधील सहसंबंध मात्र

तपासून पहावा लागेल. कारण एकीकडे सामाजिक सेवा क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक कमी होत असतानाच दुसरीकडे या क्षेत्रातील खाजगी गुंतवणुक मात्र वाढत आहे, असे चित्र दिसते. उदाहरणार्थ, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांमधून इंग्रजी माध्यमाच्या शाळा, तंत्रशिक्षण महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, दवाखाने आदी सेवांवर खाजगी गुंतवणूक वाढत आहे, असे दिसून येते. सामाजिक सेवा क्षेत्रातील या खाजगी गुंतवणुकीतून संबंधित सेवांची गुणवत्ता देखील वाढते. पण या सेवांची किंमतही मोठ्या प्रमाणावर वाढते. ही किंमत इतकी वाढते की फक्त श्रीमंत लोकच त्यांचा लाभ घेउ शकतात. या महागड्या सेवांचा लाभ घेणे सर्व सामान्य लोकांना परवडणारे नसते. म्हणून सामाजिक सेवा क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक वाढविणे हाच पर्याय उरतो. आर्थिक वाढीचे उद्दिष्ट आणि सामाजिक न्यायाच्या तत्वाच्या प्रस्थापनेचे उद्दिष्ट या दोहोत योग्य तो समन्वय साधणे हे यापुढील काळातील शासनासमोरील एक प्रमुख आव्हान आहे.

### संदर्भ सूची :


1. Dev, S. Mahendra (2000) : " Economic Reforms, Poverty, Income Distribution and Employment", Economic and Political Weekly, Vol 35, N0.10, March 4, pp. 823-835

2. Lal Deepak ; Mohan Rakesh ; Natarajan I, (2001) : "Economic Reforms and Poverty Alleviation", Economic and Political Weekly, Vol, No: 12, March 24, pp. 1017-1028

3. Nagaraj R. (1997) : " What Has Happened Since 1991, Assessment of India's Economic Reforms", Economic and Political Weekly, Vol. 32, No. 44 & 45, No.8, pp. 2869-2879.

4. Panchamukhi P.R. (2000) : " Social Impact of Economic Reforms in India", Economic and Political Weekly, Vol.35, No.10, March 4, pp. 836-847.

5. पाटील ज.फा आणि गावडे पी.एन. (2001) महाराष्ट्रातील सामाजिक खर्च दिशादर्शक विश्लेषण. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात सादर केलेला शोध निबंध.

6. Teltumbade, Anand (1997) :"Impact of New Economic Reforms on Dalits in India" Occassional Papers series, 1, Department of Sociology, University of Pune, Pune.

7. Thorat, Sukhdeo (1997) : " New Economic Policy and It's Impact on Employment and Poverty of the Scheduled Castes". Occassional paper series : 2, Department of Sociology, June 20 pp. 1-32


● ● ●


## 'अर्थसंवाद' पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद' चे 1992-93 पासून पुढील वर्षाचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षाचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी कार्यवाहांकडे प्रत्येक वर्षासाठी रु.150/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

**विनायक देशपांडे**
प्रमुख संपादक

# आर्थिक सुधारणांचे पहिले दशक आणि लघुउद्योगांचा विकास

● **भागचंद खुरुद**
*प्रपाठक व प्रमुख,*
*अर्थशास्त्र विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राहुरी.*

## प्रस्तावना :

1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांचे सहअस्तित्व मान्य करुन मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यानंतर 1951 मध्ये जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाचा मार्ग निवडला. नियोजन पर्वात पाच-पाच वर्षांच्या पंचवार्षिक योजना राबवितांना आर्थिक नियंत्रणे, परवाना पद्धती, संरक्षित व्यापार आणि उत्पादन कोटा पद्धतीसारख्या निर्बंधात्मक बाबींना जास्त महत्व देण्यात आले. 1980 नंतर मात्र हे धोरण आर्थिक विकासात अडथळे निर्माण करीत असल्याचे मत व्यक्त करण्यात येऊ लागले. त्यामुळे 1985 मध्ये या धोरणात बदल करण्यात येऊन काही प्रमाणात खाजगीकरण आणि उदारीकरणाचा अवलंब करण्यात आला. मात्र एवढे करुनही 1990-91 च्या दरम्यान आर्थिक विकासाचा दर 1.1 टक्यापर्यंत घसरला. दारिद्र्य, बेकारी व आर्थिक विषमतेच्या प्रश्नांनी उग्र रुप धारण केल्याने देश अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडला. भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार असलेल्या सोव्हिएत संघराज्याचे विघटन, आखाती युद्ध आणि सार्वजनिक क्षेत्राच्या लाभप्रदतेत झालेल्या घटीमुळे आर्थिक संकटाची तीव्रता आणखी वाढली. या काळात व्यवहारतोलातील तूट प्रचंड प्रमाणात वाढली. एकट्या चालू खात्यावरील तूट 10 बिलियन डॉलर म्हणजे स्थूल देशी उत्पादनाच्या 3.69 टक्क्यांपर्यंत वाढली. अंदाजपत्रकीय, महसूली आणि वित्तीय तुटीचे प्रमाण स्थूल देशी उत्पादनाच्या अनुक्रमे 2.1 टक्के, 3.5 टक्के आणि 8.4 टक्के इतके झाले. चलनवाढीचा दर 17 टक्क्यांच्या आसपास पोहचला. विदेशी चलनाचा साठा एक बिलियन डॉलर इतक्या न्युनतम पातळीपर्यंत घटला. देशावरील विदेशी कर्जाचा बोझा प्रचंड वाढला. रुपयाच्या विदेशी चलनाच्या मूल्यात बरीच घसरण झाली. देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय पतश्रेणी संस्थांनी भारताचा अल्प आणि दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्याचा दर्जा कमी केला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कर्ज मिळविणे देशाला अवघड झाले. एक पत गमावलेली अर्थव्यवस्था अशी भारताची गणना होऊ लागली. विदेशी देणी देण्यासाठी सोने विकण्याची व गहाण ठेवण्याची नामुष्कीची वेळ

भारतावर आली. यातून मार्ग काढण्यासाठी त्यावेळचे अर्थमंत्री श्री. मनमोहन सिंग यांनी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या जाचक अटींना मान्यता देऊन नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा स्वीकार केला. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण हे या सुधारणा कार्यक्रमाचे मुलाधार आहेत. त्यात आंतरराष्ट्रीय व्यापार, भांडवलाचे स्थलांतर, तंत्रज्ञान देवाण-घेवाण, बहुराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक आणि श्रमाच्या गतिशीलतेवरील निर्बंध दूर करुन खुली व स्पर्धात्मक अर्थव्यवस्था निर्माण करण्यावर व पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिकीकरणाच्या प्रवाहात सामिल करण्यावर भर देण्यात आला आहे. 'लायसेन्स व परमिटराज' च्या माध्यमातून सर्वनियंत्रक बनलेले सरकार यापुढे प्रवर्तक, मदतनिस व सल्लागार म्हणून काम करील अशी ग्वाही देण्यात आली आहे. उपक्रमी, व्यापारी व व्यावसायिकांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन सरकारने वित्तीयधोरण, चलनविषयक धोरण, आयात-निर्यात धोरण, विदेशी गुंतवणूकीबाबतचे धोरण, सार्वजनिक क्षेत्रविषयक धोरण, किंमत धोरण आणि औद्योगिक धोरणात आवश्यक ते बदल केले आहेत. नव्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला आता एक दशक पूर्ण झाले असून सध्या त्याच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरु आहे.

प्रस्तुत लेखात नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या पहिल्या दशकात लघुउद्योग क्षेत्राचा विकास योग्य गतीने झाला का ? या क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना लघुउद्योगांना प्रेरक ठरल्यात का? लघुउद्योगांच्या समस्यांचे निवारण झाले का? या बाबींचे मूल्यमापन केले आहे. मूल्यमापनासाठी आर्थिक सुधारणा पूर्वीचे एक दशक ( 1980-81 to 1990-91)आणि आर्थिक सुधारणा नंतरचे पहिले दशक (1990-91 to 2000-2001) निवडण्यात आले आहे. तसेच द्वितीय स्रोताची आकडेवारी आणि वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दराच्या साहाय्याने वरील दोन दशकांतील विकासाची तुलना करुन नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा लघुउद्योग क्षेत्राच्या विकासावर झालेला परिणामांचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1.नवीन आर्थिक धोरणात म्हणजे 1991 ते 2001च्या दरम्यान लघुउद्योग क्षेत्राला पुरविण्यात आलेल्या सोई-सवलतींचा आढावा घेणे.

2. निवडक निर्देशकांच्या आधारे लघुउद्योग क्षेत्राच्या विकासाचे मूल्यमापन करणे.

3. 1980च्या दशकाच्या तुलनेत 1990च्या दशकात लघुउद्योगांची संख्या आणि रोजगारात कशी वाढ झाली याचा शोध घेणे.

४. आर्थिक सुधारणांच्या पहिल्या टप्प्यात लघुउद्योग क्षेत्रातील गुंतवणूक आणि उत्पादन वाढीचा वेग कसा होता ते तपासणे.

5. लघुउद्योगांच्या निर्यातक्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेणे.

6. नवीन आर्थिक धोरणामुळे लघुउद्योगांच्या समस्यांची तीव्रता कमी झाली का हे तपासणे.

7. आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्यात लघुउद्योगांच्या समस्या कमी व्हाव्यात तसेच त्यांचा जलद गतीने विकास व्हावा यासाठी काही उपाययोजना सूचविणे.

**आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि लघुउद्योग क्षेत्र :**

भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ असलेल्या लघुउद्योगक्षेत्राच्या विकासाचे मूल्यमापन

करण्यापूर्वी नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या कार्यकाळात या क्षेत्राला प्रोत्साहनपर ज्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या त्यांचा उल्लेख करणे या ठिकाणी आवश्यक आहे. निवडक सवलती व विशेष तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

1. लघुउद्योगांच्या समस्या आणि जलद विकासाबाबतच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सरकारने 1991 मध्ये नायक समिती, 1996 मध्ये अबिद हुसेन समिती आणि 1999 मध्ये गुप्ता अभ्यास गटाची नियुक्ती केली. त्या सर्वांनी केलेल्या बहुतांश शिफारशी शासनाने मान्य करुन लघुउद्योग क्षेत्रासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले.

2. 1997 मध्ये लघुउद्योग आणि दुय्यम उद्योगांची ( Ancillary Industry) गुंतवणूक मर्यादा जी पूर्वी 60 आणि 75 लाख रुपये होती ती 3 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. इ.स. 2000 मध्ये गुंतवणूक मर्यादेत बदल करण्यात येऊन ती 3 कोटी रुपयांवरुन 1 कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आली.

3. अतिलघु उद्योगाची (Tiny Units) गुंतवणूक मर्यादा 5 लाख रुपयांवरुन 25 लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात येऊन त्यांना वित्तसहाय्य आणि शासकीय खरेदीच्या कार्यक्रमात अग्रक्रम देण्यात आला.

4. एप्रिल 1997 मध्ये 15 वस्तू, 1999 मध्ये एक वस्तू आणि जून 2001 मध्ये आणखी 14 वस्तू अशा एकूण 30 वस्तूंच्या उत्पादनाचे आरक्षण रद्द करण्यात आले.

5. आय.एस.ओ. 9000 प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या लघुउद्योगाला 75,000 रुपये वित्तसहाय्य देण्यात येईल ही योजना दहाव्या पंचवार्षिक योजने-पर्यंत कार्यरत राहील असे जाहीर करण्यात आले.

6. लघुउद्योगांची स्पर्धाशक्ती वाढविण्यासाठी त्यांना उत्पादनशुल्कात देण्यात येणाऱ्या सवलतींची मर्यादा 50 लाख रुपयांवरुन 1 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली.

7. संयुक्त कर्ज योजने अंतर्गत ( Composite Loan Scheme) लघुउद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा देखील सरकारने 10 लाख रुपयांवरुन 25 लाख रुपयांपर्यंत वाढविली.

8. लघुउद्योगांसाठी ''बाजार विकास सहाय्य योजना (Market Development Assistance Scheme) सुरु करण्यात आली.

9. जे लघुउद्योग सेवा (services) आणि व्यवसायाशी (Business) संबंधित आहेत व ज्यांची गुंतवणूक 10 लाख रुपयांपेक्षा जास्त नाही ते प्राधान्य कर्जासाठी (Priority Lending) पात्र राहतील असे घोषित करण्यात आले.

10. याशिवाय लघुउद्योगक्षेत्राची 'इन्स्पेक्टर राज' च्या जाचातून मुक्तता करण्याचे व लघुउद्योगांना कच्च्यामालाचा पुरेसा पुरवठा करण्याचे देखील आश्वासन देण्यात आले.

**लघुउद्योग क्षेत्राचा विकास :**

लघुउद्योगांची स्पर्धा शक्ती वाढावी, त्यांच्या विकास दरात वाढ व्हावी, रोजगाराभिमुख उद्योगांना चालना मिळावी तसेच प्रादेशिक असमतोल कमी व्हावा या उद्देशाने 1990 ते 2001 या काळात लघुउद्योगांना वर निर्देशित केलेल्या सोई सवलती देण्यात आल्या. ही उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली या बाबतचे विश्लेषण लघुउद्योगांची संख्या, रोजगार, गुंतवणूक उत्पादन आणि निर्यात या निवडक निर्देशकांच्या साहाय्याने केले असता पुढील बाबी निदर्शनास आल्या.

**1. लघु उद्योगांची संख्या व रोजगार :**

भारतातील लघुउद्योगांची संख्या आणि रोजगारातील वाढ तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले आहे.

त्यावरून देशातील लघुउद्योग आणि रोजगार वाढीचे दर विशेषत: नवीन आर्थिक धोरणाच्या काळात घटल्याचे दिसतात. 1980-81 ते 1990-91 या काळात लघुउद्योगांची संख्या आणि रोजगारात प्रतिवर्षी 8.35 टक्के आणि 5.84 टक्के या संयुक्त अभिवृद्धी दराने वाढ झाली. आर्थिक सुधारणांच्या कार्यकाळात म्हणजे 1990-91 ते 2000-2001 च्या दरम्यान मात्र लघुउद्योगांची संख्या आणि रोजगार वाढीचे वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर कमी होऊन ते अनुक्रमे 5.62 टक्के आणि 4 टक्क्यांपर्यंत खाली आले.

**2. गुंतवणूक आणि उत्पादनातील वाढ :**

लघुउद्योगक्षेत्राच्या विकासाचे मूल्यमापन करतांना या क्षेत्रातील गुंतवणूक आणि उत्पादनात

**तक्ता क्र. 1**

**भारतीय लघुउद्योग क्षेत्राचा विकास**

| अ.क्र. | वर्ष | लघुउद्योगांची संख्या (लाख) | गुंतवणूक (कोटी रु.) | रोजगार (लाख व्यक्ति) | उत्पादन (चालू किंमतीस कोटी रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 1980-81 | 8.74 | 5,850 | 71.0 | 28,060 |
| 2. | 1990-91 | 19.50 | 19,302 | 125.3 | 1,55,340 |
| 3. | 1991-92 | 20.82 | 20,438 | 129.8 | 1,78,699 |
| 4. | 1992-93 | 22.46 | 21,816 | 134.1 | 2,09,300 |
| 5. | 1993-94 | 23.81 | 22,934 | 139.4 | 2,41,648 |
| 6. | 1994-95 | 25.71 | 24,874 | 146.6 | 2,93,990 |
| 7. | 1995-96 | 27.24 | 26,726 | 152.6 | 3,56,213 |
| 8. | 1996-97 | 28.57 | 28,657 | 160.0 | 4,12,636 |
| 9. | 1997-98 | 30.14 | 31,028 | 167.2 | 4,65,171 |
| 10. | 1998-99 | 31.21 | 34,447 | 171.6 | 5,27,515 |
| 11. | 1999-00 | 32.25 | 38,258 | 178.5 | 5,78,470 |
| 12. | 2000-01 | 33.70 | 43,779 | 185.6 | 6,45,496 |
| 1980-81 ते 1990-91या काळातील वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (टक्के) | | 8.35 | 12.67 | 5.84 | 18.66 |
| 1990-91 ते 2000-01या काळातील वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (टक्के) | | 5.62 | 8.53 | 4.00 | 15.30 |

स्त्रोत :

1. Govt. of India, Economic Survey 1996-97, P. 132 and 2000-2001, P. 126.
2. RBI, Report on Currency and Finance, 1996-97, 1998-99 and 1999-2000.

कशी वाढ होत गेली याचे परीक्षण करणे महत्वाचे ठरते. तक्ता क्र.1 मध्ये दिलेल्या माहिती च्या आधारे आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या कार्यकाळात गुंतवणूक आणि उत्पादनात वाढ होत असलेली दिसत असली तरी वाढीचा वेग 1980 च्या दशकातील वेगाच्या तुलनेत बराच कमी आहे. 1980-81 ते 1990-91 दरम्यान लघुउद्योगाच्या गुंतवणूक आणि उत्पादनात 3.29 आणि 5.53 पटींनी वाढ झाली. 1990-91 ते 2000-2001 च्या काळात मात्र ही वाढ अनुक्रमे 2.26 पट आणि 4.15 पट इतकी होती. तक्त्यातील दोन दशकांतील वृद्धी दरांची तुलना केली असता हीच बाब निदर्शनास येते. आर्थिक सुधारणा कार्यक्रमापूर्वी म्हणजे 1980-81 ते 1990-91 दरम्यान गुंतवणूक आणि उत्पादन वाढीचे वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर 12.67 टक्के आणि 18.66 टक्के होते. त्यानंतर 1990-91 ते 2000-2001 या कालावधीत वृद्धी दरात घट झाली आणि गुंतवणूक वर्षाला 8.53 टक्के दराने तर उत्पादन 15.30 टक्के दराने वाढले. यावरुन नवा आर्थिक सुधारणा कार्यक्रम लघुउद्योगक्षेत्रातील गुंतवणूक आणि उत्पादन वाढीला अपेक्षित गती देऊ शकला नसल्याचे सिद्ध होते.

### 3. निर्यात क्षेत्रातील कामगिरी :

लघुउद्योगांची निर्यात क्षेत्रातील कामगिरी, विशेषत: नव्या आर्थिक धोरणानंतरच्या काळातील कामगिरी मात्र समाधानकारक आहे. तक्ता क्र. 2 मध्ये दिलेल्या माहितीनुसार 1980-81 ते 1990-91 दरम्यान देशाची एकूण निर्यात 4.84 पटींनी म्हणजे वर्षाला 17.09 टक्के दराने तर लघुउद्योगांची निर्यात 5.54 पटींनी म्हणजे प्रतिवर्ष 18.67 टक्के दराने वाढली. या तुलनेत 1990-91 ते 2000-2001 या काळातील लघुउद्योगांच्या निर्यात वाढीचा वेग जास्त आहे. या काळात भारताची एकूण निर्यात वर्षाला 20.12 टक्के दराने वाढत असतांना लघुउद्योगांची निर्यात 21 टक्के दराने वाढली. याशिवाय लघुउद्योगांच्या निर्यातीचे त्यांच्याच उत्पादनाशी आणि भारताच्या एकूण निर्यातीशी असणारे शेकडा प्रमाण जे 1980-81 मध्ये अनुक्रमे 5.85 टक्के आणि 24.48 टक्के होते ते 1990-91 मध्ये 5.86 टक्के आणि 27.97 टक्के इतके झाले. 1994-95 मध्ये या प्रमाणात वाढ होऊन ते 10.22 टक्के आणि 36.49 टक्क्यांपर्यंत पोहचले. त्यानंतर त्यात अल्पशी घट झालेली असली तरी सद्या ही प्रमाणे 1981 आणि 1991 च्या प्रमाणांच्या तुलनेत जास्त म्हणजे 9.48 टक्के आणि 30.06 टक्के इतकी आहेत. मंदीची परिस्थिती आणि तीव्र स्पर्धेच्याकाळात लघुउद्योग क्षेत्राने मिळविलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे.

### लघुउद्योगांच्या समस्या :

1991 नंतर लघुउद्योग क्षेत्राच्या पारंपरिक व इतर सर्व समस्या कमी होतील अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात असे न होता नवीन समस्यांची त्यात भर पडली. त्यापैकी काही समस्या अतिशय गंभीर स्वरुपाच्या आहेत. त्यांचा संक्षिप्त गोषवारा पुढील प्रमाणे आहे .

(1) अपुरा व अनियमित वित्तपुरवठा ही भारतातील लघुउद्योगांची आजची प्रथम क्रमांकाची समस्या आहे. देशातील वित्तसंस्था आणि बँकांनी या उद्योगांना पुरेसा वित्तपुरवठा करावा अशी रास्त अपेक्षा केली जाते. प्रत्यक्षात मात्र ती अल्पप्रमाणातच पूर्ण होतांना दिसते. कारण बँका व वित्तसंस्थांचा कल मोठे उद्योग आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना वित्तपुरवठा करण्याकडे जास्त आहे. याचा परिणाम लघुउद्योगांना दिल्या जाणाऱ्या वित्तपुरवठ्याचे प्रमाण घटण्यात होत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँकाच्या वित्तपुरवठ्याचा कल पाहिल्यास याची प्रचिती येते.

तक्ता क्र. 2

लघुउद्योगाची निर्यात क्षेत्रातील कामगिरी

(चालू किंमतीस, कोटी रुपये)

| अ.क्र. | वर्ष | भारताची एकूण निर्यात | लघुउद्योग क्षेत्राची एकूण निर्यात | भारताच्या एकूण निर्यातीत लघु उद्योगांच्या निर्यातीचे प्रमाण टक्के | लघु उद्योगांच्या निर्यातीचे, लघु उद्योगांच्या उत्पादनाशी प्रमाण टक्के |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 1980-81 | 6711 | 1643 | 24.48 | 5.85 |
| 2. | 1990-91 | 32,527 | 9100 | 27.97 | 5.86 |
| 3. | 1991-92 | 43,978 | 13,883 | 31.56 | 7.76 |
| 4. | 1992-93 | 54,350 | 17,785 | 32.72 | 8.50 |
| 5. | 1993-94 | 69,548 | 25,307 | 36.38 | 10.47 |
| 6. | 1994-95 | 82,338 | 30,053 | 36.49 | 10.22 |
| 7. | 1995-96 | 1,06,353 | 36,470 | 34.29 | 10.24 |
| 8. | 1996-97 | 1,18,817 | 39,249 | 33.03 | 9.51 |
| 9. | 1997-98 | 1,30,101 | 43,946 | 33.77 | 9.44 |
| 10. | 1998-99 | 1,41,604 | 48,979 | 34.58 | 9.28 |
| 11. | 1999-00 | 1,59,561 | 53,975 | 33.82 | 9.33 |
| 12. | 2000-01 | 2,03,571 | 61,212 | 30.06 | 9.48 |
| 1980-81 ते 1990-91या काळातील वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (टक्के) | | 17.09 | 18.67 | - | - |
| 1990-91 ते 2000-01या काळातील वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (टक्के) | | 20.12 | 21.00 | - | - |

टीप : रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात लघुउद्योगांच्या निर्यातीचे 2000-01 चे मूल्य 13.13 बिलियन डॉलर दिले असून त्याचे प्रचलित विनीमय दरानुसार रुपयात परिवर्तन केले आहे.

स्त्रोत : RBI, Report on currency and finance (Relevant Issues)

मार्च 1998 मध्ये या बँकाच्या एकूण वित्तपुरवठ्यात लघुउद्योगांना मिळालेल्या वित्तपुरवठ्याचे प्रमाण 17.6 टक्के होते. 1999 मध्ये त्यात घट होऊन ते 17.3 टक्क्यांपर्यंत कमी झाले. त्यानंतरही या प्रमाणात सतत घट होत राहिली व मार्च 2000,2001 आणि 2002 मध्ये ते अनुक्रमे 15.6 टक्के, 14.2 टक्के आणि 12.5 टक्क्यापर्यंत खाली आले. अपुऱ्या वित्तपुरवठ्यामुळे अनेक लघुउद्योग हतबल झाले, काही दुर्बल बनले व बरेच आजारी पडले.

2. मोठ्या उद्योगांशी करावी लागणारी स्पर्धा ही लघु उद्योग क्षेत्राची आणखी एक ज्वलंत समस्या आहे. लघुउद्योगात देशी आणि विदेशी उद्योगांना 24 टक्क्यांपर्यंत समभाग खरेदी करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. तिचा आधार घेऊन मोठे उद्योग आणि बहुराष्ट्रीय कंपन्या लघुउद्योगांना मिळणाऱ्या सवलतींचा फायदा घेण्यासाठी लघुउद्योगात भांडवल गुंतवित आहेत. परंतु त्यामुळे अनेक लघुउद्योगांवर या बलाढ्य उद्योगांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. परिणामी लघुउद्योग क्षेत्र आणि मोठ्या उद्योगांमध्ये सहकार्य वाढविण्याचा व तंत्रज्ञानाची देवाण घेवाण करण्याचा सरकारचा उद्देश फारसा सफल झालेला नाही.

3. आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे आजारी लघुउद्योगांची संख्या कमी होईल असे गृहित धरण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र 1991 ते 2001 या

**तक्ता क्र. 3**
**भारतीय लघुउद्योगांचे आजारपण**

| अ.क्र. | वर्ष (मार्च अखेर) | आजारी लघुउद्योगांची संख्या | आजारी लघुउद्योगांकडील बँकाची थकित कर्जे (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | 1991 | 2,21,472 (98.96) | 2792 (25.93) |
| 2 | 1994 | 2,56,452 (99.03) | 3680 (26.87) |
| 3 | 1998 | 2,21,536 (98.89) | 3856 (24.59) |
| 4 | 2001 | 2,49,630 (98.69) | 4506 (17.48) |
| | 1991 ते 2001 या काळातील वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (शेकडा) | 1.20 | 4.90 |

टीप : कंसातील आकडे एकूण आजारी उद्योग (SSI+Non SSI) आणि एकूण थकित कर्जांत लघुउद्योगांचे शेकडा प्रमाण दाखवितात.

स्रोत : RBI Report on Currency and Finance (Relevant Issues)

काळात (तक्ता क्र. 3) आजारी लघुउद्योगांची संख्या 2,21,472 वरुन 2,49,630 पर्यंत आणि त्यांच्याकडील बँकाचे थकित कर्ज 2,792 कोटी रुपयांवरुन 4,506 कोटी रुपयांपर्यंत वाढले. याचा अर्थ आर्थिक सुधारणांच्या पहिल्या दशकात आजारी लघुउद्योगांत वर्षाला 1.20 टक्के दराने तर त्यांच्याकडील थकित कर्जात 4.90 टक्के दराने वाढ झाली. विशेष म्हणजे महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश आणि आंध्रप्रदेश ही सहा राज्ये जी लघुउद्योगांच्या विकासात सध्या आघाडीवर आहेत त्यांचा 1996 मध्ये एकूण आजारी लघुउद्योग आणि त्यांच्याकडील थकित कर्जातील वाटा 56.77 टक्के आणि 62.97 टक्के इतका मोठा होता. मार्च 2000 मध्ये त्यात आणखी वाढ होऊन ते प्रमाण अनुक्रमे 58.80 टक्के आणि 72.31 टक्क्यांपर्यंत पोहचले. भांडवलविषयक अडचणी, विपणनाचे प्रश्न, या सारख्या अंतर्गत व बाह्य कारणांमुळे या समस्येची तीव्रता सतत वाढतच राहिली.

4. सध्या लघुउद्योगांना त्यांनी विकलेल्या मालाचे पैसे देखील वेळेवर मिळत नाहीत. वसुलीचा विलंब कालावधी काही वेळा सहा महिन्यापासून एक वर्षाचा असतो. त्यामुळे त्यांच्यासमोर खेळत्या भांडवलाची समस्या निर्माण होऊन बरेच लघुउद्योग आर्थिक अरिष्टात सापडतात. ही समस्या सोडविण्यासाठी सरकारने 1993 मध्ये विलंब प्रदान कायदा संमत केला. परंतु त्याचा लघुउद्योगांना म्हणावा तसा फायदा झालेला नाही.

5. नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी 836 वस्तुंची उत्पादने लघुउद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आली होती. त्यापैकी 30 वस्तुंचे आरक्षण आता रद्द करण्यात आले आहे. त्यात तयार कपडे, शेतकी अवजारे, आईस्क्रीम, शीतपेये, बिस्किटे, कृत्रिम पेय आणि पाळीव पक्षांचे अन्न उत्पादन करणाऱ्या लघुउद्योगांचा समावेश आहे. या सर्वांची गणना यशस्वी लघुउद्योगांमध्ये केली जात होती. परंतु आता त्यांना मोठ्या उद्योगांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. त्यामुळे पूर्वीच्या तुलनेत त्यांच्या समस्येची व्याप्ती वाढलेली दिसते.

6. मुक्त व्यापार धोरणाचा स्वीकार केल्यामुळे सरकारला आयातीवरील निर्बंध रद्द करावे लागले आहेत. त्याचा फटका देशातील लघुउद्योगांना बसला आहे. कारण खुल्या धोरणामुळे स्वस्त आणि दर्जेदार वस्तुंची आयात भारतात वाढली आहे. विशेषत: चीनी वस्तुंच्या प्रवेशामुळे भारतीय लघुउद्योगांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. तक्ता क्र. 4 मधील किंमतीची तुलनात्मक स्थिती बघितल्यास याची प्रचिती येते. परिणामस्वरुप अनेक लघुउद्योगांना स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी आज तारेवरची कसरत करावी लागत आहे.

7. या शिवाय कच्च्यामालाचा तुटवडा, कालबाह्य तंत्रज्ञान, प्रशिक्षण व संशोधन सुविधांचा अभाव आणि देशातील आर्थिक मंदीची स्थिती इत्यादी समस्यांमुळे देखील भारतीय लघुउपक्रमी सध्या बरेच संकटात आहेत.

**उपाययोजना :**

लघुउद्योगांच्या विकासाची सद्यस्थिती आणि समस्यांचे स्वरुप लक्षात घेता या क्षेत्रासाठी पुढील उपाययोजना सुचविता येतील.

1. लघुउद्योगांची विविध नियंत्रणे आणि जाचक कायद्यांच्या कचाटयातून सुटका करण्यासाठी शासनाने 'लघु उपक्रम विकास पत्र -2000' तयार केले आहे. या विधेयकात विवरणपत्र भरण्याची प्रक्रिया सुलभ करणे, 13 महत्वाच्या कामगार कायद्यातील तरतुदी लघुउद्योगांसाठी स्थगित ठेवणे,

**तक्ता क्र. 4**

**चीन व भारतीय वस्तूंच्या किंमतीची तुलनात्मक स्थिती** (आकडे रुपयात)

| अ.क्र. | वस्तूचे नाव | चीन | भारत |
|---|---|---|---|
| 1. | व्ही.सी.डी. प्लेअर | 2900 | 4500 |
| 2. | पॉकेट रेडिओ | 130 | 180 |
| 3. | स्क्रू ड्रायव्हर, पाना व इतर 22 हत्यारांचा संच | 80 | 400 |
| 4. | मोटार गाडीतील स्टिरिओ | 2200 | 3500 |
| 5. | ड्रायसेल पेन्सिल बॅटरी | 1.50 | 7 |
| 6. | कुलुप | 225 | 310 |
| 7. | मनगटी घड्याळ | 120 | 250 |
| 8. | वीजेचा काटकसरीने वापर करणारा दिवा | 90 ते 140 | 240 ते 250 |
| 9. | स्वयपाक घरातील सुरी | 17 | 70 |
| 10. | टी.व्ही.सेट | 7000 | 12,000 |

'इन्स्पेक्टर राज' रद्द करणे, लघु उद्योगांचा माल शासनाने विकत घेणे, कर्जपुरवठ्याची मार्गदर्शक तत्वे ठरविणे आणि विशिष्ट परिस्थितीत एखादी वस्तू लघुउद्योग क्षेत्रातच उत्पादित करता येईल अशी व्यवस्था करण्यासारख्या तरतुदी आहेत. हे विधेयक मंजुर होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात यावे. म्हणजे कायद्याच्या कचाटीत सापडलेल्या लघुउपक्रमींना उत्तेजन मिळून लघुउद्योगांच्या विकासाला चालना मिळेल.

2. नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे देशात आधुनिक तंत्रज्ञानाचा व संगणक प्रणालीचा वापर वाढला आहे. त्याचे अनेक फायदे असले तरी त्यामुळे अनेक कामगार व विशेषत: अकुशल व अशिक्षित कामगार बेरोजगार होत आहेत. त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची क्षमता लघुउद्योगांमध्येच आहे. तेव्हा शासनाने स्थानिक बाबींना प्राधान्य देणारे श्रमप्रधान प्रतिमान विकसित करावे, म्हणजे जागतिक, स्थानिक आणि आधुनिक प्रणालीचा योग्य समन्वय देशात प्रस्थापित होऊ शकेल.

3. जागतिकीकरणाच्या व खुल्या स्पर्धेच्या माध्यमातून लघु उद्योगक्षेत्रासमोर निर्माण होणाऱ्या अनिष्ट स्पर्धेला तोंड देण्याचे सामर्थ्य लघुउद्योगांमध्ये निर्माण व्हावे या दृष्टिने शासनाने लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने सर्वतोपरी प्रयत्न करावे.

4. लघुउद्योगांना देण्यात येणारे संरक्षण कायम नसावे. हे उद्योग विदेशी उद्योगांशी स्पर्धा करण्याच्या क्षमतेचे झाल्यानंतर त्यांचे संरक्षण काढून घेण्यात यावे. स्पर्धाशक्ती प्राप्त करण्याचा कालावधी निश्चित असावा. तो संपल्यानंतर देण्यात येणाऱ्या सवलती बंद केल्या जातील याची स्पष्ट जाणीव लघुउपक्रमींना

देण्यात यावी. यामुळे योग्य उद्योगांना प्रेरणा मिळेल आणि लघुउपक्रमी सवलतीचे व सवयीचे गुलाम होणार नाहीत.

5. लघुउपक्रमींनी देखील प्रत्येक बाबीसाठी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धात्मक व दर्जेदार उत्पादनावर भर द्यावा. नव्या धोरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला आव्हान म्हणून स्वीकारावे. आपले सामर्थ्य दाखवून देण्याची ही एक संधी मानावी. त्यामुळे लघुउद्योग सक्षम होऊन, स्वत:च्या पायावर उभे राहतील, त्यांची निर्यात वाढेल आणि निकृष्ट उत्पादनाच्या निर्यातीमुळे विदेशात भारताची बदनामी होणार नाही.

6. भारताच्या सध्याच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांचे वर्चस्व आहे. त्यांच्या जाचक अटींमुळे सरकारला आयातीवर फारशी बंधने घालता येणार नाहीत. तेव्हा जनतेनेच पुढाकार घेऊन लघुउद्योग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या स्वदेशी वस्तूंच्या वापराला प्राधान्य द्यावे. असे झाले तर लघुउद्योगांच्या वस्तूंची मागणी वाढेल.

7. 1991 नंतर देशात व विशेषत: ग्रामीण भागात आर्थिक विषमता व दारिद्र्याचे प्रमाण बरेच वाढले आहे. नवीन सुधारणा कार्यक्रम 'धनधार्जिणा' व 'परधार्जिणा' असल्याची सर्वत्र टीका होत आहे. अशा परिस्थितीत लघुउद्योगांच्या विकासाला अग्रक्रम दिला तर प्रादेशिक व व्यक्तीगत पातळीवरील विषमता कमी होण्यास व दारिद्र्यनिर्मुलनास बराच हातभार लागेल.

8. भारतीय लघुउद्योगांनी प्राचीन काळापासून स्वत:ची विशेष अशी प्रतिमा निर्माण केलेली आहे. आपली संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात नेण्याचे व देशाला वैभव प्राप्त करुन देण्याचे मोलाचे कार्य या उद्योगांनी केलेले आहे. त्यामुळे त्यांचा झपाट्याने विकास झाला तर भारतीय समाजाचे, सांस्कृतिक मूल्यांचे व पर्यायाने भारतीय समाजाचे रक्षण होण्यास बरीच मदत होईल.

**समारोप :**

1980च्या दशकाशी तुलना करता आर्थिक सुधारणांच्या पहिल्या टप्प्यात निर्यातीचा अपवाद वगळता लघुउद्योग क्षेत्रातील उद्योगांची संख्या, गुंतवणूक, रोजगार आणि उत्पादनवाढीची गती काहीशी मंदावलेली आहे. राज्यनिहाय असमतोलाचे प्रमाण देखील या काळात वाढलेले दिसते. तसेच शासनाने बरेच प्रयत्न करुनही लघुउद्योगांच्या समस्यांचे प्रमाण कमी झाले नाही. उलट जुन्या समस्यांमध्ये नवीन समस्यांची आणखी भर पडलेली आहे. आज लघु उद्योगांपुढे अनेक आव्हाने आहेत. असे असले तरी सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाणे भारताला परवडणारे नाही. शासनाने आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या पर्वात लघुउद्योगक्षेत्रासाठी योग्य धोरण तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. लघुउपक्रमींनी देखील आपला अल्पसंतुष्टपणा सोडून खुल्या अर्थव्यवस्थेतील नव्या जागतिक वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी सर्वांगिण गुणवत्तेत वाढ करावी. असे झाले नाही तर अनेक लघुउद्योग आजारी पडतील आणि रोजगारावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल. मात्र त्यामुळे बेकारांची संख्या वाढेल.

## संदर्भ सूची


1. Agrawal, A.N. and Verma, H.O.(1997), Indian Economy: Statistical year Book National Publishing House, New Delhi.

2. Balsubramanya, M.H. (1999), India's Small Industry Policy in the 90s: Warning Protectionism, The Indian Economic Journal, Vol.47, No.2 Oct.-Dec.1999.

3. Datta, R.(1997), Economics Reforms in India-A.Critic, S. Chand and Co., New Delhi.

4. Gedam, R.(1999), Statistical Profile of India-1999, Deep and Deep Publication, New Delhi.

5. Government of India, Economic Survey, 1996-97, 1998-99 and 2000-2001.

6. Jalan, Bimal(1991), India's Economic Crisis-The way Ahead, Oxford University Press, New Delhi.

7. Joshi, V.and Little, IMD.(1996), India's Economic Reforms, Oxford University Press, New Delhi.

8. Kapila,U.(2002), Indian Economy : Since Independence, Academic Foundation, New Delhi.

9. खेर,सी.पं. 1999, आर्थिक सुधारणांचे नवे पर्व, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

10. Kulkarni, P.R.and Kaveri, V.S.(1999),Changing Structure and Growth of SSI Sector, SEDME, Vol.26, No.2,June1999.

11. R.B.I. Report on Currency and Finance, 1996-97, 1998-99 and 2000-2001.

12. R.B.I.(2001), Annual Report:2000-2001, Suppliment to R.B.I. Bulletin, Sept.2001.

13. R.B.I.(2002), Annual Report: 2001-2002, Supplement to R.B.I. Bulletin, Sept.2002.

14 Shridhar, K.(1999), Small Scale Industries-Need for Long Term Plan,Indian Economist, May-1999.

15. Subramanian, S.(1999), India's Economic Performance and Reforms: A Prespective for New Millenium, Konark Publishers, New Delhi.

16. Suri, M.M.(2001),India: A Decade of Economic Reforms. 1991-2001, New Century Publications, New Delhi.

● ● ●

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## 'अर्थसंवाद' च्या अंकांतील लेख

अर्थसंवाद च्या पूर्वीच्या अंकांतील विशिष्ट लेख कोणाला हवे असतील तर ते मागणीनुसार झेरॉक्स करुन देण्याची व्यवस्था केलेली आहे. संबंधिताना झेरॉक्सचा खर्च द्यावा लागेल. आपली मागणी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्याकडे त्यांच्या औरंगाबाद वरील पत्त्यावर नोंदवावी.

**विनायक देशपांडे**

प्रमुख संपादक

# जागतिकीकरणाचा अविकसित देशांच्या जीवन शैलीवर प्रभाव

● श्री. आ. देशपांडे, नागपूर
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद*

सन 1947 मध्ये ब्रेटनवुडस् (अमेरिका) येथे भरलेल्या परिषदेत जागतिकीकरणाची बीजे सापडतात. तेव्हापासून आन्तरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि निर्माण करण्यात आलेल्या इतर संस्था जगाच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवीत आहेत. असे असूनही आज जगात पूर्वीपेक्षा अधिक गरीब लोक आहेत, ही दु:खाची बाब आहे. निरनिराळ्या देशांमधील श्रीमंत आणि गरीब लोकांमधील दरीच नव्हे तर प्रत्येक देशातील श्रीमंत व गरीब लोकांमधील दरी वाढली आहे. दहशतवाद आणि हिंसा या गोष्टी रोजच्या झाल्या आहेत. अमेरिकेसारख्या श्रीमंत आणि शक्तिमान देशालाही याचा हादरा बसला आहे. सर्वदूर पर्यावरण ढासळत आहे आणि तरीही आज जगात अस्तित्वात असलेल्या गरिबी, पर्यावरणाबाबत असुरक्षितता आणि इतर देशांवर जागतिकीकरण हाच एकमेव रामबाण उपाय आहे, यावर विश्वास ठेवायला सांगण्यात येत आहे. भारत आणि इतर विकसनशील देशांना या बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

**जागतिकीकरणाचा अर्थ :**

पूर्वीच्या 'प्रशुल्क नि व्यापार यासंबंधी सर्वसाधारण', करारातील(GATT) प्रशुल्क आणि शुल्केतर अडथळे दूर करुन जागतिक व्यापार वाढविणे, हा मर्यादित उद्देश होता. 1 जानेवारी 1995 पासून गॅटची जागा आता जागतिक व्यापार संघटनेने (WTO) घेतली आहे. यांत आता कापड आणि तयार कपडे, कृषी, व्यापाराशी संबंधित गुंतवणुकीचे कार्यक्रम (TRIMS), व्यापार संबंधित बौद्धिक मालमत्तेचे हक्क (TRIPS), मूल्यावपाती विक्रीविरुद्ध (anti-dumping) धोरणे, व्यापाराला तांत्रिक अडथळे, सेवांबाबत व्यापार आणि इतर अनेक विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

जागतिकीकरण म्हणजे वस्तू आणि सेवांच्या व्यापारात जलद वाढ आणि जागतिक बाजारपेठांची निर्मिती होय. आर्थिक परस्परावलंबित्वाच्या पलिकडे हे जात असून माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे काळ आणि अवकाशाची व्याप्तीही यामुळे कमी झाली आहे. तंत्रज्ञान आणि दळणवळणाच्या सुधारणांमुळे वाहतुकखर्च सतत

कमी होत आहे. जागतिकीकरणामुळे जगाचा संकोच होत असून याचा परिणाम म्हणजे जग हे 'जागतिक खेडे' बनत चालले आहे. हा बदल म्हणजे केवळ व्यापारासाठी देशाच्या सीमा खुल्या करणे, एवढेच नसून, यात ज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा जलद प्रसार, दळणवळण व वाहतुकीचे सुधारलेले जाळे तसेच आन्तरराष्ट्रीय संस्थांच्या विचारात आणि व्यवहारांच्या पद्धतीत बदल हेही अभिप्रेत आहे.

जागतिकीकरण राष्ट्रीय संकल्पनेला भेदून जात असून त्याचे केवळ आर्थिक, राजकीय, पर्यावरणविषयक आणि तांत्रिक परिणामच होत नसून त्यात दूरगामी असे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामही होणार आहेत, यात शंका नाही. जागतिकीकरण भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशांसाठी पूर्णत: फायदेशीर किंवा चांगले आहे, असे म्हणता येत नाही, परंतु यातून सुटका नाही. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली असून ती आता थांबविता येणे शक्य नाही, कोणताही देश आता तटस्थ किंवा वेगळा राहू शकत नाही. मागासलेले आणि विकसनशील देश या प्रक्रियेत अचानक आणि अजाणतेपणे सापडलेले आहेत. या देशांमधील निरनिराळया सामाजिक गटांमध्ये एकप्रकारची असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या स्थितीत या देशातील समाजांना जागतिकीकरणाचा संपूर्ण अन्वयार्थ समजून घेवून आपापल्या देशांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याचे दृष्टीने जागतिक व्यापार संघटनेशी (WTO)करार करताना योग्य त्या तरतुदी करुन घेणे अत्यावश्यक आहे.

या लेखात जागतिकीकरणाचे प्रमुख पैलु लक्षात घेवून त्याचा भारतीय संस्कृतिच्या संदर्भात काय प्रभाव पडेल, याचे विश्लेषण केलेले आहे.

**देशाचे सार्वभौमत्व संकुचित होत आहे :**

जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय बाजारपेठां मध्ये इतर राष्ट्रांच्या बाजारपेठांचा हस्तक्षेप तर होईलच परंतु यात उदारीकरण, निर्नियंत्रण, राजकोषीय शिस्त इत्यादी बाबीही अभिप्रेत आहेत. यामुळे आर्थिक धोरणांच्या आणि व्यवहारांच्या क्षेत्रात प्रत्येक देशाच्या सार्वभौमत्वाचा संकोच होत जाईल. भारतात 1992 पासून नवीन आर्थिक धोरणाच्या नावाखाली ही प्रक्रिया सुरु झाली आहे. यामुळे प्रत्येक देशाचे निर्णय प्रक्रियेतील स्वातंत्र्यही हळूहळू संपुष्टात येत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जसजशी गती प्राप्त होईत तसतशी निरनिराळ्या देशातील व्यापार आणि वाणिज्य व्यवहारांमध्येही जलद वाढ होत जाईल. यामुळे केवळ वस्तु आणि सेवाच राष्ट्रीय सीमा ओलांडून जातील असे नव्हे तर निरनिराळ्या देशांमधील दळणवळण मोठ्या प्रमाणावर होउ लागेल. व्यापारी आणि धंदेवाईक लोकांच्या हालचालींना वेग येईल तसेच निरनिराळ्या देशातील भिन्न संस्कृतीच्या लोकांचे परस्परांशी संबंध वाढतील. याचा लोकांच्या जीवनशैलीवर आणि त्यांच्या संस्कृतीवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.निरनिराळ्या देशातील लोकांमध्ये सहजतेने आणि जलद गतीने दळणवळण आणि परस्परसंबंध वाढल्यामुळे निरनिराळ्या देशातील सामाजिक गटांच्या विचारसरणीवर तसेच राहणीमानावर परिणाम होणे अपरिहार्य आहे. अशा रीतीने जागतिकीकरणाचा राष्ट्रांतील संस्कृतीवर विविध मार्गांनी प्रभाव पडणार यात शंका नाही. यामुळे निरनिराळ्या देशातील जुन्या आणि नव्या संस्कृतीवर आक्रमण होईल का? यामुळे सांस्कृतिक संघर्ष निर्माण होतील का? असे महत्वाचे प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांचा विचार होणे आवश्यक आहे.

**भारतीय संस्कृतीचे संक्रमण :**

भारतीय संस्कृती अतिशय पुरातन असून तिचा विकास ५००० वर्षापेक्षा अधिक काळ झाला आहे. या संस्कृतीने भारतीय लोकांचे जीवन समृद्ध

केले आहे. या संस्कृतीमुळे भारतीय लोकांची एक मानसिकता तयार झाली असून,त्यांची एक मूल्य पद्धती आणि जीवनमार्ग तयार झाला आहे. बराच काळ लोटला असूनही आणि लोकसंख्येची प्रचंड वाढ होवूनही भारतीय जीवनपद्धती सातत्याने टिकून आहे हे लक्षणीय आहे. सुरुवातीला ग्रीक, हूण, मुगल आणि त्यानंतर ब्रिटिशांच्या आक्रमणानंतरही भारतीय संस्कृती टिकून आहे, ही अभिमानाची बाब आहे.

भारतीय समाजात विविधता आणि संमिश्रता आहे. भारतात हिन्दू बहुसंख्य म्हणजे 75 टक्के आहेत. तरीही मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी आणि इतर धर्मीय लोकांचे भारतीय समाजात महत्वाचे स्थान आहे. भारतीय घटना धर्मनिरपेक्ष असून सर्व नागरिकांना त्यांचे लिंग, जात किंवा धर्माचा विचार न करता समान हक्कांची हमी देण्यात आली आहे.प्रत्येक समाजाने आपले स्वतःचे वैशिष्टय कायम राखून भारतीय संस्कृतीच्या विकासाला हातभार लावला आहे. सांस्कृतिक विविधता हा भारतीय संस्कृतीचा आणि जीवनपद्धतीचा गाभा आहे, असे म्हणता येईल. ही भारतीय संस्कृतीची शक्ती असून जगातील इतर संस्कृतीशी तुलना करता भारतीय संस्कृती अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे, यात शंका नाही.

भारतीय लोकांनी सांस्कृतिक क्षेत्रात बरेच उच्च स्थान पटकावले असून भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता वाङ्मय, ग्रहज्योतिष शास्त्र, धर्म व अध्यात्म, तत्वज्ञान, कला, विज्ञान आणि अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांच्या संदर्भात सिद्ध झाली आहे. भारतीय संस्कृतिचे प्रतिबिंब गायन व नृत्यकला , चित्रकला, शिल्पकला,विविध सण आणि उत्सव तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पडलेले आढळते. कृषी हा भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय असून 65% लोक अजूनही कृषी आणि संलग्न उद्योगांवर अवलंबून आहेत. भारतातील निरनिराळे सण आणि उत्सव विविध कृषी व्यवहारांशी संबंधित आणि जोडलेले आहेत. काळाच्या ओघात या जीवनशैलीत काही बदल झाले आहेत परन्तु त्यांचा गाभा व सार मात्र कायम आहे.

भारतीय समाज बहुदलीय आहे. निरनिराळ्या सामाजिक गटांमध्ये सांस्कृतिक सुसंवाद असल्यामुळे त्यांच्यात सहकार्याची आणि सामंजस्याची भावना निर्माण होते. फाळणी झाल्यानंतरही भारत पाकिस्तान आणि बांगलादेश यांचे सांस्कृतिक संबंध कायम राहिले असून त्यामुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध होते. अधूनमधून भिन्न समाजातील लोकांमध्ये तणाव निर्माण होतात हे खरे आहे. परंतु चर्चा आणि वैचारिक देवघेवीमुळे परस्परांवरील विश्वास कायम राहातो. गौतम बुद्ध आणि महात्मा गांधी यासारख्या श्रेष्ठविचारवंतामुळे भारतीय संस्कृती समृद्ध झाली आहे. रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आमचे धर्मग्रंथ असून आमच्या लोकांच्या विचार सरणीवर आणि राहणीवर त्यांचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. भारत सरकार सांस्कृतिक धोरणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये रस घेवून मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रम घडवून आणते. क्षेत्रीय सांस्कृतिक उत्सव, आन्तरविद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धा इत्यादी कार्यक्रमामधून सांस्कृतिक थाटमाटाचे तसेच लोकनृत्य अभिजात आणि आधुनिक संगीत इत्यादींचे विलोभनीय दर्शन घडते.

**जागतिकीकरणाची आव्हाने :**

आता जागतिकीकरण आपल्याबरोबर कायमचे राहणार आहे, हे ठरल्यामुळे प्रत्येक सदस्य देशाने, विशेषतः अविकसित देशांनी याचा संपूर्ण अर्थसमजून घेणे आवश्यक आहे. जागतिक व्यापार संघटने बरोबर करारमदार करताना या राष्ट्रांनी अत्यंत काळजीपूर्वक आणि जागरुक राहणे अत्यावश्यक

आहे. राष्ट्रीय हिताचे दृष्टिने या राष्ट्रांनी जास्तीत जास्त सवलती पदरात पाडून घेतल्या पाहिजेत. तसेच त्यांनी जागतिकीकरणामुळे पुढे ठाकलेल्या आव्हानांना तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे. 'संगणन' ही नव्या जगाची भाषा या दृष्टिने पुढे आली आहे. संगणनाशिवाय दूरदर्शन, विज्ञान व बाह्य विश्वाचे ज्ञान, माहिती तंत्रज्ञान, प्रचार माध्यमांची क्रांती इत्यादी बाबींचाही लोकांच्या विचारसरणीवर तसेच त्यांच्या जीवनशैलीवर प्रभाव पडत आहे. या नव्या जगातील स्पर्धेला तोंड देण्यासाठी प्रत्येक समाजाला योग्य ती कुशलता विकसित करणे भाग आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांपाशी अफाट साधनधन आणि प्रगत तंत्रज्ञान असून त्याचे प्रत्येक समाजाच्या सांस्कृतिक वारशावर आक्रमण होणार हे निश्चित ! प्रत्येक समाजाने ही आव्हाने पेलण्याची तयारी ठेवून आपला सांस्कृतिक वारसा टिकविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केली पाहिजे. ही आव्हाने विविध प्रकारची असून ती विविध बाजूने येण्याची शक्यता आहे.यापैकी काही आव्हानांचा विचार करु या.

### पाश्चिमात्य आणि परंपरागत समाजामधील सांस्कृतिक संघर्ष :

आधुनिकीकरण, विकास आणि जागतिकीकरण या संकल्पना मुळात पाश्चिमात्य देशांमधील आहेत. पारंपरिक समाजांचे विवेकी अशा आधुनिक समाजामध्ये परिवर्तन करणे म्हणजे आधुनिकीकरण होय. यात तंत्रज्ञान, त्याला आधार देणारी मूल्यव्यवस्था आणि त्या मूल्यव्यवस्थेला धरुन ठेवणारी सामाजिक रचना या बाबी अन्तर्भूत आहेत. या पैकी भारताने तांत्रिक विकासाचा भागच स्वीकारला मात्र तत्संबंधीत मूल्यव्यवस्था आणि सामाजिक संरचना स्वीकारली नाही. आपला समाज अजूनही पारंपरिक आहे. यामुळे आमच्यासारख्या विकसनशील समाजाची मूल्य-व्यवस्था आणि पाश्चिमात्य संस्कृती याच्यात संघर्ष आहे. पारंपरिक समाजांची रचना अनौपचारिक असून त्यांच्यातील संबंध व्यक्तिगत असून ते निरनिराळया सामाजिक गटांच्या सहकार्यावर आणि त्यांच्यातील सुसंवादावर अवलंबून असतात. तर औपचारिक स्वरुपाची व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य देणारी व कार्यक्षमता आणि स्पर्धा यांना महत्वाची मानणारी जीवनशैली पाश्चिमात्य जगात आढळते. या मुळे विकसनशील देशांवर जागतिकीकरण लादण्याच्या प्रयत्नांना विरोध होत असावा. यासंदर्भात, काही उदाहरणे देणे उपयुक्त होईल.

### कृषी आणि ग्रामीण जीवनावर प्रभाव :

उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे भारतातील कृषी व्यवस्थेला आणि ग्रामीण लोकांच्या जीवनाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे शेतकरी आणि ग्रामीण जनतेला अत्यंत चिंता वाटत आहे. जागतिकीकरणामुळे भूमी, पाणी, जैविक-विविधता इत्यादी नैसर्गिक साधनधनाच्या मालकी हक्काच्या केंद्रीकरणावरील सर्व मर्यादा दूर करण्यात आल्यामुळे पर्यावरणाची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

बहुदेशीय राष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणात ग्रामीण क्षेत्रांवर आक्रमण करीत आहेत. ग्रामीण जनतेच्या कल्याणाबद्दल त्यांना अजिबात आस्था नाही. त्यांचा स्पर्धा, कार्यदक्षता आणि बाजारासाठी माल पुरविण्यातच विश्वास आहे. हा दृष्टिकोन शेतकऱ्यांच्या सध्याच्या व्यवहाराशी पूर्णपणे विसंगत आहे. शेतकऱ्यांचे व्यवहार पारंपरिक प्रथा आणि शहाणपणावर अवलंबून आहे. शेतकरी उत्पादन मुख्यत: स्वत:च्या उपयोगासाठी करतात. उदारीकरणामुळे काही राज्यातील जमिनीचे बहुराष्ट्रीय कंपन्याकडे हस्तांतरीत झाले आहे. या कंपन्या चैनीची अन्नेतर (रोख पिके) पिके घेतात. यामुळे शेतकऱ्यांमधे अन्नाबाबत असुरक्षितता निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी जमीन आणि साधनधन गमावले असून वाढत्या किमतींमुळे ते अन्न धान्य बाजारातही खरेदी करण्यास असमर्थ आहेत. दिल्लीच्या संशोधक वंदना शिवा यांच्या अभ्यासावरुन शेतकऱ्यांचा दरडोई दर मासी उपभोग 1950 सालच्या 17 किलोग्रॅम वरुन 1990 साली 13.5 किलोग्रॅम पर्यंत घसरला आहे.

**एकस्व आणि चाचेगिरी :**

जागतिकीकरणात एकस्व (Patent) हक्काचा समावेश आहे. भारतात निरनिराळया वनस्पतींच्या औषधी गुणांबद्दलचे ज्ञान, परंपरेने, सामाजिक मालमत्ता म्हणून समजण्यात येत असून या ज्ञानाचा उपयोग मुक्तपणे केला जातो. शेता वरील बी-बियाणे असो किंवा जंगलातील वनस्पती असो या बाबी समाजाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि जैविक मालमत्तेचा भाग समजला जातो.

भारतात कडूनिंबाचे झाड ही देवाची देणगी समजण्यात येते. अनेक व्याधींवर या झाडाच्या बिया, पाला इत्यादी रामबाण उपाय आहे असे समजल्या जाते. या झाडाचा उपयोग टोळधाड, डास इ. विरुद्ध प्रभावी जंतुनाशक म्हणून केला जातो. एका अमेरिकन कंपनीच्या नजरेस कडुनिंबाच्या झाडाचे हे गुणधर्म लक्षात आले. या कंपनीने काही चाचण्या केल्या, शासनाकडून एकस्व मिळविले आणि ते एकस्व दुसऱ्या अमेरिकन कंपनीला विकून टाकले. ही कंपनी दिल्लीमध्ये या वनस्पतीच्या 20 टन बी-बियाणांवर दररोज प्रक्रिया करुन ते अमेरिकेला निर्यात करणार आहे. याला चोरीव्यतिरिक्त दूसरे नाव देता येणार नाही. वंदना शिवा, याला 'कडूनिंबाची चाचेगिरी' असे म्हणतात. आतापर्यंत या बियांची दर टनाला 300 रुपये असणारी किंमत आता 10 पटीने वाढून रु. 3000 ते 4000 पर्यंत पोहचली आहे.

या अमेरिकन कंपनीने शेतकऱ्यांना कोणतीही भरपाई दिलेली नाही. गॅट आणि जागतिक व्यापार संघटनेच्या सहाय्याने मिळविलेल्या या पेटंट मुळे अनेक रोगांवर विनामूल्य मिळणाऱ्या उपचाराला लोक दूरावले असून शेतकऱ्यांना पिकांसाठी जंतुनाशक म्हणून कडूनिंबाचा वापर करणे अशक्य झाले आहे. बहुद्देशीय कंपन्याच्या 'बौद्धिक मालमत्तेच्या हक्काला' आता भारतातील शेतकऱ्यांनी आव्हान दिले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या 'हळदी' या दुसऱ्या भारतीय वनस्पतीबाबत एकस्व घेण्याच्या प्रयत्नात आहे. अजून त्यांना यश मिळालेले नाही. भारत सरकार आणि इतर विकसनशील देशांच्या सरकारांनी या अनिष्ट प्रथांविरुद्ध दंड थोपटून बहुराष्ट्रीय कंपन्याचे हे आक्रमण मोडून काढले पाहिजे. या बाबतीत स्थानिक सरकारांनी जागरुक राहून विदेशी कंपन्यांकडून होणारी शेतकऱ्याची पिळवणूक थांबविण्यासाठी शक्य त्या सर्व उपायांचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे.

येत्या काही वर्षात या बहुराष्ट्रीय कंपन्या प्रगत तंत्रज्ञान आणि अफाट साधनधनाच्या सहाय्याने अविकसित देशांवर मोठ्या प्रमाणावर आक्रमण करण्याची शक्यता आहे. या आक्रमणामुळे विकसनशील देशांमध्ये अनादिकालापासून राहात असलेल्या समाजांची संस्कृती आणि जीवनशैली नष्ट होण्याची शक्यता आहे. आता पर्यंत कलाकार व त्याचा समाज यांच्यात अत्यंत घनिष्ट असा आध्यात्मिक संबंध रहात असे. प्रचार माध्यमांच्या क्रांती मुळे हे संबंध आता तुटू लागले आहेत. आता पर्यंत समाजातील ज्ञान व शहाणपण मौखिक परंपरेने एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे सातत्याने संक्रमित होत असे. यामुळे विविध सांस्कृतिक प्रकार टिकून राहिले. आता प्रचार माध्यमांची क्रांती आणि माहिती तंत्रज्ञानात झालेल्या परिवर्तनामुळे ही सांस्कृतिक वैशिष्टचे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

## संस्कृती टिकविणे म्हणजे काय ?

जेंव्हा आपण संस्कृती टिकविण्याबद्दल बोलतो, तेंव्हा काय टिकविण्याचा आपला प्रयत्न आहे, याबद्दल आपल्या मनात स्पष्ट कल्पना असली पाहिजे. संस्कृति वृद्धींगत होत जाते आणि वर्षानुवर्षे तिचे संक्रमणही होत जाते. समाजाच्या जशा चांगल्या परंपरा असतात तशाच सामाजिक रचनां मध्ये काही अनिष्ट प्रथाही शिरुन जातात. अशा अनिष्ट प्रथा टाकून देणे आवश्यक आहे. उदा. हिंदु समाजात अनेक शतकांपूर्वी जाती व्यवस्था शिरली. यामुळे हिंदु समाजात जाती, श्रेणी वर आधारलेली व्यवस्था निर्माण होउन असमानता आणि लाजीरवाणी अशी अस्पृश्यता पाळण्याची प्रथा स्वीकारल्या गेली. अशाच अंध श्रद्धा, निषिद्ध बाबी, बळी देणे या सारख्या अनिष्ट प्रथा इतर पारंपरिक समाजांमध्येही आहेत. या अनिष्ट प्रथा टाकून देणे अत्यावश्यक आहे. संस्कृ ति टिकविणे म्हणजे पारंपरिक नृत्याचे प्रकार, संगीत , चित्रकला,धार्मिक उत्सव इत्यादी टिकविणे, असा अर्थ घेतला पाहिजे कारण त्यामुळे समाजातील निरनिराळे गट एकत्र येण्यास सहाय्य होते. असा सांस्कृतिक वारसा हीच समाजाची खरी शक्ती असते.

## सांस्कृतिक विकासात शासनाचा कार्यभार :

जागतिकीकरणामुळे राज्याचे आर्थिक अधिकार कमी झाले आहे हे खरे परंतु राज्यांना देशी संस्कृ तीचा विकास, यासारख्या आर्थिकेतर घटकां बाबत अधिक स्वायत्तता आहे. ही स्वायत्तता लक्षात घेऊन आपापल्या देशातील समृद्ध सांस्कृतिक परंपरा व सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करता येऊ शकते. जागतिकीकरणाचा लाभ घेऊन या समृद्ध परंपरांची ओळख पाश्चात्य जगताला करुन देता येईल. त्या द्वारे आपल्या जीवनशैलीचा, जी साधेपणास प्राधान्य देणारी तसेच भोगवादापेक्षा संयमित जीवनाला महत्व देणारी आहे तिचा प्रसार करता येईल. पाश्चात्य जीवनशैलीतील चंगळवाद हा जागतिकीकरणाद्वारे जगभर पसरण्या ऐवजी पौर्वात्य सभ्यतांमधील जीवनशैलीचे संवर्धन व संगोपन होणे गरजेचे आहे. नैसर्गिक संसाधने अपुरी असल्याने, व ऊर्जा स्त्रोत वेगाने संपुष्टात येऊ लागल्याने चंगळवादाला लगाम घालणारी जीवनशैली आणणे गरजेचे झाले आहे. शासन या दृष्टीने अत्यंत महत्वाची भूमिका बजाउ शकते. चंगळप्रधान जीवनशैलीला प्राधान्य देणाऱ्या भूमिकेपेक्षा संयमित जीवनशैलीला प्राधान्य देण्याची भूमिका शासनाने घेतली तर उपलब्ध परिस्थितीतही जागतिकीकरणाचे आव्हान पेलता येईल. सरकार बाजार यंत्रणेला आधारभूत ठरणाऱ्या संस्था निर्माण करु शकते. आणि गरीब लोकांसाठी अधिक संधीही उपलब्ध करु शकते. खरे तर शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. भारताच्या संसदेने नवा पंचायत कायदा संमत केला असून तो 22 एप्रिल 1993 पासून सर्व भारतभर लागू झाला आहे. हा कायदा अत्यंत क्रांतिकारी असून भारताच्या इतिहासात प्रथमच पंचायतराज संस्थांना व्यापक घटनात्मक अधिकार आणि वित्तीय स्वायत्तता मिळाली आहे.

जागतिकीकरणामुळे राज्यांची स्वायत्तता कमी झाली असल्यामुळे शासनाने आता पंचायत राज सारख्या स्थानिक संस्थांकडे अधिक लक्ष देणे अत्यावश्यक आहे. भारतात पंचायतराज संस्था अनादिकालापासून अस्तित्वात आहेत. त्यांचे वर्णन मनु स्मृतिमध्ये तसेच खिस्तपूर्व 400 मध्ये लिहिलेल्या कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही आढळते. त्याकाळी ग्राम पंचायतीही त्यांच्या अधिकार क्षेत्रातील न्याय दान, कायदे विषयक आणि महसूली कामांबद्दल जबाबदार होत्या. या पंचायती स्वयंशासीत होत्या. त्यांना पूर्ण स्वायत्तता होती. ब्रिटिश राजवटीच्या

काळात या संस्था कायम राहिल्या, परंतु त्यांची स्वायत्तता आणि अधिकार मोठ्या प्रमाणात कमी केल्या गेले. भारतीय घटनेच्या 73 व्या घटनादुरुस्ती नुसार या संस्थांना प्रभावी करण्यासाठी खरे खुरे अधिकार देण्यात आले आहे. या संस्था लोकांच्या संस्था म्हणून पुढे येतील अशी अपेक्षा आहे. हा नवीन कायदा आपल्या देशाची सामुहिक ओळख टिकावी या उद्देशाने केला आहे. त्यामुळे समाजात सुसंवाद, एकता आणि सहकार्य निर्माण होण्याला मदत होईल. राष्ट्रीय ऐक्यामुळे सामाजिक विकास करणे शक्य होते.

ऐच्छिक संस्थांच्या वाढीमुळे पंचायतराज संस्था मजबूत होतील. या संस्था दूरवरच्या खेड्यांमधे पोहचून संगणक, पर्यावरण, लोकांचे अधिकार, सार्वजनिक निधींचा उपयोग इत्यादीं बाबतच्या ज्ञानाचा प्रसार करु शकतात. तसेच या संस्था ग्रामीणसमाजाशी संबंधित अशा अनेक जीव्हाळ्याच्या विषयांसंबंधी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करु शकतात. यामुळे कृषी आणि ग्रामीण उद्योगाची वृद्धी होईल, लोकांना पिण्याचे पाणी पुरविता येईल, तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारता येईल.

अनादिकाळापासून संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे आपल्या समाजाला स्थैर्य प्राप्त झाले आहे, समाजातील गरजू लोकांना या संयुक्त कुटुंब रचनेमुळे सहाय्य मिळत असे. ज्यांना मदतीची आवश्यकता आहे, अशांना ग्रामीण लोक, देवस्थाने आणि धार्मिक संस्थां कडून मदत होण्याची व्यवस्था होती. एकापरीने ही व्यवस्था आपल्या समाजासाठी सामाजिक सुरक्षितता होती. जेथे शक्य आहे तेथे याचा व्यापक प्रमाणावर उपयोग करुन त्यांचा संबंध सामाजिक विकासासाठी जोडता येईल.

**जागतिकीकरणाचे परिवर्तन विकासाच्या संधीत करता येईल :**

जागतिकीकरण अविकसित देशांसाठी पूर्णत: फायद्याचे किंवा पूर्णत: तोटयाचे आहे असे म्हणता येत नाही. त्याचे निर्बंध आणि मर्यादा लक्षात घेऊनही, त्याचा उपयोग कार्यक्षमता वाढवून विकास करण्यासाठी करता येईल. यापुढे आपल्या उद्योगांना विदेशी स्पर्धेपासून सरकारी संरक्षण मिळणार नाही. आता जकातीची भिंती आणि परिमाणात्मक निर्बंध राहणार नाही. आपल्याला कष्ट करुन उद्योग वाढवावे लागतील. कामचुकारपणापासून नव्या कार्य संस्कृतीकडे आपल्याला जावे लागेल. कामा बद्दलचा आपला दृष्टिकोन तसेच आपल्या मालाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. कार्यदक्षता जर वाढविली नाही तर जागतिक स्पर्धेत आपण टिकू शकणार नाही.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी संस्कृतिच्या आक्रमणाला तोंड देताना भारतीय समाजाची पुरातन संस्कृती आपल्याला शक्ती आणि हिम्मत देण्याची शक्यता आहे. आपले हस्तोद्योग, हातमाग, कापड, गालीचे, चामडी वस्तु आणि इतर वस्तुंना वांशिक पैलू असल्यामुळे यावस्तुंना जागतिक बाजारात विशेष मागणी आहे. जगाच्या तुलनेत आपली श्रमशक्ती बरीच स्वस्त असल्यामुळे जागतिक स्पर्धेला तोंड देताना याचा आपल्याला फायदा होईल.

जागतिकीकरण, अशारीतीने, विकसनशील देशांसाठी जसे एक आव्हान आहे तसेच ती एक मोठी संधी आहे. आळस झटकून येथील लोकांनी कठीण परिश्रम केले तर आपण विकसित देशांच्या मालाचा दर्जा गाठू शकू. विकसनशील देशांना मजबूत आणि पुरातन अशा संस्कृतिचा वारसा लाभलेला असल्यामुळे हे देश जागतिकीकरणाची आव्हाने स्वीकारु

शकतील, यात शंका नाही. विकसनशील देश हिंमतीने, निश्चयाने आणि विश्वासाने ही आव्हाने स्वीकारायला तयार होतील, अशी आशा करायला हरकत नाही.

## संदर्भ सूची


1. Barnabas A.P. (1999)," Globalization and Transformation of Indian Rural Social Structure,"Note 2, The Indian Journal of Public Administration Oct-Dec.

2. Bawa R.S (2001-02),"Challenges and Opportunities of Globalization - Implications for India." Indian Economic Journal, Jan-Mar.

3. Brinkman Richard ., "Cultural Economics" Heritage Publishers, New Delhi.

4. Courchene Tom (1993),"Globalization, Institutional innovation and the Australian Federation" Federalism and Economy : International and State Issues, Australian National University, Canberra.

5. Jalan Bimal (2001-02) Governor, R.B. of India "India and Challenge of Globalization", Indian Economic Journal, Jan-Mar.

6. Joseph Sarah (1999),"Interrogating Culture : Critical Perspectives on Contemporary Social Theory, "The Indian Journal of Public Administration Oct-Dec, Vol. XLV,4

7. Krasner Stephen D (1999),"Sovereignty : Organized Hypocrisy' Princeton University Press,

8. Munshi K. M. (2002) "Veda Vyasa : The Master ", Bhavan's Journal, July 31.

9. Sarkar H.S (2001)"True Gods-False Gods", Adhikar Publication.

10. Shiva Vandana (1998) "Globalization of Agriculture "Food Security and Sustainablility, New Delhi, Research Foundation of Science and Technology, June.

11. Sikligar P.C. (1998) "Social Development ", The Indian Journal of Public Administration April-June.

12. Singh B.P. (1998) "India's Culture : The State, the Arts and Beyond "Delhi, Oxford University Press.

13. Swamy Subramanian (2001-02) "WTO Challenges and Opportunities "Indian Economic Journal, Jan-Mar.

14. Tremblay Reeta C. (2001)" Globalization and Indian Federalism "Indian Journal of Public Administration April - June.


(हेमिल्टन (न्यूझिलँड)येथील वायकाटो विद्यापीठात 22-24 नोव्हेंबर 2002 या काळात 'जागतिकीकरण आणि पुरातन संस्कृती टिकविणे' या विषयावर संपन्न झालेल्या आन्तरराष्ट्रीय परिषदेत सादर केलेल्या संशोधन निबंधाचा स्वैर अनुवाद )

● ● ●

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करुन घेऊन त्या पत्त्यावर अर्थसंवादचे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांने 'अर्थसंवाद' चा अंक परत आल्यास त्या पुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

सर्जेराव ठोंबरे
कार्यवाह - खजिनदार

# वनसृष्टी व्यवस्थापन : स्थानिक संस्थांची भूमिका

● ऋचा घटे*/ विनायक देशपांडे*/ किशोर महाबळ**
*पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
**पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**प्रस्तावना :**

भारतात वनांची मालकी आणि व्यवस्थापन यांतील बदलत्या संस्थात्मक रचनेला दीर्घकालीन ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. गेल्या दीडशे वर्षात विकेंद्रित पारंपरिक संस्थांचे रुपांतर अधिकाधिक केंद्रित आणि शासकीय संस्थांमध्ये झाले. आता पुनश्च विकेंद्रीकरणाकडे संक्रमण सुरु झाल्याचे दिसते. लोकांना वनव्यवस्थापनात सहभागी करुन घेण्याची आवश्यकता आता शासनाला भासू लागली आहे. कांही प्रभावी गटांनी विकेंद्रीकरणाची पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगीकरणाचा पुरस्कार केला. वनांपासून मिळणारा लाभ लक्षणीय असल्याने लोकांमार्फत या संपत्तीचे रक्षण करणे कितपत योग्य होईल याबाबत मात्र शासकीय अधिकारी साशंक असल्याचे जाणवते. स्वतःच्या पुढाकाराने व पारंपरिक पद्धतीने वन व्यवस्थापन यशस्वीपणाने केल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्थानिक संसाधनाबाबतची माहिती स्थानीय लोकांना अधिक असते. तसेच तेथील समाजात संघटन कौशल्य देखील अधिक प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे.

बहुतांश ठिकाणी लोकांचा वनाशी असलेला संबंध आमूलाग्र बदलला आहे. सातत्याने वन संरक्षण करण्याचे प्रयत्न उष्णकटिबंधातील स्थानिक संस्थांनी औपचारिक तसेच अनौपचारिक पद्धतीने केले. वन संरक्षणासाठी नियमावली तयार करुन या संस्थांनी यशस्वीरित्या लोकांमार्फत वनांचे रक्षण कसे होऊ शकेल हे दाखवले. काही स्थानिक संस्थांनी वन संरक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या यंत्रणेलाच आव्हान दिले आहे. बाजार यंत्रणा, तांत्रिक बदल, शासकीय वनधोरण या सारख्या चाकोरीतील तंत्रांचा अवलंब न करता पारंपरिक ज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्याचा उपयोग करुन स्थानिक संस्थात्मक रचना रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांची स्थानिक रचनाच कदाचित जैविक विविधतेचे रक्षण करण्यास प्रभावी ठरली असावी. प्रस्तुत निबंधात गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा येथील गोंड आदिवासी समाजाने विकसित केलेल्या वन संरक्षण पद्धतीचे विश्लेषण केले आहे. आवश्यकतेनुसार या समाजाने पारंपरिक पंचायतरचनेत वेळोवेळी सातत्याने बदल करुन पर्यावरणावर आधारित संस्कृती जतन करण्याचे

प्रामाणिक प्रयत्न केले. येथील लोकांनी स्वत:च्या प्रयत्नाने यशस्वीपणे वनाचे संरक्षण/व्यवस्थापन केल्याची प्रचिती तेथील घनदाट वनाना बघून येते. याउलट जवळच लागून असलेल्या लेखा येथील समाजाने वन संरक्षण केले नाही. तेथील स्थानिक संस्थांनी वन संपत्तीच्या उपयोगाबाबत विशिष्ट नियमावली विकसित केली नाही, कुठलेही निर्बंध घातले नाहीत आणि वनसंपत्तीच्या वाटपाबाबत प्रमाणपद्धति देखील अवलंबिली नाही.

पारंपरिक संस्था बदलत्या गरजांनुसार सातत्याने आपल्या कार्यप्रणालित, उपक्रमांत आवश्यक तो बदल करु शकतात, व अशी लवचिकता असल्याने पारंपरिक संस्था वनव्यवस्थापन यशस्वीपणे करु शकतात हे गृहितक प्रस्तुत अभ्यासामागे आहे. जवळच वास्तव्याला असलेल्या पारंपरिक आणि अपारंपरिक अशा दोन भिन्न समाजांचे तुलनात्मक विवेचन करुन वनांची स्थिती निर्धारित करण्यात सामाजिक संस्थांचा सहभाग कसा राहू शकतो या बाबतचे परीक्षण या ठिकाणी केले आहे. निबंधाची रचना खालील प्रकारे करण्यात आली आहे.

. भारतातील पारंपरिक संस्थांची पार्श्वभूमी

. दोन खेडेगांवातील लोकसंख्येच्या विविध पैलूंचे तुलनात्मक विश्लेषण

. मेंढा येथील पारंपरिक संस्थांची पार्श्वभूमी

. संस्थात्मक विश्लेषण आणि निष्कर्ष

**पार्श्वभूमी :**

बाह्य जगापासून संपूर्णपणे भिन्न असे आदिवासींचे स्वतंत्र अस्तित्व, आदिवासी आणि वने या दोहोंतील परस्परावलंबत्वामुळे निर्माण झाले. आदिवासीकरिता वनसंपदा ही म्हणजे त्यांच्या जीवन पद्धतीचे आणि संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. कृषी क्षेत्राच्या स्थायीकरणाच्या सुरुवातीच्या काळापासून तर गेल्या शतकातील मध्य दशकापर्यंतचा भारतीय वनीकरणाचा इतिहास बघितल्यास असे लक्षात येते की, या काळात राज्यव्यवस्थेचे वनांवर नियंत्रण असावे ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती.

भारतातील विविध वनक्षेत्रात लोकांनी भिन्न भिन्न पद्धतीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांची उभारणी केली. यामुळे वनोत्पादनाचा वापर दूरदृष्टी ठेउन होऊ शकला. यांतील बऱ्याच चालीरीती आज देखील प्रचलित आहेत. यांत खालील बाबींचा समावेश होतो :

अ) वनोत्पादनाच्या पुरवठ्यात सातत्य राखण्यासाठी संसाधनांच्या गैरवापरावर निर्बंध लादणे.

ब) कांही विशिष्ट काळात निसर्गाने उपलब्ध केलेल्या साधनांच्या वापरावर मर्यादा घालणे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील शिकार करणारे आदिवासी फासेपारधी परंपरेनुसार हरणाच्या पाडसाची, गरोदर प्राण्यांची हत्या करीत नाहीत.

क) संपूर्ण भारतात कांही पवित्र वनस्पतींची (जसे वडाचे आणि पिंपळाचे झाड) परंपरेनुसार जपणूक करण्यात येते. राजस्थानातील बिशनॉय खेड्यात अत्यंत उपयुक्त अशा स्थानिक वृक्षांचे संरक्षण करण्यात येते.

ड) सभोवतालचे पर्यावरण सुरक्षित राहावे या उद्देशाने वने, तळे किंवा नद्यांच्या काही भागांना संपूर्णत: सुरक्षा प्रदान करण्यात येते. उदाहरणार्थ दक्षिण भारतातील केरळ किनारपट्टीवर सापाकरिता वृक्षवाटिका आढळते. यामुळे भारतात दुर्मिळ झालेल्या वनस्पतींची जपवणूक करण्यास मदत झाली.

इ) बऱ्याच आदिवासी खेड्यांत कांही संसाधनाचा मर्यादित उपयोग करण्याची मुभा देण्यात येते. प्रत्येक कुटुंबात संसाधनांचा किती प्रमाणात उपयोग करावा याबाबत कठोर अशी सामाजिक बंधने आहेत.

कुटुंबातील फक्त एक व्यक्ती प्रत्येक आठवड्याला कुटुंबासाठी डोक्यावर जितके जळाऊ लाकूड वाहून नेऊ शकेल तितकेच लाकूड जंगलाबाहेर नेण्याची परवानगी देण्यात येते.

फ) भारताच्या उत्तरपूर्वेकडील मेघालयात धार्मिक कर्तव्य समजून पवित्र झुडूपांची आणि पवित्र वृक्षवाटिकांची जपणूक करण्यात येते.

ग) अंगामिस या समाजात वनस्पती उपटून काढल्यास, रुढी परंपरेनुसार, काढण्यात आलेल्या वनस्पतीच्या दुप्पट झाडे लावावी लागतात.

संपूर्ण भारतात अशा सर्व दूरदर्शी परंपरांना समाजमान्यता मिळून ही व्यवहारात त्यांची अंमलबजावणी कशा रीतीने व्हावयास लागली या बाबत कमी प्रमाणात माहिती उपलब्ध आहे. परंतु आधुनिक काळात सुचविण्यात येणाऱ्या नैसर्गिक सामग्रीच्या प्रत्येक प्रकारच्या व्यवस्थापनाच्या पद्धतीची माहिती, रुढी परंपरांमध्ये आढळते. पारंपरिक तंत्राला स्वीकृती ही, प्रयोग, चुका, अनुभव आणि सामान्य ज्ञानाच्या आधारे प्राप्त झाली असावी. वनसंपदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने वनाची, काही कारणाने हानी झाल्यामुळे निर्माण झालेल्या समस्या सोडविणे तेव्हा शक्य होत होते. जगात विविध भागात झालेल्या क्षेत्रीय अभ्यासावरुन असे दिसते की, स्थानिक संसाधनांचा उपयोग करणाऱ्या गटांनी कधी स्वत:हुन तर कधी बाहेरील अधिकाऱ्यांच्या मदतीने सामाईक संचित संसाधनाचे योग्यरित्या व्यवस्थापन करण्याच्या दृष्टिने विविध प्रकारच्या संस्था निर्माण केल्या. एकमेकांवरील विश्वास आणि सामाईक हेतू असल्याने वन संपदेचे व्यवस्थापन योग्यरित्या होऊ शकते. भारत शासनाच्या वने आणि आदिवासी समितीला (1982) अभ्यासांती असे निदर्शनास आले की, उत्तर पूर्वे कडील भागात बऱ्याच खेड्यांमध्ये वनांचे व्यवस्थापन समुहाच्या माध्यमाने होते आणि वनांचे मालकी हक्क समाजाला प्रदान केल्याने वन व्यवस्थापन शासकीय यंत्रणेपेक्षा अधिक योग्यरित्या करता येते. सामाईक मालकी हक्क, हे भारताचे वैशिष्ट्य असल्याने वन संरक्षण उत्कृष्टरीत्या होऊ शकले. वन म्हणजे येथील रहिवाश्यांना अन्न, चारा आणि इंधन सातत्याने पुरविणारा स्रोत आहे असे मानण्यात येत असे. जंगल ही समाजाची मालमत्ता असल्याने संपूर्ण समाजाला त्याचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी वाटत होती. इंग्रजांचा प्रवेश या देशात झाल्यानंतर इथल्या परिस्थितीत आमूलाग्र बदल घडून आला.

मालकी हक्काचे हस्तांतरण जंगलाचा पारंपरिक पद्धतीने उपयोग करणाऱ्या गटांपासून इतरांकडे झाल्याने वनांकडे बारकाईने लक्ष पुरविण्याची आणि जंगल संपत्तीच्या वापरावर निर्बंध लावण्याची प्रेरणाच संपुष्टात आली. मालक/संरक्षकाचे रुपांतर बेकायदेशीररित्या शिकार करणाऱ्या पारध्यामध्ये झाले. यामुळे जी संसाधने सुरक्षित ठेवावयास हवी होती त्याच संसाधनाची नासाडी तीव्रतेने झाली. स्वतंत्र भारताच्या शासनकर्त्यांनी याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर वन धोरणात काही मूलभूत बदल होतील अशी आशा आदिवासी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना वाटत होती. स्थानिक समाजाचा वनांशी असलेला संबंध ओळखून शासनामार्फत संसाधनांच्या व्यवस्थापनात तेथील समुदायाला बरोबरीचे भागीदार करण्यासाठी योग्य धोरणे राबविण्यात येतील अशी अपेक्षा होती. परंतु स्वतंत्र भारताच्या शासनकर्त्यांनी इंग्रजांच्या मूलभूत तत्त्वांचाच पुरस्कार केल्याने सगळ्यांचीच निराशा झाली. जंगल-रहिवासी समाज यामुळे घुसखोर म्हणून संबोधण्यात आला आणि जंगलाची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टिने श्रमिक पुरवठ्याचा प्रमुख स्त्रोत झाला. त्यांना पूर्वी प्रमाणे वनांचे मालकी हक्क प्राप्त झाले नाहीत किंवा त्यांच्या

परंपरागत दूरदर्शी व्यवस्थापकीय क्षमतेची कदर करण्यात आली नाही.

बरेचदा ग्रामीण वनांच्या बाबतीत हार्डीन यांच्या 'सामाईक शोकांतिका' (Tragedy of Commons) बाबतचा संदर्भ देण्यात येतो. आपल्या येथील धोरणाकारांनीही या शोकांतिकेत समाविष्ट झालेल्या व्यक्तींची संसाधनांचा योग्य तऱ्हेने वापर करण्याची क्षमता लक्षातच घेतली नाही. संसाधनांचा जास्त उपयोग आणि गैरवापर कसा झाला या बाबतचे दस्तऐवज आजही व्यवस्थितरित्या उपलब्ध आहेत. मात्र, संसाधनांचे परिणामकारकरित्या व्यवस्थापन करणाऱ्या, स्थानिक यंत्रणांचा अभ्यास सुरु होण्यास बराच काळ लागला. विशेष करुन सामाईक मालमत्ता हक्क, परंपरागत संस्थात्मक रचनेची जाण, स्वार्थासाठी होणाऱ्या घुसखोरीवर नियंत्रण आणणारी यंत्रणा, व्यापारीकरण आणि स्थानिक लोकांच्या दबावामुळे सामाईक संचित मालमत्तेच्या व्यवस्थेची केलेली उभारणी, या गोष्टी योग्य संस्थात्मक रचना आणि धोरणांच्या आधारे परिणामकारकरित्या साध्य होऊ शकतात हे अनेक अभ्यासात आढळले आहे. (Richard, 1997)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात मात्र केन्द्रीय मालकी आणि हुकुमत या बाबीच वनसंसाधनांचे संरक्षण करण्यास आवश्यक आहेत असे समजण्यात आले. 1980 साली शासनाने सध्याच्या स्थितीस स्थानीय लोक जबाबदार आहेत असे दर्शवून कायद्यांच्या माध्यमाने अधिकाधिक बंधने घालण्याचा प्रयत्न केला. भारतीय वन कायदा 1980 साली संमत करण्यात आला. विविध गटातून यांवर टीकास्त्र सोडण्यात आले. सरतेशेवटी या कायद्याचा परित्याग करण्यात आला. तिसऱ्या जगाचा स्वातंत्र्योत्तर काळातील अनुभव लक्षात घेता असे निदर्शनास येते की, विविध संस्थात्मक रचनांचा वापर त्या त्या राष्ट्रांतील सरकारांमार्फत अत्यंत अल्प प्रमाणात करण्यात आला. ही एक शोकांतिकाच होती. (Wunsch, 1999:257) 1998 पासून नवीन वन धोरण संमत झाल्यानंतर वन व्यवस्थापनेत लोकांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टिने काही बदल करण्यात आले. परंतु शोकांतिका ही की, शतकानुशतके संसाधनांकडे योग्यरित्या लक्ष पुरविणाऱ्या पारंपरिक संस्थाना पुनरुज्जीवीत करण्याचे प्रयत्न झाले नाहीत.

**खेडी : मेंढा आणि लेखा**

विदर्भातील अकरा जिल्ह्यांपैकी गडचिरोली हा एक जिल्हा आहे. बहुतांश वने याच भागात आहेत. असे असून देखील राज्यातील सरासरी पेक्षा गडचिरोली जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 48 टक्क्यांनी कमी आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 1441 चौरस कि.मी. आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 4.68 टक्के क्षेत्र या जिल्ह्याचे येते. एकूण वनोत्पादनाच्या 61.34 टक्के वनोत्पादन या जिल्ह्यातून प्राप्त होते. या भागात लोकसंख्येची घनता अत्यंत अल्प असून राज्यातील 0.99 टक्के लोक या जिल्ह्यात वास्तव्याला आहेत आणि यांतील 38 टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. या जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणजे एकूण वनक्षेत्राच्या (एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 66 टक्के) जवळपास 71 टक्के क्षेत्राचे वर्गीकरण 'सुरक्षित वन' म्हणून करण्यात आले आहे आणि 24 टक्के 'आरक्षित वन' म्हणून वर्गीकृत केले आहे. दोन्ही खेडी, लेखा आणि मेंढा महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली-धानोरा या मार्गावर वसली आहेत.

स्थानिक लोकांच्या सहकार्याने वनांचे व्यवस्थापन पारंपरिक संस्थांच्या माध्यमाने केल्यास यशस्वी होऊ शकेल आणि ज्या ठिकाणी अशा संस्था अस्तित्वात नसतील तेथील वनांचे व्यवस्थापन

उत्तमरित्या होईलच याची शाश्वती नाही. ही बाब तपासण्यासाठी दोन खेड्यांची तुलना करण्यात आली. ही दोन खेडी तुलना करण्यास योग्य आहेत अथवा नाही हे जाणून घेण्यासाठी दोहोंमधील साम्य आणि वेगळेपणा येथे नमूद केला आहे. भौगोलिक स्थान, स्वाभाविक रचना, जंगलाचा प्रकार, खेड्याचा आकार (लेखा हे लोकसंख्येच्या बाबतीत मेंढ्यापेक्षा थोडे मोठे असले तरी) आणि वन जमिनीची जंगल खात्याकडे असलेली कायदेशीर मालकी या गोष्टी या दोन्ही खेड्यात समान आहेत. लेखा येथे असलेली बहुजातीयता आणि मेंढा येथील एकजातीयता, मेंढ्यातील वनक्षेत्र (1806 हेक्टर) लेख्याच्या तुलनेत बरेच जास्त आहे (279.51 हेक्टर). तद्वतच लेख्यातील दरडोई वन क्षेत्र 0.50 हेक्टर आणि मेंढ्यात हेच क्षेत्र 7.96 हेक्टर येते. मेंढा येथे असलेले परिणामकारक नेतृत्त्व लेखा येथे आढळत नाही. लेखा या गावातील सीमेलगतची जमीन लागवडीस योग्य असल्याने मेंढ्यातील बऱ्याच घरकुलांच्या जमिनी लेखा खेड्याच्या सीमेवर आहेत. पारंपरिक संस्थांची यशस्विता हा युक्तिवाद अधिक बळकट व्हावा या उद्देशाने एकजातीयता आणि परिणामकारक नेतृत्व या बाबतचे वेगळेपण येथे विशद करण्यात आले आहे.

**मेंढा बाबत अधिक माहिती :**

शासनाच्या आधिपत्याखाली राहून पारंपरिक संस्थांचे पुनरुत्थान स्थानिक समाजाच्या प्रयत्नाने होऊ शकते याचे उत्तम उदाहरण मेंढाने दर्शविले. मॅकगिनिस आणि ऑस्ट्रॉम यांना इतर वसाहतींबाबत निदर्शनास आलेल्या परिस्थितीशी मेंढा या गावी आढळलेल्या बाबी समान आहेत.

काही वसाहतीत व्यक्तिंनी मिळून स्वत:च्या संस्थांची उभारणी केली. राष्ट्रीय, प्रादेशिक किंवा स्थानिक शासकीय संस्थांपेक्षा संपूर्णपणे या संस्था भिन्न आहेत. या संस्थांचे संकल्पन आणि कार्यान्वित करण्याची प्रक्रिया नेहमीच शासनाच्या देखरेखेखाली होते असे नाही. अशा प्रकारच्या स्व-संगठीत संस्था बाह्य शासकीय नियमांवर अवलंबुन नसतात. (मॅकगिनिस आणि ऑस्ट्रॉम, 1996:40)

मेंढा हे एक लहान आदिवासी गांव महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली-धानोरा या राज्य महामार्गावर मध्य भारतात वसले आहे. महाराष्ट्र राज्यात भौगोलिक जमिनीच्या 18 टक्के जमीन वनाखाली येते. यातील 74 टक्के जमीन गडचिरोली जिल्ह्यात आहे. एकूण जमीनीच्या 12 टक्के जमीन लागवडीखाली आहे आणि 95 टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. गडचिरोली, अनुसूचित जमातींचा जिल्हा असून उत्तम दर्जाच्या सागवानी लाकडासाठी प्रसिद्ध आहे. मेंढा या गावाच्या बाबतीत एकूण गावाच्या 1930 हेक्टर जमिनीपैकी 90 टक्क्यापेक्षा जास्त वनजमीन असून त्याचे क्षेत्र 1806 हेक्टर येते. फक्त 87 हेक्टर जमिनीचा भाग 72 घरकुलांच्या मालकीचा आहे आणि ही जमीन लागवडीखाली येते. या गांवात एकूण 80 घरकुले असून लोकसंख्या 375 आहे. ही सर्व घरकुले गोंड आदिवासी यांची आहेत. जमीनीची मालकी अल्प प्रमाणात असल्याने बहुतांश लोकांचे प्रमुख उत्पन्न शेतीच्या कामातुन आणि मोलमजुरी करुन प्राप्त होते. सर्वच घरकुले अल्प भूधारक असल्याने त्यांचे वर्गीकरण 'दारिद्र्याच्या' गटात करण्यात येते. सर्वच घरकुलांचे जंगलावरील अवलंबित्व विविध घटकांसाठी लक्षणीय आहे. शेतीची अवजारे तसेच झाडू, बास्केट, टोपल्या चटया तयार करण्यासाठी देखील वन संपत्तीचा उपयोग होतो.

गावाच्या अवतीभवती असलेले जंगल एकेकाळी अतिशय घनदाट आणि हिरवेकंच होते.

परंतु हळूहळू या जंगलांची अवस्था अत्यंत वाईट झाली. जिल्ह्याचे मुख्यालय गडचिरोली असून मेंढा या गावा पासून फक्त 25 कि.मी. अंतरावर असल्याने आजूबाजूच्या गावकऱ्यांनी संसाधनाची नासाडी केली. मेंढा या गावातील लोकांनी 20 वर्षा पासून जंगलाचा नाश स्वत: बघितला आणि ते या संपूर्ण प्रक्रियेचे साक्षीदार होते. 'जे तुमचे नाही त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी तुमची नाही' या न्यायानुसार गावकऱ्यांनी हे थांबविले नाही. प्रतिनिधिक लोकशाहीने गावाचे अधिकार काढून घेतले आणि समाजाद्वारे संसाधनाचे व्यवस्थापन ही संकल्पनाच संपुष्टात आली. राज्यांच्या आधिपत्याखाली असलेल्या वन विभागांतर्फे राबविण्यात येणारे केंद्रीभूत वन व्यवस्थापन, हे संसाधनाचे संरक्षण करण्यात अयशस्वी ठरले. अपेक्षित विकास घडून न आल्याने हे स्थानिक लोकसमूह ' सामाजिक मालकी हक्काची 'पुन:उभारणी करण्यास प्रवृत्त झाले.'

1970 च्या शेवटास 'जंगल बचाव, मानव बचाव' च्या चळवळीमुळे गडचिरोलीत स्वयंशासनाच्या मागणीस जोर येऊ लागला. गैर शासकीय संघटनांच्या काही कार्यकर्त्यांनी आणि सतर्क राज्यकर्त्यांनी बऱ्याच काळापासून दुर्लक्षित असलेले पारंपरिक सामाजिक जीवन पुनरुज्जीवित करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. निर्णयाचे विकेंद्रीकरण, संसाधनाचे व्यवस्थापन आणि लाभाची समान वाटणी या बाबी सामाजिक परंपरेत येतात. सुरुवातीचा उत्साह मात्र लवकरच मावळला आणि चळवळ संपुष्टात आली. परंतु मेंढा येथे पारंपरिक पंचायत यंत्रणेद्वारा सामाजिक व्यवस्थापनेच्या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला. पंचायतीच्या माध्यमाने जंगल सुरक्षा समितीची 1987 साली स्थापना करण्यात आली. नंतर औपचारिकरित्या 1996 मध्ये संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत (Joint Forest Management Programme) वन विभागाशी करार करण्यात आला. सध्या गावातील वनक्षेत्रात गावकऱ्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे विविध प्रकारची वन संपदा आज विकसित झालेली दिसते.

भारतातील इतर खेड्यांप्रमाणेच मेंढ्याला अनौपचारिक सामूहिक बैठका घेण्याची प्रथा होती. या बैठकीत प्रत्येक संध्याकाळी खेड्यातील पुरुष मंडळी झाडाखाली एकत्र येत असत. वनांच्या दुर्दशेबाबत या निमित्ताने चर्चा होत असे . स्थानिक लोकसमुहाच्या माध्यमातून गांवातील संसाधनाचे (वनांसहित) व्यवस्थापन अत्यंत काटेकोरपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला, लोक संसाधनाचे व्यवस्थापन योग्यरित्या करु शकतील अथवा नाही या बाबत शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या. परंतु लोकांनी संसाधनाच्या व्यवस्थापनाचे कार्य आपल्याकडे घेऊन हा समज चुकीचा ठरविला. गेल्या दोन दशकांपासून लोकांच्या बैठकांना अधिक योग्य असे औपचारिक स्वरुप आल्याचे दिसते. वनांच्या उपयोगाबाबतचे निर्णय विस्तृत चर्चेनंतर घेण्यात येतात. पारंपरिक चालीरिती बरोबरच येथील समुहाने परिवर्तनशीलता स्वीकारली. संसाधनांची समान वाटणी आणि शाश्वत विकास हा पारंपरिक चालीरिती द्वारेही साध्य करता येतोच, मात्र कांही नव्याप्रमाणकांच्या माध्यमाने स्त्रियांचा सहभाग वाढण्यास, जमिनीची मशागत आधुनिक पद्धतीने करण्यास, तसेच युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यास मदत होऊ शकेल याबाबतची जाणीव देखील गांवकऱ्यांमध्ये निर्माण झाली. सुरुवातीला ग्राम संरक्षण समितीची स्थापना करण्यात आली. यात प्रत्येक घरकुलातून एक स्त्री व एक पुरुष अशा दोन व्यक्ति कुटुंबाचे प्रतिनिधित्व करतात. सध्या वनोत्पादनाच्या उपयोगाबाबतचे सर्व महत्वपूर्ण निर्णय या समिती मार्फत घेण्यात येतात आणि हे निर्णय खेड्याच्या सीमेअंतर्गत असलेल्या वनांसाठी लागू

होतात.

### अ) मेंढा येथील पारंपरिक चालीरिती :

ग्राम संरक्षण समितीने सध्याच्या गरजांशी संबंधित काही पारंपरिक चालीरिती लक्षात घेऊन त्यात सातत्य राखण्याचा निर्णय घेतला. बऱ्याच आदिवासी समाजात लहान घरे, गवत आणि बांबूच्या सहाय्याने तयार करण्याची प्रथा आहे. सागवनाचा वापर (अत्यंत मौल्यवान असल्याने) टाळण्यात येतो. तसेच चाऱ्यासाठी जमीनीवर बी पडल्याखेरीज गवताची कापणी करण्यात येत नाही. जंगली जनावरे ज्या तळ्यातून पाणी पितात त्या तळ्यांचा वापर मच्छीमारी साठी करण्यात येत नाही. विषयुक्त पदार्थाचा वापर करुन मच्छीमारी करण्यावर निर्बंध घालण्यात येतात. याऐवजी विशिष्ट झाडाचा पाला उपयोगात आणून मासे पकडण्यात येतात. यामुळे पाण्याचा दर्जा टिकवून ठेवण्यात मदत होते व इतर आवश्यक कृमी कीटकांना देखील इजा पोहचत नाही. या भागातील आदिवासी संस्कृती ही 'गट संस्कृती' स्वरुपाची आहे. नित्याचे बरेच व्यवहार आदिवासी गटांच्या माध्यमाने होतात. गैर इमारती लाकूड, वनोत्पादने संकलित करण्यास घरातील सगळे सदस्य एकत्रितपणे जातात. पूर्वी शिकार करण्यावर प्रतिबंध नसताना गावातील लोक सामूहिकरित्या शिकार करीत आणि शिकारी पासून होणाऱ्या प्राप्तीची समान वाटणी करण्यात येत असे. शिकार करण्यास जे लोक असमर्थ आहेत त्यांना देखील यातील हिस्सा प्राप्त होत असे. शिकार रोज करण्यात येत नसे. चालीरितींनुसार आवश्यक तेव्हां शिकार होत असे.

गावातील पुजारी हंगामानंतर गावातील प्रत्येक घरातून मूठभर धान्य संकलित करीत असत. पेरणीपूर्वी या गोळा करण्यात आलेल्या धान्याचे वाटप गावातील सर्व घरांमधून करण्यात येत असे. या पद्धतीमुळे जैविक विविधता टिकवून ठेवण्यास मदत होत असे. वन सुरक्षा समिती स्थापन झाल्यानंतर या जुन्यापद्धती पुन्हा सुरु करण्यात आल्या.

### ब) सद्या अमलात असलेले नियम :

गेल्या 15 वर्षापासून वनांचा उपयोग करण्याबाबतचे नियम वन संरक्षण समितीच्या बैठकीत ठरविण्यात आले आहेत. सर्वांच्या सम्मतीनेच नियमांमध्ये बदल करण्यात येतात. समितीच्या सदस्यांनीच नियमावली तयार केली असल्याने विनामूल्य नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करण्यावर आळा बसण्यास मदत होते. या व्यतिरिक्त कार्यकारी समिती म्हणजे पंचायत मधील सदस्य सर्वानुमते ठरविण्यात येतात. या समितीत ज्येष्ठ, अनुभवी सदस्यांचा समावेश करण्यात येतो नियमांचे पालन योग्य रीतीने होण्यासाठी या समितीवर जबाबदारी सोपविण्यात येते. ही समिती एक उपसमिती गठीत करते यालाच वन संरक्षण समिती म्हणतात. यात त्या गावातील प्रत्येक घरातील व्यक्तिचा समावेश करण्यात येतो. वनाची देखरेख करण्यासाठी प्रत्येक घरातुन आळीपाळीने सदस्य पाठविण्यात येतात. दोन व्यक्ती वनांची देखरेख करण्याचे कार्य रात्रंदिवस करतात. समितीच्या निधीतून त्यांना पगार देण्यात येतो. काही संघर्ष निर्माण झाल्यास बैठक बोलावून त्या विषयावर चर्चा करण्यात येते. (आवश्यक असल्यास औपचारिकरित्या बैठक बोलाविण्यात येते अन्यथा बहुतांश समस्या अनौपचारिक बैठकीतूनच सोडविण्यात येतात) सर्व सदस्यांचे समाधान होईपर्यंत बैठकीत त्या विषयावर चर्चा चालते. पंचायतच्या ज्येष्ठ सदस्याने निवाडा दिल्यानंतर तो ग्राह्य मानून त्यास स्वीकृती देण्यात येते. प्रत्येक कार्यात स्त्रियांना सहभागी करुन घेण्यात येते. निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असतो व प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी करतांना त्यांचे विचार जाणून घेण्यात येतात. मेंढा येथील वन संरक्षण समिती मार्फत ठरविलेले व ज्यांची

कठोरपणे अंमलबजावणी होते असे काही नियम पुढील प्रमाणे आहेत :

1. आखून दिलेल्या सीमा रेषेतच गुरांना चरण्यास सोडता येते. नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाते.

2. पारंपरिक पद्धतीनुसार, नियम मोडणाऱ्याला सक्त ताकीद देण्यात येते. नियमभंग सातत्याने झाल्यास अतिरिक्त श्रम त्या व्यक्तीकडून करविण्यात येतात. अशा पद्धतीचे सामाजिक दायित्व अत्यंत परिणामकारक ठरल्याचे या गावात आढळते. यात पैशाच्या स्वरुपात भुर्दंड नसल्याने अशा प्रकारचा दंड सामाजिक दृष्ट्या लाभप्रद ठरु शकतो.

3. प्रत्येक घरकुलाला घर बांधणीसाठी किंवा अन्य कामासाठी जंगलातून लाकुड न्यावयाचे असल्यास पंचायतला पूर्व सूचना द्यावी लागते.

4. लोकांची गरज पूर्ण झाल्यानंतर च वनोत्पादने विक्रीसाठी घेता येतात. विशेष करुन गैर इमारती बांधणी लाकुड संकलित करुन विकण्यात येते. या बाबतचा निर्णय मात्र वैयक्तिक पातळीवर न घेता पंचायतच्या माध्यमाने घेतला जातो. समितीच्या उत्पन्नाचा गैर इमारत बांधणी लाकडाची विक्री हा एक प्रमुख स्त्रोत असून वनांच्या पहारेकऱ्यांना देण्यात येणारी रक्कमही प्रमुख खर्चाची बाब आहे.

वनसंरक्षण समितीची नियमावली आणि व्यवस्था सुस्पष्ट आणि समजण्यास सोपी आहे. तसेच वनांचा उपयोग करणाऱ्या गटासाठी देखील नि:पक्षपाती आहे. अडचणीची वेळ आल्यास हे नियम लवचिक देखील आहेत. सामायीक वन व्यवस्थापन रचनेत वन विभागाबरोबर समाविष्ट होऊन देखील वन सुरक्षा समितीचे नियमच अनुसरण्यात येतात. व्यवहारात समान व्यवस्थापन हे नि:पक्षपाती, कार्यक्षम, शाश्वत आणि लोकसत्तात्मक होउ शकेल हे एका पेक्षा अधिक मार्गाने झाल्याचे दिसते. वनोत्पादनाचा उपयोग घरगुती वापरासाठी व्हावा या दृष्टिने यात प्राधान्य देण्यात येते. संसाधनाचा नियमित उपयोग केल्याने आर्थिक गटांना शाश्वती प्रदान झाली आहे. कडक देखरेखीमुळे बाहेरच्या व्यक्तिमार्फत होणाऱ्या बेकायदेशीर जंगलतोडीवर आळा बसला आहे. गावाच्या सीमेतच जंगलातील जळाऊ लाकूड, वैरण, इमारतीसाठी लाकुड आणि इतर गैर इमारती लाकडाची विविध घरकुलांची गरज पूर्ण होते. यामुळे वेळ, श्रम आणि पैशाची बचत होण्यास मदत होते. समाजाने वाद सोडविण्याची यंत्रणा अनौपचारिक बैठकी द्वारे सोडविल्यामुळे आणि सामुहिकरित्या नियम तयार करुन त्यांचे पालन होत असल्याने तसेच सर्वांची स्वीकृती असल्याने ही पद्धत योग्य असल्याचे दिसते.

अधिकृतरित्या वनांचा मालकीहक्क वन विभागाकडे असून देखील गावातील लोकांमध्ये व वनसंसाधनांचे आपण मालक आहोत अशी भावना विकसित होते आहे. यामुळे गावकऱ्यांनी जबाबदारी स्वीकारुन वनांची सुरक्षा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसले. नियमावली तयार करण्याच्या बाबतीत गावकरी सातत्याने बैठका घेऊन विचार विमर्श करतात. सामाजिक उपक्रम हा अतिशय यशस्वी होउ शकतो हे मेंढा या गावातील वन संरक्षणाच्या यशामुळे लक्षात येते.

## स्थानिय संस्था यशस्वी होण्याची विविध कारणे :

येथील समाज एकजिनसी असून सर्व सदस्य एका जातीचे आणि सारख्या आर्थिक स्थितीत आहेत. मुक्तपणे संसाधनाचा वापर करण्यावर देखरेख ठेवणे हे गाव लहान असल्यामुळे शक्य होते. परंतु येथील संसाधनाची सुरक्षा बाहेरुन करण्यासाठी मोठे देखील आहे.(अग्रवाल 1999). या गावाला समूह जीवन जगण्याची परंपरा लाभली आहे. येथे सांस्कृतिक मूल्ये

सामायिकरित्या जतन करण्यात येतात. ही व्यवस्था लवचिक असून वेळोवेळी यात बदल घडवून आणता येउ शकतो. वनोत्पादनावरील अवलंबित्व लक्षणीय असल्याने वनसुरक्षेसाठी गुंतवणुक करण्यास लोकांना प्रोत्साहन मिळते. नफा प्राप्ति साठी देखील वनोत्पादने संकलित करण्यात येत असल्याने गावातील लोकांना वनांची सुरक्षा करण्यात अधिक उत्साह वाटतो.

**संस्थात्मक विश्लेषण :**

मेंढा या गावाच्या बाबतीत दोन स्तरावर संस्था कार्यरत असलेल्या दिसतात. औपचारिकरित्या शासनाचा वनविभाग आणि दुसरी अनौपचारिक पारंपरिक संस्था म्हणजे पंचायत आणि वनसंरक्षण समिती. औपचारिक संस्थांना अधिकृतपणे - व्यवहार, सामुहिक निवड आणि घटनात्मक या तीनही स्तरावर कार्य करता येऊ शकते. या अनौपचारिक संस्थांना यात कुठेही स्थान नसते. परंतु खरी गोष्ट ही आहे की वनविभाग व्यवहाराच्या पातळीवर किंवा दशकापासून करीत आहे. परंतु हे करण्यास या समितीला अजून कायदेशीर मान्यता प्राप्त झाली नाही. खरे तर वनांची सुरक्षा आणि देखरेख ही संपूर्ण जबाबदारी वनविभागाची आहे. असे असून देखील, मेंढा या गावातील लोकानी एकत्र येऊन पारंपरिक संस्थांना पुनरुज्जीवित केले आणि वन संरक्षण व वनोत्पादनाचे संकलन तसेच विनियोग या बाबतचे नियम आणि विनियमन विस्तृतरित्या विकसित केले. या गावाच्या अधिपत्याखाली असलेल्या वनाच्या स्थितीवरुन या अनौपचारिक संस्थेची यशस्वीता दिसते. दोन संस्थांमध्ये योग्य दुवा प्रस्थापित न झाल्याने आणि समन्वय प्रस्थापित न झाल्याने मेंढा गावातील समाज आणि शासनाचा विभाग या दोन्ही संस्थांना त्याचा लाभ झाला नाही.(घटे 2000) लेखा या गावात कुठल्याही प्रकारच्या अनौपचारिक संस्थेच्या अभावामुळे तसेच वनविभागाचे प्रत्यक्ष कार्य नसल्याने संसाधनांची प्रत खालावलेली आढळली.

| संस्थेचे प्रकार | परिणामक्षम स्तर | | सामूहिक निवड स्तर | | घटनात्मक स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कायदेशीरपणे | प्रत्यक्षात | कायदेशीरपणे | प्रत्यक्षात | कायदेशीरपणे | प्रत्यक्षात |
| औपचारिक संस्था (वन विभाग) | होय | नाही | होय | नाही | होय | होय |
| अनौपचारिक संस्था (वन संरक्षण समिती) | नाही | होय | नाही | होय | नाही | नाही |

सामुहिक निवडी बाबत उत्साही नाही. अनौपचारिक संस्था मात्र संसाधनाचे व्यवस्थापन, विनियोजन आणि तरतुदी करण्यात तसेच देखरेख करण्यात अग्रेसर आहेत.

मेंढा या गावातील वनसंरक्षण आणि वन व्यवस्थापन हे वन संरक्षण समिती गेल्या दोन

**समारोप :**

मेंढा येथे परस्परांच्या सहाय्याने वनविकास करण्याचे तसेच वनोत्पादनाची वाटणी सर्वसम्मतीने करण्याचे धोरण स्वीकारल्याने सामायिक संपत्ती संसाधनाच्या(सी.पी.आर.)प्रश्नांची सोडवणूक बऱ्याच प्रमाणात होऊ शकली.नेतृत्वाला स्वीकृती,

सामायिक निर्णय प्रक्रिया, वाटपाच्या नियमावर आधारित असलेल्या पारंपरिक संस्था हे सर्व घटक मेंढा येथे आढळतात. लेखा या गावातील वनसंपत्तीशी तुलना करता असे दिसते की संसाधनांच्या दृष्टीने पारंपरिक संस्था या अधिक यशस्वीरित्या आतापर्यंत कार्यरत राहिल्या. गडचिरोली जिल्ह्यातील बरीचशी गावे मेंढा या गावा सारखी आहेत.(एकजिनसी, आदिवासी समाजाचे वर्चस्व, पारंपरिक सामाजिक निर्णय घेण्याची प्रक्रिया भौगोलिक दृष्टया आकाराने लहान वगैरे ). तरी देखील स्थानिक संस्था या भागात विकसित झाल्या नाही. मेंढा येथील स्थानिक संस्थाचे वैशिष्टय म्हणजे या संस्था प्रगतिशील, स्व-परिवर्तनशील, संस्थात्मक बदल आणण्यास लवचिक अशा स्वरुपाच्या असल्याने तेथील संस्था अधिक विकसित झाल्याचे दिसते.

मेंढा येथे शाश्वत विकासाची संकल्पना रुजत असल्याचे दिसते. भावी गरजांचा त्याग होणार नाही या उद्देशाने वर्तमान आर्थिक स्थितीत सुधार, संसाधनांचा सुयोग्य वापर, सामाजिक न्याय्य आणि समता ही उद्दिष्टे ध्यानात घेऊन संसाधनाचा उपयोग आणि भविष्यात संस्कृतीची जपवणूक इष्टतम स्तरापर्यंत करुन जैविक विविधता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न या घटकांमुळे अधिकाधिक दृढ होत असल्याचे दिसते. सामाजिक संसाधनाचे (common pool resources) यशस्वी व्यवस्थापन हे निव्वळ भौतिक घटकांवर अवलंबून नसून मानवी समाजातील सामाजिक आणि सांस्कृतिक घटक देखील महत्वपूर्ण असतात हे मेंढा या गावाने सिद्ध करुन दाखविले.

कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारल्याने केंद्र, राज्य शासनाला प्रचंड मोठी शासकीय यंत्रणा उभारावी लागली. कायदा आणि सुव्यवस्था टिकविण्यापासून ते वनसंरक्षण करण्यापर्यंत व शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, सांस्कृतिक विकास अशी सर्व कामे शासनाने केली पाहिजेत असे अपेक्षिले गेले. याचा परिणाम म्हणजे शासकीय यंत्रणेत विविध विभाग निर्माण करण्यात आले व योजनांची अंमलबावणी करण्यासाठी नोकरशाही विकसित करण्यात आली. राज्यकर्त्यांनीही या संधीचा फायदा घेऊन आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केला. आर्थिक लाभ करुन घेण्याची इच्छाही त्यामागे होती. शासनाच्या नियंत्रणाखाली नैसर्गिक संसाधने असली तर त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ होऊ शकेल असेही प्रतिपादन करण्यात आले. हे वेगळया प्रकारचे 'राष्ट्रीयीकरण' होते. या 'राष्ट्रीयीकरणामुळे' नैसर्गिक संसाधने शासकीय नियंत्रणाखाली आली. मात्र त्यामुळे या संसाधनांचे संरक्षण व संवर्धन होण्याऐवजी त्यांचा उपयोग भ्रष्टाचाराचे संरक्षण संवर्धन होण्यात झाला. वनांचे संरक्षण आपण करतो आहोत असे दाखविणारा वनविभागच भ्रष्टाचार जोपासण्यास कारणीभूत ठरु लागला. दुसऱ्या बाजूने अत्यल्प मनुष्यबळासह विशाल वनक्षेत्राचे संरक्षण, संवर्धन करणे नोकरशाहीतील प्रामाणिक अधिकाऱ्यांनाही कठीण जाऊ लागले. त्यामुळेच वनसंपत्तीची चोरीही थांबविता आली नाही . आतातर नोकरभरती बंद झाल्याने आधीच अत्यल्प अधिकारी व कर्मचारी असलेल्या या विभागाची कार्यक्षमता घटली आहे. वनसंरक्षण करणे शासनाला आज अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत मेंढा गावाने एक नवी दिशा दाखविली आहे. या गावानुसार वनक्षेत्रात प्रयत्न झाल्यास वनसंरक्षण व संवर्धन वेगाने करता येणार आहे. शासनाचा हस्तक्षेप कमी होणार. मात्र त्याची अकार्यक्षमतेत परिणती होण्याऐवजी लोकसहभागामुळे कार्यक्षमता वाढणार आहे. जनताच संसाधनांची काळजी घेणार असल्याने त्या संसाधनांचे संरक्षण, संवर्धन अधिक चांगले होणार आहे. वनक्षेत्रांजवळ पिढ्यानपिढ्या राहिल्याने स्थानिक लोकांना वनांतील

झाडे, वनस्पती, यांची माहिती असते. याशिवाय कोणत्या वनस्पती कशा टिकवायच्या, कां टिकवायच्या, त्यांचा उपयोग कुठे व कसा करायचा हे परंपरेनी प्राप्त केलेले ज्ञान असते. हे लक्षात घेता त्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग अधिक सक्षमपणे करता येऊ शकतो. बाहेरुन आलेल्या वनाधिकाऱ्यांनी वनांचे संरक्षण करण्यापेक्षा स्थानिकांनीच ते करणे अधिक उपयुक्त ठरु शकते हे या प्रयोगातून लक्षात आलेले आहे. वनसंरक्षणाच्या बाबतीत शासनाचा हस्तक्षेप नको, असा आता स्थानिक लोक आग्रह धरतील. शासनाचा हस्तक्षेप हा नेहमीच उपयुक्त ठरतो असे नाही तर कधी कधी तो लोकहितालाच बाधक ठरु शकतो असा वनक्षेत्रात राहणाऱ्यांचा अनुभव आहे. शासनाचे नियंत्रण, शासनाचा हस्तक्षेप, व शासनाचे वाढते कार्यक्षेत्र हे जागतिकीकरणाच्या काळात प्रश्नांकित होत आहे. लोकतंत्रात्मक शासन पद्धती ही जबाबदार शासनपद्धती असल्याने तिच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले तरी चालेल अशी भूमिका गेल्या पाच दशकात कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या समर्थनार्थ मांडली गेली. त्या भूमिकेच्या मर्यादा आपण अनुभवतो आहोत. अर्थात दुसऱ्या बाजूला शासकीय नियंत्रण कुठेच असू नये अशी भूमिका मांडली जाते. या दोन्ही भूमिका गेल्या 5 दशकात अटीतटीने मांडल्या गेल्या. मेंढा गावाचा प्रयोग हा या वादातील सुवर्णमध्य मानता येईल का ? संसाधनांचे नियंत्रण हे शासनाने करावे की खाजगी क्षेत्राने करावे या आजतागायत चाललेल्या वादाला, 'संसाधनांचे संरक्षण व संवर्धन स्थानिक जनतेनेच करावे' हा पर्याय मेंढा गावानी दिला आहे. तो चिंतनीय असून या प्रयोगात उदंड सुप्त क्षमता आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

## संदर्भ सूची


1. Agrawal Arun. 2000. "Group Size and Successful Collective Action: Forest Management Institutions in Nine Himalayan Villages. "In People and Forests: Communities, Institutions, and Governance, ed. Clark Gibson, Margaret McKean, and Elinor Ostrom. MIT Press, Cambridge, M.A.

2. Burman,Roy B.K. 1985. "Issues in Environmental Management Centering Forest, Role of Tribal Communities. "South Asian Anthropologist6(1):41-48.

3. Elwin, Verrier. 1994. The Aboriginals. Oxford University Press, London.

4. Gadgil, M. and Fikret Berkers. 1991. "Traditional Resource Management Systems." Resource Management and Optimization, 8(3-4):127

5. Gadgil, M. and M.D. Subhash Chandra. 1992. "Sacred Groves." Indian International Centre Quarterly, 19(1-2): 183-87

6. Gadgil, M.and R. Guha. 1992. This Fissured Land: An Ecological History of India. Oxford University Press, New Delhi, India.

7. Gadgil, M. 1998. "Conservation: Where are the People?" In The Hindu Survey of Environment 1998, ed. Ravi, The Hindu, Chennai Edition, India, p. 107-137.

8. Ghate, Rucha. 1992. Forest policy and Tribal Development. Concept Publising Company, New Delhi, India.

9. Ghate, Rucha. 2000. 'The Role of Autonomy in Self-Organizing Process: A Case Study of Local Forest Management in India', Working paper, Bloomington: Indiana University, workshop in Political Theory and Policy Analysis.

10. Gibson Clark, Margaret McKean, and Elinor Ostrom, Eds. 2000. People and Forests: Communities, Institutions, and Governance. MIT Press, Cambridge, MA.

11. Government Of India, Ministry of Home Affairs. 1982. Report on Committee on Forests and Tribals in India.

12. Haeuber, Richard. 1993. "Development and Deforestation: Indian Forestry and

Perspective". The Journal of Developing Areas 27: 485-514.

13. Leach, M.R. Mearns, and I. Scooners. 1999. "Environmental Entitlements: Dynamics and Institutions in Community-Based Natural Resource Management." World Developement 27(2):225-47.

14. McGinnis, Michael and Elinor Ostrom. 1996. "Design Principles for Local and Global Commons." In Oran R. Young, Ed. The International Political Economy and International Institutions, Vol. II Edward Elgar, Cheltemham, UK.

15. McKean, Margaret A. 2000. "Common Property: What is It Good For, and What Makes it Work?"In Clark Gibson, Margaret McKean, and Elinor Ostrom, ed. People and Forests: communities, Institutions, and Governance. MIT Press, Cambridge, M.A.

16. Ostrom, Elinor. 1990. Governing the Commons. Cambridge University Press, Cambridge.

17. Poffenberge, M. and B. McGean, eds. 1996. Village Voices, Forest Choices: Joint Forest Management in India. Oxform University Press, Delhi.

18. Ravindranath, M.H.,P. Sudha, and K.M. Indu. 1998. "Participatory Forestry Indian Experience in Community Forestry and JFM." working Paper. Center for Ecological Sciences, Indian Institute of Science, Banglore.

19. Richards, M. 1997. "Common Property Resources Institutions and Forest Management in Latin America" Development and Change 28(1):95-117

20. Sarin, M. 1995. "Joint Forest Management in India: Achievements and Unaddressed Challenges." Unasylva 180, Vol. 46(1):30-36.

21. Wunsch, James S 1999. "Institutional Analysis and Decentralization: Developing Analytical Framework for Effective Third World Administrative Reforms." In Polycentric Governance and Development, Reading from the Workshop in Political Theory and Policy Analysis, ed. Michael D. McGinnis. University of Michigan Press, Ann Arbor.

● ● ●

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**प्रकाशन पाचवे व सहावे**

**मूल्य व वितरण(भाग 1 आणि 2) लेखक :ग. प्र. पिंपरकर**

बी.ए . आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ

या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरुपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200/- आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल.

पुस्तकाच्या प्रतींसाठी वितरकांकडे मागणी करावी. कार्यवाहांकडेही मिळेल .

वितरक : अनमोल प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे 43 002

**सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह - खजिनदार

# अर्थ शब्दांची वाट पाहे

● शि. ना. माने, सातारा
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.*

**Securitization :**

" भारतातील बँका व वित्तीय संस्था यांच्याकडे रु. 83 हजार कोटी बुडित कर्ज (खरे तर पडिक/पडीत मत्ता) असून हे कर्ज नसून ही लूट आहे", असे उद्‌गार वित्तमंत्री जसवंत सिंग यांनी नुकतेच काढल्याने ते काहींच्या टीकेचे तर काहींच्या टिंगलीचे लक्ष्य ठरले. वस्तुस्थिती ही आहे की मागील अत्यधिक कर्जाच्या स्वरुपातील पापाचे प्रायश्चित्त आज घ्यावे लागत आहे. येथे पडिक मत्तांच्या (non-performing assets) तपशीलात जाण्याचे कारण नाही. तरीही securitization संकल्पनेच्या संदर्भात त्यांचा येथे उल्लेख करण्याचा एक हेतु आहे. तो म्हणजे securitization च्या संदर्भात पडीत मत्तांविरोधी वैधानिक तरतुदींचा जून 2002 पर्यंतचा अभाव होय.

ही पोकळी भरुन काढण्याच्या हेतुने The securitization reconstruction of Financial Assets and Enforcement of security Interest (June 2002) हा अध्यादेश काढण्यात आला. निदान पुढील काळात पडीत मत्तांवर अंकुश ठेवण्याच्या हेतुने त्या अध्यादेशात तरतूद करण्यात आली आहे. ऋणकोंच्या मत्ता ताब्यात घेणे, त्यांची विक्री करणे, त्यांच्या कंपन्यांचे व्यवस्थापन स्वतःकडे घेणे व त्या भाडेपट्ट्याने देवून रोकड रक्कम वसूल करण्याचे धनकोंना अधिकार देण्यात आले आहेत. त्याचेच दुसरे नाव आहे Securitization. त्या संज्ञेचा अर्थ पुढे दिला आहे. Securitization : " conversion of an asset, especially loan into marketable securities typically for the purpose of raising cash by selling them to other investors." (खास करुन रोकड पैसा उभा करण्याच्या हेतुने दुसऱ्या गुंतवणूकदारांना रोखे विकून मत्तेचे विशेषतः कर्जाचे पणनयोग्य रोख्यांतील रुपांतरण).

अध्यादेशातील तरतुदी व सेक्युरिटायझेशन संकल्पनेचा अर्थ देण्याचा हेतु असा की मराठी पर्याय निवडण्याच्या भूमिकेतून सेक्युरिटायझेशनची प्रक्रिया जास्त स्पष्ट व्हावी. मूळ शब्द security. अर्थ - सुरक्षा, प्रतिभूती, कर्जरोखा, रोखा इत्यादी. यापैकी पहिले दोन अर्थ येथे जास्त पर्याप्त वाटतात. पैकी 'सुरक्षा' चा अर्थ सरळ व उघड आहे. 'प्रतिभूति' मध्ये लिखित प्रतिज्ञा (pledge), हमी (guarantee), दायित्व (obiligation) ध्वनित

होतात. म्हणून सुरक्षाभूतीकरण व प्रतिभूतीकरण हे दोन पर्याय अधिकच्या चर्चेसाठी सुचवू इच्छितो. या दोन पर्यायांत रोख्याची पणनयोग्यता (marketability) गृहीत धरली आहे. त्याशिवाय प्रतिभूतीकरण (किंवा उपरिनिर्दिष्ट अध्यादेश) निरर्थक आहे.

**Animal Spirits :**

अल्पाक्षरता व सारगर्भता ही परिभाषेची दोन प्रमुख प्रमाणके मानली जातात. उदाहरणार्थ, animal husbandry (पशुसंवर्धन), परंतु काही शब्दांच्या वाच्यार्थाऐवजी भावार्थ विचारात घ्यावा लागतो. Animal Spirits हा असाच एक शब्द आहे. जे. एम. केन्स यांनी त्या शब्दाचा उल्लेख त्यांच्या द जनरल थिअरीत (1973, प्रक.12, पृ. 161,162) केला आहे. त्याच्या मराठी पर्यायाकडे वळण्यापूर्वी त्याचा संदर्भ ध्यानात घेणे जरुर आहे. तीव्र मंदीकडून तेजी कडे वाटचाल करण्याच्या संदर्भात केन्स यांनी या शब्दाचा तीन ठिकाणी उल्लेख केला आहे. केन्स म्हणतात की दुर्दैवाने तीव्र मंदी ( slump) व मंदी (depression) यांच्या प्रमाणाचे केवळ अतिशयोक्तीकरण केले जाते असे नाही, तर आर्थिक भरभराट राजकीय व सामाजिक वातावरणावर अतिरिक्तपणे अवलंबून असते. प्रदीर्घ काळात सुट्टचामुळे ज्याप्रमाणे अस्थिरता निर्माण होते, त्याप्रमाणे मानवी स्वभाव वैशिष्ट्याने ती निर्माण होते. आपले अधिकतर निश्चित (positive) व्यवहार गणितीय अपेक्षेपेक्षा ''सहजस्फूर्त आशावादावर'' ( spontaneous optimism) अवलंबून असतात. animal spirits च्या संदर्भातील केन्स यांच्या तपशीलातील चर्चेचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल:

आपण एखादी निश्चित गोष्ट करण्याचा निर्णय घेतो. निष्क्रियतेपेक्षा क्रियेची सहजस्फूर्त प्रचोदना ( urge), असे त्या निर्णयांचे स्वरुप असते. त्याचेच दुसरे नाव ॲनिमल स्पिरिट्स. दोन संख्यांचा गणितीय गुणाकार किंवा अनेक संख्यांची भारित (weighted) सरासरी असे त्यांचे स्वरुप नसते. जर ॲनिमल स्पिरिट्स अंधुक (धूसर) झाले आणि सहजस्फूर्त आशावाद कचकला (खंडित झाला), तर साहसी उपक्रम ( enterprise) सुकेल व मरेल.

सद्यस्थितीत याविषयी भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात स्पष्टीकरण करताना काही आर्थिक पंडितांचा असा दावा आहे की 1994-97 मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाने सरासरी 7.5 टक्क्याचे शिखर गाठले. रुपयाचा मूल्यऱ्हास व 25 टक्के पातळीवरील संपूरक बचत दर, ही त्याची काही कारणे आहेतच. परंतु प्रमुख कारण म्हणून 'आशियायी वाघ' होण्याचा भारतीय उपक्रमींच्या सहजस्फूर्त आशावादाचा उल्लेख करावयाला हवा. आणि या प्रकारच्या तेजीची प्रचोदना किंवा प्रेरणा भौतिक तृष्णा/ भूक होती, आध्यात्मिक गरज नव्हे.

केन्स यांच्या प्रतिपादनाच्या आधाराने ॲनिमल स्पिरिट्समध्ये सूचित होणाऱ्या अर्थाबरोबरच त्या शब्दाचा कोशातील अर्थ पाहाणे आवश्यक आहे. animal spirits-(pl.) natural exuberance (सहजस्फूर्त किंवा नैसर्गिक विलास, विपुलता). animism-the theory that the human beings are driven by physical appetites rather than spiritual needs (मानवी व्यक्ती आध्यात्मिक गरजांपेक्षा भौतिक तृष्णांनी किंवा भूकांनी चलित / कार्यप्रेरित होतात असा सिद्धांत). शेअर बाजारातील चक्रीय चढ उतार (मंदी-तेजी-मंदी) त्याचाच प्रमुख परिणाम नव्हे काय ? प्रश्न आहे खाजगी फायदा व सार्वजनिक हित यांच्या अभिसरणाचा (convergence). अमर्त्य सेन यांच्या सारख्या एखाद्या अर्थशास्त्रज्ञाचा अपवाद वगळल्यास, केन्स यांच्या नंतरच्या जवळजवळ पाच दशकांत त्या अभिसरणाच्या दिशेने प्रतिमानाची मांडणी होवू शकली नाही, आणि झाली असली तरी ते प्रतिमान

वास्तवाच्या कसोटीवर उतरणारे होते, असे म्हणता येत नाही. 'मानवी चेहरा' ( human face) सहजस्फूर्त प्रचोदनाला परिपूर्ण पर्याय देवू शकला नाही. स्वतः सेन मान्य करतात त्याप्रमाणे सिद्धांतनाच्या दृष्टीकोनातून '' सार्वत्रिकीकृत नैतिकता'' ( universalised morality) स्वहितवादाला परिपूर्ण पर्याय देवू शकली नाही.

आता पर्यंतच्या चर्चेच्या आधाराने पुढील मराठी पर्याय सुचवू इच्छितो :

उपजत / सहजस्फूर्त } भौतिक तृष्णा, प्रचोदना, विलास, आवेग

●●●

## पाश्चात्त्य अर्थशास्त्रज्ञांची मराठीतील नावे.

| | |
|---|---|
| 1. Allais, Maurice | अले मॉरिस |
| 2. Bagehot, W | बेझट |
| 3. Bawerk Bohm | बॅवेर्क बॉह्म |
| 4. Hahn, F.H. | हान |
| 5. Kalecki, M | कॅलेस्की |
| 6. Kornai Janos | कोर्नाय यॅनो |
| 7. Leijonhufvud A. | लिऑनफवूड |
| 8. Leontief W. | लिऑनटिएव्ह |
| 9. Machlup, Fritz | माकलूप फ्रिट्झ |
| 10. Marschak J. | मारशॅक |
| 11. Mirrlees J.A. | मिरलीज |
| 12. Myrdal G. | मिरडाल |
| 13. Ohlin B | ओलीन |
| 14. Pareto V | पैरेटो |
| 15. Papandreou A.G. | पापांद्र्यू |
| 16. Pasinetti Luige | पॅसिनेट्टी लुइजी |
| 17. Queney | कने |
| 18. Schumpeter J | शुंपीटर |
| 19. Walras L | वॉलरा |
| 20. Wicksell | विकसेल |

**नी.वि.सोवनी**

भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

# भारताचा विदेशी चलन निधी- एक टिपण

● सी. पं. खेर, पुणे
*अर्थशास्त्राचे अभ्यासक*

**भा**रताचा विदेशी चलन निधी गेल्या दहा वर्षात सतत वाढत गेला आहे. रिझर्व्ह बँकेचे डेप्यूटी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांच्या शब्दात सांगायचे तर व्यथेपासून स्वास्थापर्यंत[1] नेणारा हा काळ होता. व्यथा अशी की डिसेंबर 1990 मध्ये केवळ तीन आठवड्याची आयात करण्यापुरता वि.च. निधी होता. इतकेच नव्हे, तर परदेशी कर्जावरील व्याज आणि हप्ता चुकवला जाऊ नये आणि मानहानी टळावी, भारताच्या विश्वासार्हतेला तडा जाऊ नये म्हणून 47 टन सोने गहाण टाकावे लागले व सहा महिन्यात परत खरेदी करण्याचा पर्याय ठेवून 20 टन सोने विकले गेले.[2] अशा डळमळित अवस्थेतून आज आपण चांगलेच डोके वर काढले आहे. हा निधी मार्च 1990 अखेरील 3.96 अब्ज डॉलरवरुन जून 2002 अखेर 58.04 अब्ज डॉलरवर ( म्हणजे 62.52 अब्ज रुपयावरुन 2836.52 अब्ज रुपयांपर्यंत) येऊन ठेपला आहे.[3] आता वि.च. निधी गुंतवणुकीसाठी वापरला जात नसल्याने तसाच पडून राहणार की काय, डोईजड होणार की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे. या निधीबद्दलचे कुतुहल चाळविले गेले आहे. तेव्हा याबद्दलचे विवेचन या टिपणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

2. आयातीचे देणे फेडण्यासाठी, विदेशी कर्जावरील व्याज व हप्ता देण्यासाठी विदेशी चलन विनिमय दरातील चढउतार मर्यादित ठेवण्यासाठी, विदेशीयांचे तसेच अनिवासी भारतीयांचे भारतीय कंपन्यामधील रोख्यांचे व्यवहार (खरेदी-विक्री) तसेच भांडवल खात्यावरील ओघ सांभाळण्यासाठी, शिवाय पेट्रोलियम पदार्थांचे-तेलाचे- अकस्मात वाढणारे भाव, परदेशातील वित्तीय अरिष्टांचे आघात अशासारख्या होणाऱ्या समस्यांपासून बचाव करण्यासाठी, सावधगिरीचे उपाय म्हणून रिझर्व बँक वि.च. साठा बाळगीत असते. यात सोने, आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडील (स्पेशल ड्रॉइंग राइटस्) विशेष आहरण अधिकार व विदेशी चलन (मत्ता) यांचा समावेश असतो. पैशाच्या पुरवठ्यास (चलनाला) आधार म्हणून त्याचा उपयोग होतो. (तक्ता क्रं. 1 (i)अ(ii) व तक्ता क्र. 2 पाहा)[4]

3. वस्तु आणि मालाच्या निर्यात-आयातीतून (निव्वळ देणी) सेवांच्या व्यवहारातून

(येणी)भारताला विदेशी चलनात निव्वळ देणी द्यावी लागत आहेत. विदेशी चलनाच्या व्यवहारातील ताळेबंदातील चालू खात्यात ती निर्देशित होतात. भांडवल खात्यात विदेशी गुंतवणूक (प्रत्यक्ष व भारतातील कंपन्यांच्या रोख्यातून) विदेशी अर्थसहाय्य, अनिवासी भारतीयांच्या ठेवी इत्यादींचा समावेश होतो. चालू खाते आणि भांडवलखाते मिळून, खाजगी, सरकारी आणि बँकिंग क्षेत्रे मिळून विदेशी चलन (डॉलर्स) जमा होत आलेले आहे. (तक्ता क्र. 3 पहा). यातून ठराविक दलालामार्फत (मुख्यत: बँका) विदेशी चलन खरेदी करते. रिझर्व्ह बँकेचा खुल्या बाजारातील खरेदी विक्रीचा व्यवहार असे यास संबोधिले जाते. देशाचे विदेशी आर्थिक व्यवहार सुरळीत चालण्यासाठी विदेशी चलन विनिमय दरातील चढउतार नियंत्रित राखण्यासाठी रिझर्व बँका विदेशी चलनाची (विदेशी चलन निधीतून) विक्री व खरेदी करीत असते. विदेशी चलन निधी काही प्रमाणात, परदेशातून गुंतविला जातो. त्यावर रिझर्व बँकेला व्याज मिळते. ते विदेशी चलन निधीत जमा होते. विदेशी अर्थसहाय्यही या निधीत जमा केले जाते. यामुळे रिझर्व बँकेकडील विदेशी चलन निधी वाढत राहिला आहे.

4. 1990-91 मधील अरिष्ट परिस्थिती पाहता वि.च. निधीतील वाढीचे एकीकडे समाधान करण्याजोगी परिस्थिती आहे तर दुसरीकडे त्यातून गुंतवणूक करण्यास वाव मिळत नसल्याने, तो अतिरिक्त व अनुत्पादक ठरत आहे याची चिंता आहे. यातून वि.च. निधीचे योग्य प्रमाण कोणते, ते ठरविण्याचे निकष कोणते असा प्रश्न उद्‌भवतो.

हे उघड आहे की आयातीचे देणे फेडण्याइतका निधी जवळ असावा. तो दिलासा देणारा, निश्चिंत ठेवणारा असावा. सामान्यपणे किमान तीन ते चार महिन्यापर्यंत आयातीचे देणे फेडण्याइतका असावा.[5] डिसेंबर 1990 अखेर तो तीन आठवडे पुरेल इतका धोकादायक पातळीवर होता हे मागे आले आहे. त्यातून डोके वर काढून, सुधारत मार्च 1997 अखेर साडेसहा महिने पुरेल, तर मार्च 2002 अखेर 11.3 महिन्यांचे आयातीचे देणे फेडण्यासाठी पुरेल इतका वाढला.[6] म्हणजे आयात निर्यातीतील तूट भरुन काढणारा होता.

परदेशातून जी कर्जे उभी केली जातात ती वार्षिक हप्त्याने फेडावी लागतात. त्यावरचे व्याज द्यावे लागते. हे बंधनकारक असते. अशी अल्प मुदतीची देणी फेडण्याइतका अधिक वि.च. निधी जवळ बाळगणे जरुरीचे ठरते. मार्च 1991 अखेर अल्पमुदतीच्या कर्जांचे वि.च. निधीशी 146.5 टक्के प्रमाण होते ते मार्च 2002 अखेर 5.1 टक्के राहिले. तसेच व्याजाच्या देण्याचे चालू आवकाशी मार्च 1991 अखेर 15.5 टक्के असलेले प्रमाण मार्च 2002 अखेर 5.4 टक्क्या इतके घटले. वि.च. निधीतील वाढ समाधानकारक असल्याचे हे निदर्शक आहे.

भारतात विदेशी गुंतवणूक होत आहे. यात प्रत्यक्ष कारखाना उभा करण्यासाठी, त्याचा विस्तार करण्यासाठी गुंतवणूक व शेअर बाजारात रोखे खरेदी करण्यासाठी, रोख्यातून केलेली गुंतवणूक उपयोगी पडते. रोख्यातील गुंतवणुकीत, त्यांची किंमतीनुसार खरेदी विक्री नित्य होत राहिल्याने, सतत बदल होत असतात. एकूण विदेशी गुंतवणुकीशी रोख्यातील गुंतवणुकीचे प्रमाण 1990-91 मध्ये 5.8 टक्के होते ते मार्च 2002 अखेर 58.4 टक्के एवढे वाढले आहे. ही गुंतवणूक केव्हाही काढून (रोखे विक्रीस काढून) घेता येते, असे व्यवहार सांभाळण्यासाठीही वि.च. निधी बाळगावा लागतो. रोख्यातील गुंतवणुकीत जिला चंचल, अस्थिर म्हणता येईल अशा गुंतवणुकीचे प्रमाण घटत राहिले आहे. अस्थिर गुंतवणूक व अल्पमुदतीची कर्जे मिळून मार्च 1996 अखेरीचे 71.1 टक्के प्रमाण मार्च 2002 अखेर

48.1 टक्क्यावर येऊन ठेपले होते. हे पाहता वि.च. निधी त्याकरिता देखील पुरेसा राहिला होता.[7]

विदेशी मालाच्या (उ. पेट्रोल) किंमतीत, विदेशी चलन-विनिमय दरात, कर्जांच्या परतफेडीच्या हप्त्यांच्या कालावधीत देशाच्या संरक्षणाच्या परिस्थितीत बदल होत राहतात. या अनपेक्षित, अकस्मात होणाऱ्या बदलांना तोंड देण्याइतका वि.च. निधी जवळ असायला हवा. अमेरिकन फेडरल रिझर्व्ह सिस्टिमचे अध्यक्ष ॲलन ग्रीनस्पॅन यांनी यास ''रोखतेची जोखीम'' (लिक्विडिटी अँड रिस्क) असे यास संबोधिले आहे.[8] वि.च. इतका हवा की ही जोखीम सांभाळता यायला हवी. म्हणजे वि.च. निधीचे प्रमाण पारंपरिक विचारानुसार नुसते आयातीचे देणे फेडण्याइतके न राखता, विदेशी व्यवहारांची एकंदर उलाढाल, ते कशा प्रकारचे आहेत हे पाहून, रोखतेच्या जोखिमेची दखल घेऊन, बाह्य व्यवहारांचे धोके व धक्के पचविण्याइतके जवळ राखावयास हवे असा याचा अर्थ होतो.

5. जगभर मंदीचे सावट आहे. त्यामुळे उद्योग, व्यापार वाढविण्यास कुठे उत्साह आढळत नाही. भारत यास अपवाद नाही. हे रिझर्व्ह बँकेच्या घटत्या पत पुरवठयावरुन अजमावता येते. व्यापारी क्षेत्रास (सरकारला केलेला पतपुरवठा वगळून) दिलेल्या पत पुरवठयाचे प्रमाण जून 2000 मधील 9.9 टक्क्यावरुन जून 2002 अखेर ते 3.1 टक्क्यावर आले होते.[9] यामुळे भाववाढीचे प्रमाण अल्प राहिले आहे. मागणीचे, गुंतवणुकीचे प्रमाण घटले आहे.

व्याजाचा दर कमी केल्याने गुंतवणुकीस चालना मिळेल अशा अपेक्षा आहे. पण नफ्याबद्दलची आशा, मनोवृत्ती खचलेली असल्याने ही अपेक्षा कितपत लगेच सफल होईल याबद्दल शंका वाटते.

याकरिता आयात शुल्क कमी करावे, कामगार कायद्यात आवश्यक बदल करावेत, निर्यातीस व अन्य देशातून गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन द्यावे. थोडक्यात 1991 पासून सुरु केलेल्या आर्थिक सुधारणांना गती द्यावी अशी सूचना केल्या जात आहेत. त्यांचा सकारात्मकपणे विचार व्हावयास हवा.

**तक्ता क्र. 1 (i)**

**विदेशी चलन निधी (जून अखेर, कोटी रुपयात)**

| वर्ष | आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडील वि.आ.अ | सोने | विदेशी चलन | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1998 | 344 | 12826 | 101830 | 115001 |
| 1999 | 1 | 11732 | 132505 | 144238 |
| 2000 | 38 | 13173 | 150901 | 164112 |
| 2001 | 20 | 13163 | 191226 | 204409 |
| 2002 | 47 | 16272 | 267333 | 283652 |

### (ii)सोने व विदेशी चलन रिझर्व्ह बँकेने कसे बाळगले ?

| | 1998 | 1999 | 2000 | 2001 | 2002 |
|---|---|---|---|---|---|
| (अ) सोने | | | | | |
| (1) प्रचालन खाते | 10475 | 9584 | 10761 | 10753 | 13293 |
| (2) ताळेबंदातील अन्य मत्तेत समाविष्ट | 2351 | 2148 | 2412 | 2410 | 2979 |
| एकूण | 12826 | 11732 | 13173 | 13163 | 16272 |
| (ब) विदेशी चलन | | | | | |
| (1) प्रचालन खाते | 50,700 | 67,700 | 86,700 | 1,06,700 | 1,69,000 |
| (2) बँकिंग खाते विदेशात बाळगलेले | 36,241 | 41,194 | 32,372 | 84,392 | 98,168 |
| (3) गुंतवणूक या सदरात समाविष्ट | 14,889 | 23,611 | 31,829 | 134 | 165 |
| एकूण | 1,01,830 | 1,32,505 | 1,50,901 | 1,91,226 | 2,67,333 |

स्रोत : रिझर्व्ह बँकेचे वार्षिक अहवाल 1998-1999, 1999-2000, 2000-2001, 2001-2002

**तक्ता क्र. 2**

**राखीव पैशाचा आधार (जून अखेर, कोटी रुपयात)**

| | 1999 | 2000 | 2001 | 2002 |
|---|---|---|---|---|
| (1) सोने धरुन निव्वळ विदेशी चलन | 143537 | 164056 | 204362 | 283248 |
| | (53.3) | (59.7) | (65.1) | (86.0) |
| (2) अन्य | 115682 | 110459 | 109442 | 45794 |
| | (44.7) | (40.3) | (34.9) | (14.0) |
| एकूण | 259219 | 274515 | 313804 | 329042 |
| | (100.0) | (100.0) | (100.0) | (100.0) |
| या आधारावर | | | | |
| (अ) परिचलनातील चलन | 191446 | 205755 | 231728 | 265529 |
| (ब) रिझर्व्ह बँकेकडील ठेवी | 67773 | 68760 | 82076 | 63513 |
| एकूण | 259219 | 274515 | 313804 | 329042 |

स्रोत : रिझर्व्ह, बँक बुलेटिन, ऑक्टोबर 1999 (पृ.S 983),S 984 नोव्हेंबर 2000, (पृ.S 1081) S 1080, ऑक्टोबर 2001 (पृ.S 995) S 994, सप्टेंबर 2002 (पृ.S 776)S 775

टीप : कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात

1. रिझर्व्ह बँकेचा देशांतर्गत पतपुरवठा, 2. सरकारची लोकांना द्यावयाची चलन-दायित्वे, यात वजा

3. भांडवल खात्यावरील व 4. अन्य रकमा.

तक्ता क्र.3

भारताची विदेशी देणी येणी व निव्वळ जमा (कोटी डॉलर मध्ये, मार्च अखेर)

| | 1998-99 | 1999-2000 | 2000-2001 | 2001-2002 |
|---|---|---|---|---|
| (1) चालू खाते (आयात निर्यात, सेवारुप व्यवहार, हस्तांतरण, प्राप्ती). | (-) 404 | (-) 470 | (-) 258 | (+) 135 |
| (2) भांडवल खाते (प्रत्यक्ष व रोख्यातून विदेशी गुंतवणुक, विदेशी अर्थसाहाय्य, व्यापार कर्जे, अनिवासी भारतीयांच्या ठेवी, कर्जा वरील व्याज व हप्ता, इ.) | 843 | 1044 | 902 | 955 |
| एकूण 1+2 | 439 | 574 | 644 | 1090 |
| 3. चूक भूल | (-) 17 | 66 | (-) 58 | 86 |
| एकूण जमा | 422 | 640 | 586 | 1176 |
| यातून रिझर्व्ह बँकेने केलेली निव्वळ खरेदी | 184 | 325 | 236 | 706 |

स्रोत : रिझर्व्ह बँकेचे वार्षिक अहवाल

## टीपा

1. रिझर्व्ह बँकेचे बुलेटिन, जून 2002, पृ. 433

2. खेर (1999), पृ. 67

3. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (2001), पृ.217 व तक्ता क्र.1

4. या दोन तक्त्यात नमूद केलेल्या रकमेत फरक आढळतो. तक्ता क्र. 2 मधील रक्कम निव्वळ रक्कम आहे. त्यामुळे हा फरक असू शकेल.

5. तारापोर समितीने (1997) सहा महिन्याचे आयातीचे देणे फिटू शकेल इतका निधी जवळ असावा असे म्हटले आहे.

6. रिझर्व बँकेचा वार्षिक अहवाल, (जून 2002) पृ. 114,116.

7. उपरोक्त पृ. 115

8. रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल , 2001, पृ. 117

9. तक्ता क्र. 2 (ii) अन्य या संख्येत ते समाविष्ट आहे.

## संदर्भ सूची


1. Hand book of Statistics on Indian Economy (2001), Reserve Bank of India.
2. खेर सी. पं. (1999), आर्थिक सुधारणांचे नवे पर्व, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
3. Reddy Y.V. (2002), India's Foreign Exchange Reserves : Policy, Status and Issues, RBI Bulletin June 2002.


●●●

ग्रंथ परीक्षण

# जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव

**खेर, सी. पं. (2002)**

जागतिकीकरण-समस्या, आशय आणि अनुभव,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे. पृष्ठे 136, किंमत रु. 120 /-

● **रमाकांत पितळे, नागपूर**
*माजी सहसचिव, भारत सरकार*

**जा**गतिकीकरण हा शब्द गेल्या 10 वर्षात प्रचलीत झाला आहे. त्याचा नेमका अर्थ स्पष्ट करण्याचा श्री.सी.प.खेर यांनी प्रयत्न केला आहे

प्रथम जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची ऐतिहासिक पार्श्वभूमी देवून जागतिकीकरणाची आजची स्थिती या मुद्दयांचा त्यांनी आढावा घेतला आहे. तंत्रज्ञानाची वाढ व विस्तार झाल्याने समन्वय कसा प्रस्थापित होतो व त्या योगे आर्थिक विकास हा बाजारपेठ व स्पर्धेच्या माध्यमातून कसा होतो हे स्पष्ट केले आहे. बाजारपेठ व स्पर्धा हे जागतिकीकरणाचे दोन आधारस्तंभ आहेत ते एकमेकांना पूरक होवून जलद आर्थिक विकास कसा होतो हे लेखकाने विशद केले आहे. तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सुरुवातीस केलेले योगदान देखील लक्षात घेतले आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नफा प्राप्त करुन अविकसित व विकसनशील राष्ट्रांची आर्थिक पिळवणूक कशी केली या बाबतचे विस्तृत विवेचन लेखकाने केले आहे. याचबरोबर अमेरिका, युरोपियन राष्ट्रे, व विश्व बँक या सारख्या तत्सम संस्थांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया विकसनशील राष्ट्रात रुजण्याकरिता आजच्या आर्थिक मदतीच्या अटींच्या माध्यमातून सुरु केली. मुख्य भर हा आर्थिक निर्बंध कमी करुन खुल्या व्यापाराला प्रोत्साहन देण्याचे आहे.

अर्थात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळण्याकरिता आन्तरराष्ट्रीय संस्था आवश्यक होती. ती संस्था कशी प्रस्थापित झाली याची माहिती पुस्तकात आढळते. गॅट या संस्थेतून जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization) निर्माण झाली आणि त्या माध्यमाने खुल्या व्यापाराचे धोरण कसे कार्यान्वित केले जाते हे लेखकाने स्पष्ट केले आहे. हे करीत असतांना गॅट व जागतिक व्यापार संघटना यातील फरक व त्यामुळे जा.व्या.सं. च्या विरुद्ध होत असलेल्या टिकेचे अधिक विश्लेषण होणे आवश्यक आहे .

गॅट मध्ये फक्त आयात-निर्यात वस्तुंचा समावेश होता तर जागतिक व्यापार संघटनेत वस्तु बरोबर सेवा व विशेषत: बौद्धिक स्वामित्व हक्का चा समावेश करण्यात आला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वस्तु व्यतिरिक्त सेवांच्या व्यापारावर व वापरावर निर्बंध नव्हते व त्याचा फायदा विकसनशील राष्ट्रे घेत

होती. विकसित राष्ट्रे यावर नियंत्रण ठेवू शकत नव्हती म्हणून जागतिक व्यापार संघटना प्रस्थापित होण्याच्या अगोदर (1 जानेवारी 1995) जवळ जवळ एक दशक पर्यंत विकसित राष्ट्रे गॅटमध्ये सेवांचा समावेश झाला पाहिजे असा आग्रह धरुन दबाव आणत होते. त्यांना यश प्राप्त होऊन जागतिक व्यापार संघटना प्रस्थापित झाली. जागतिक व्यापार संघटना प्रस्थापित होण्याची वाट न पाहता विकसित राष्ट्रांनी आपले व्यापार गट स्थापन करावयास सुरुवात केली. या प्रक्रियेमुळे विकसित राष्ट्रांना दोन तऱ्हेने फायदा झाला. यातील व्यापार गटामुळे व्यापार व उत्पन्नात वाढ झाली व जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून, सेवांवर नियंत्रण आणून विकसनशील देशांवरील आपली आर्थिक पकड वाढविली व त्यांना होणारे फायदे कमी केले.

जागतिक व्यापार संघटनेचा जागतिक व्यापारावर व विशेषत: विकसनशील राष्ट्रांच्या व्यापारावर होणारा परिणाम लेखकाने चांगल्या प्रकारे विशद केला आहे. विकसनशील देशांतील उत्पादनावर व व्यापारावर जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमाने विकसित देश कोणते अडथळे आणतात या बाबतची मांडणी लेखकाने केली आहे. कृषी उत्पादन व व्यापार यावर होणारा परिणाम व त्यातील संभाव्य धोके देखील महत्वाचे आहेत.

जागतिक व्यापार संघटनेची तक्रार निवारण योजना कशी कुचकामाची आहे हे देखील उदाहरणे देवून लेखकाने स्पष्ट केले आहे. जागतिक व्यापार संघटना व भारताचा दृष्टिकोन या संदर्भात ज्या विशेष समित्या नेमल्या होत्या त्यांचे सविस्तर वर्णन स्वतंत्र प्रकरणात केले असते तर अधिक उपयुक्त झाले असते. कारण, वाचक भारतातील जागतिक व्यापार संघटने चे सकारात्मक व नकारात्मक परिणाम निरनिराळ्या क्षेत्रात कोणते झाले व कोणते होण्याची शक्यता आहे हे जाणण्यासाठी जास्त उत्सुक आहेत. जागतिक व्यापार संघटना भारताला अन्न उत्पादन व वितरणावरील अर्थसहाय्य काढुन टाकण्याचा आग्रह करीत आहेत, परंतु युरोपियन राष्ट्रांना कृषि क्षेत्रासाठी देण्यात येणाऱ्या $ 300 बिलीयन अर्थसहाय्या विषयी मात्र काही बोलत नाही. अशा प्रश्नांची चर्चा पुस्तकात हवी होती. अर्थशास्त्राचे विद्यार्थी, राजकीय लोक, राज्यकर्ते व सर्वसाधारण वाचक जागतिकीकरणावरील पुस्तकांत अशा विश्लेषणाची नक्कीच अपेक्षा करतील. आन्तरराष्ट्रीय स्पर्धेमुळे विकसनशील देशातील पोलाद उद्योग हा उत्पादन व्यय कमी करुन (भारतासहित) अमेरिकेला निर्यात वाढवत असल्याने अमेरिकन उद्योग अडचणीत सापडला आहे. आता अमेरिका आयातीवर निर्बंध घालीत आहे हे जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणाविरुद्ध आहे. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

स्वदेशीच्या मर्यादा हा फार महत्वाचा मुद्दा आहे. स्वदेशीकरण हे आयातीवर निर्बंध लादून व स्वदेशी उद्योगांना संरक्षण देवून कितपत साध्य करता येईल व ते आर्थिक दृष्ट्या योग्य ठरेल काय हे तपासावे लागेल. स्वदेशीचे उत्पादन कार्यक्षमतेच्या मद्द्यावर झाले पाहिजे. स्वदेशी उद्योगांची क्षमता वाढीवता येईल व जागतिकीकरणापासून होणारा लाभ प्राप्त करता येईल. स्वदेशी उत्पादनासंबंधित मुख्य अडचण ही बाजारपेठेची व वस्तुविक्रीची आहे. ह्या दोन गोष्टी जोपर्यंत होणार नाहीत तोपर्यंत स्वदेशी उत्पादनाला चालना मिळणार नाही. वस्तुची गुणवत्ता वाढविणे व त्यासाठी बाजारपेठ मिळविणे, स्वदेशीच्या उत्थानासाठी आवश्यक आहे.

जागतिकीकरण व बेकारी या बाबतचे विश्लेषण लेखकाने योग्यरित्या केले आहे. बेरोजगारी ही विकसनशील देशातील मुख्य समस्या आहे. पूंजीवादी, साम्यवादी, समाजवादी अर्थव्यवस्था बेरोजगारीची समस्या पूर्णपणे सोडवू शकत नाहीत. जागतिकीकरणामुळे उत्पादन व गुंतवणूक वाढली

तर रोजगार वाढू शकतो. परंतु जागतिकीकरणामुळे बरेचसे अस्तित्वात असलेले उद्योग धंदे बंद पडतात व त्यामुळे बेकारी वाढते. परंतु उत्पादन प्रक्रियेत वाढ झाली की इतर ठिकाणी रोजगार वाढतो. त्यामुळे दरम्यानच्या काळात बेकारी वाढतेच व त्यामुळे जागतिकीकरणाला मजूर संघटनांकडून विरोध होतो. कमी वेतन व वाढती लोकसंख्या यामुळे हा प्रश्न अधिकच गंभीर होतो. तसेच यांत्रिकीकरणामुळे बेरोजगारीची समस्या अधिकच तीव्र होते व त्यामुळे आर्थिक व सामाजिक तणावाचे वातावरण निर्माण होते. भारताच्या बेरोजगारीचा प्रश्न जागतिकीकरणाशी संबंधित नाही. जागतिकीकरणाच्या अगोदर देखील बेकारीची समस्या भारतात होती व आहे . जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे सरकारी गुंतवणूक कमी होत गेली. सार्वजनिक क्षेत्राच्या उद्योगातील अपगुंतवणूक धोरणामुळे रोजगारावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे स्थित्यंतराच्या काळात बेरोजगारी कमी करण्या करिता व रोजगारी वाढविण्याकरिता वेगळा निधी उभारुन व कामगारांना प्रशिक्षण देवून त्यांना नवीन उद्योगातील रोजगारासाठी तयार केले पाहिजे. जागतिकीकरणामुळेच बेकारी निर्माण होते हे म्हणणे बरोबर नाही.

लेखकाने एका महत्वाच्या मुद्याचे विश्लेषण केले आहे आणि ते म्हणजे भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून बाहेर पडावे कां? विकसित देशात सुद्धा जागतिकीकरणाचे विपरीत परिणाम(बेरोजगारी व स्वदेशी उद्योग बंद होणे) दिसून आल्यामुळे तेथील लोकांनी सिॲटल येथे जागतिक व्यापार संघटनेच्या बैठकी विरुद्ध निदर्शने केली. कृषी क्षेत्राला दिले जाणारे अर्थसहाय्य काढून घ्यावे या जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणाला विकसित व विकसनशील देशातून विरोध होत आहे. जा. व्या.सं. च्या कृषी समझोत्याच्या पुर्नर्लेखनासाठी मांडलेले प्रस्ताव लेखकाने प्रभावीपणे प्रस्तुत केले आहेत. अर्थशास्त्राच्या विद्यार्थांना व राजकीय पुढाऱ्यांना ते फार उपयोगी आहेत. भारताने घेतलेली भूमिका जा.व्या.सं. तून बाहेर पडण्यासाठी नाही तर जा.व्या.सं. राहून आवश्यक ते बदल करण्याची आहे. नवीन विषय जा.व्या.सं. मध्ये अंतर्भूत करण्यास भारताचा व विकसनशील राष्ट्रांचा विरोध आहे. जागतिक व्यापार संघटनेने 1995 साली आखलेले कार्य प्रथम पूर्ण करायचे व नंतर नवीन विषय जा.व्या.सं. मध्ये समाविष्ट करावयाचे ही भूमिका भारताने घेतली आहे. जा.व्या.सं.तून बाहेर पडण्याचा प्रश्नच नाही. जगाच्या बरोबरीनेच भारताला पावले टाकावे लागतील. जा.व्या.सं. च्या प्रतिकूल कलमांना विरोध करतांना व फायदे ही प्राप्त करुन घेणे हीच भारताची भूमिका असली पाहिजे.

जा.व्या.स. च्या मंत्रिपरिषदेची चौथी बैठक दोहा येथे नोव्हेंबर 2002 मध्ये झाली. विकसित देशांच्या दृष्टिने काही नवीन विषय या परिषदेत प्रस्तुत करण्यात आले. ते विषय म्हणजे 1. श्रम विषयक मानक (standard) 2. गुंतवणुकीसंबंधात खुलेपणा. 3. स्पर्धेसंबंधीचे व्यापक धोरण. त्यामुळे शेवटी ठरले की सविस्तर अभ्यास करुन 2003 च्या पुढील बैठकीत अहवाल सादर करावा व त्यावर सर्वांच्या सहमतीने निर्णय घेण्यात यावा. या दरम्यान मिळणाऱ्या वेळात भारताने पूर्ण तयारी करुन परिषदेत आपले प्रस्ताव सादर केले पाहिजेत.

लेखकाने जागोजागी आकडेवारी व तक्ते देवून विश्लेषणाला पुष्टी दिली आहे. तसेच परिशिष्ट देवून आवश्यक स्पष्टीकरण केले आहे. संदर्भ ग्रंथाच्या विस्तृत सूचीमुळे पुस्तकाची उपयोगिता वाढली आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी जितके उपयोगी आहेत तितकेच ते संशोधकांना व धोरण आखणाऱ्यांना देखील उपयुक्त होउ शकेल.

● ● ●

# विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद वृतान्त

● आर. जी. टाले, नागपूर

विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेचे २६ वे वार्षिक अधिवेशन अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात कै.ना.अ. देशमुख महाविद्यालय चांदूर बाजार, जि.-अमरावती येथे दि. 23 आणि 24 मार्च 2002 रोजी आयोजित करण्यात आले. परिषदेचे उद्‌घाटन सी.पी. अॅण्ड बेरार महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कृष्णराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, वसुधाताई देशमुख,(राज्यमंत्री, सां.बां. व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य ) यांच्या हस्ते, नानासाहेब देशमुख (अध्यक्ष पिपल्स वेलफेअर सोसा. अमरावती), के. एम. कुलकर्णी,(सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग, प्राचार्य सु. ना. देशमुख, श्री. वि. खांदेवाले, दि.व्य. जहागिरदार, विनायक देशपांडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या प्रसंगी उद्‌घाटनपर भाषणात वसुधाताई देशमुख यांनी आवाहन केले की सर्व अर्थशास्त्रज्ञानी शेतकऱ्याच्या प्रश्नांचा अभ्यास करुन त्यांना कशाप्रकारे दिलासा देता येईल याविषयी संशोधन करावे. तसेच वेळोवेळी त्यांच्या समस्यांचा शासनाकडे पाठपुरावा करावा. तर के.एम. कुलकर्णी, सहसंचालक, उच्चशिक्षण अमरावती विभाग यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या संख्येतील वाढीवर भर देण्यापेक्षा त्यांचा गुणात्मक दर्जा कसा वाढविता येईल यावर भर द्यावा असे त्यानी सूचविले. याप्रसंगी नानासाहेब देशमुख, श्रीनिवास खांदेवाले यांनी मार्गदर्शन केले. के.ई. पाटील यांनी ''जागतिकीकरणाचे समाजावर होणारे परिणाम'' या विषयावर आपले अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे संचालन प्रफुल्ल राऊत यांनी केले तर आभार वनिता चौरे यांनी मानले.

परिषदेचे पहिले सत्र '' भांडवल बाजाराचे बदलते स्वरुप'' या विषयावर विनायक देशपांडे, अर्थशास्त्र विभाग नागपूर विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या विषयावर आ.बा. निनावे, गजवे, हुद्दा, मृणालिनी फडणवीस, शेरेकर, यांनी शोधनिबंध सादर केलेत. तर पुष्पा तायडे, पाटील, पाटणकर यांनी चर्चेत सहभाग घेतला. या चर्चासत्राअंतर्गत भारतातील भांडवल बाजाराचे स्वरुप, भांडवल बाजाराची आवश्यकता, भांडवल

बाजाराचे प्रमुख घटक, भांडवल बाजाराचे उपबाजार आणि भांडवल बाजाराच्या प्रमुख समस्या आणि त्यातून सुटका इत्यादी मुद्दांवर प्रकाश टाकण्यात आला.

परिषदेचे दुसरे सत्र 'मुद्रास्फितीचे सिद्धांत' या विषयावर दि. व्यं. जहागिरदार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. ह्यात मुक्ता जहागिरदार, अे.के. वितोंडे, सी. एम. देशमुख, एच. एन. कटरे, विनायक देशपांडे, बिडवाईक, पुष्पा तायडे यांनी शोधनिबंध सादर केलेत. तर तलांडे, आर. जी. टाले, पाठक, शेरेकर, फुलझेले यांनी चर्चेत भाग घेतला.

दि. 24 मार्च 2002 ला नानेकर व पिंपरकर स्मृती व्याख्यान झाले. या व्याख्यान मालेसाठी यंदा तारक काटे कृषीतज्ञ यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी ह्याप्रसंगी शेतीच्या उत्तम विकासाकरिता सेंद्रिय खताची आवश्यकता व त्याचे फायदे आणि तोटे या संदर्भात अत्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्राचे अध्यक्षपद कमलाकर हनवंते यांनी भूषविले. ''विदर्भातील जिल्हानिहाय शैक्षणिक विकास'' या विषयावर प्राचार्य देशपांडे, अमरावती, तायडे, हनवंते यांनी शोधनिबंध सादर केलेत तर ह्या विषयावर झालेल्या चर्चेत प्राध्यापकांनी उस्फूर्त भाग घेतला. अनेकांनी विदर्भातील प्रत्येक जिल्हयाचा शैक्षणिक आढावा, उच्चशिक्षणाची स्थिती, उच्च शिक्षणाचा अनुशेष, उच्च शिक्षणातील विद्यार्थी-विद्यार्थीनींचे यशापयश, पालकांचे दरडोई सरासरी उत्पन्न व उच्च शिक्षणावरील प्रती विद्यार्थी खर्च, इत्यादीमुद्दांवर चर्चा केली.

तिसऱ्या सत्राच्या समाप्तीनंतर 27 व्या वार्षिक अधिवेशनासाठी एन.एफ. सुदा, केशरबाई लाहोरी महाविद्यालय, अमरावती यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

27व्या वार्षिक अधिवेशनासाठी पुढील विषय ठरविण्यात आले.

1. जागतिकीकरणातील स्पर्धेचे स्वरुप.
2. भारताच्या विदेशी व्यापाराचे बदलते स्वरुप.
3. विदर्भातील जिल्हानिहाय कृषीआधारित उद्योगांची शक्यता आणि धोरणांची आवश्यकता.

हे अधिवेशन नागपूर विद्यापीठांतर्गत 2003 मध्ये घेण्यात येईल.

परिषदेचा समारोप के.ई. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि व्हि. एन. देशमुख, अधिष्ठाता समाजविज्ञान शाखा, अमरावती विद्यापीठ, अमरावती व मिलींद चिमोटे, सदस्य व्यवस्थापन परिषद अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. शेवटी पषिदेचे सचिव आर. जी. टाले यांनी परिषदेच्या वतीने उपस्थितांचे व कै. ना. अ. देशमुख महाविद्यालयातील, संस्थाप्रमुख, प्राचार्य प्राध्यापक व सर्व कर्मचारी यांचे आभार मानले.

परिषदेच्या यशस्वीतेकरिता श्रीनिवास खांदेवाले, आर. वाय. माहोरे, अंभोरे, विजय कांत, फडणविस, विनायक देशपांडे इत्यादींनी बहुमोल मार्गदर्शन केले.


26 वे अधिवेशन घेण्याकरिता कै.ना. अ. देशमुख महाविद्यालय चांदूर बाजार यांनी बहुमोल सहकार्य दिले . याबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब देशमुख, सु.ना. देशमुख, वनिता चोरे स्थानिक सचिव तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची परिषद ऋणी आहे.

●●●


# दृष्टीक्षेपात भारत

● **अरुणा सोनेगावकर**
*व्ही. एम. व्ही. आणि जे.एम.टी. महाविद्यालय नागपूर.*

**भारत आणि उर्वरित जग**




### जागतिक पर्यटक




भारताचा हिस्सा 0.40 %

क्रयशक्ति =क्रयशक्ति समता

### जागतिक विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक





भारताचा हिस्सा 0.35 %


मिश्र उत्पत्ति =मिश्र घरगुती उत्पत्ति

## भारत आणि चीन


### जगाच्या लोकसंख्येची टक्केवारी





### येणारे प्रवासी दशलक्ष / वर्ष





### जागतिक व्यापाराशी टक्केवारी





### जागतिक उत्पत्तीशी टक्केवारी



जागतिक घरगुती
उत्पन्नाशी टक्केवारी




2001 मध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा ओघ
अमेरिकन महापद्म (bn) $




लोकसत्ता संघटनेच्या अभ्यासानुसार भारतातील राज्यकारभाराचा खर्च दररोज रु. 1800 कोटी आहे. अदमासे केंद्रात संसदेचे 795 खासदार आणि 35 राज्यांमधील 4210 आमदार केन्द्र आणि राज्य सरकारांचा कारभार चालवितात. शासनातील 18.7 दशलक्ष कर्मचाऱ्यांपैकी 2 दशलक्ष कर्मचारी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये काम करतात.खाजगी संघटित क्षेत्रामध्ये 8 दशलक्ष कर्मचारी आणि 353 दशलक्ष कर्मचारी असंघटित क्षेत्रात काम करतात. अशा रीतीने भारताची 380 दशलक्ष किंव38 कोटी प्रजा ही कामकरी प्रजा आहे.

भारतातील संघटित क्षेत्रातील मानवी भांडवल हे गुणवत्ता आणि व्ययाच्या संदर्भात बाजारानुरुप कार्य करीत नसल्यामुळे नासधूस आणि बराच अधिक व्यय होत असून भारत वस्तू आणि सेवांचे बाबतीत देशीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये स्पर्धा करु शकत नाही.

● ● ●

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**अर्थमीमांसा–वैज्ञानिक की कलात्मक ?**

**नी.वि. सोवनी**

**किंमत रु. 250(सूट 10 टक्के)**

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

**मिळण्याचे ठिकाण**

**डॉ. व्यं.सु. पाटणकर, फ्लॅट क्र.1, कपिल अपार्टमेंट्स**

**सर्व्हे क्र.29,तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे - 43 029**

# मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या हिशेबा संबंधी निवेदन

● सर्जेराव ठोंबरे

*कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद*

परळी वैजनाथ, जि. बीड येथे दि. 18 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5.00 वाजता झालेल्या सर्वसाधारण सभेत, विषय क्रमांक : 4 परिषदेच्या 2001-2002 या वर्षाच्या हिशेबास मंजूरी देणे. या बाबत हिशेबातील काही उणिवा सदस्यांना कळविण्याचे ठरले होते.

या प्रमाणे लेखा परीक्षक आनंद करवंदे, सोलापूर यांनी 2002-03 वर्षासाठी नेमलेले लेखा परीक्षक लोटके आर.एम. यांना केलेला खुलासा व दुरुस्त्या येथे देत आहोत.

Following corrections are to be made in the item of investment.

1. The F.D. no 668405 of SBI is matured which comprises of Rs. 8,000/- as principal amount and Rs. 3,488 /- as interest, The total amount of Rs. 11,488 is shown by us as interest.

2. The F.D. receipt no. 541062 is matured and shown in the interest account.

3. H.D.F.C. deposit receipt no. 28950 is renewed with interest in the last year for Rs. 35,463/-. The interest of Rs. 10,463/- as interest is not shown.

4. SBI Dadar Br, F.D.R. no. 515247 of Rs. 10,000/- got matured and interest of Rs. 6,667/- is received. The total amount of Rs. 16,647/- was shown as interest of the current year.

After making necessary adjustments the Investment amount of Rs. 9,77,470/- will appear as under.

| Particulars | | Amt. Rs. |
|---|---|---|
| Amount of Investment shown | | 9,90,007 |
| Less : Adjustment explained above | | |
| 1. F.D.R. on 668405 | 8000 | |
| 2. F.D.R. on 541062 | 5000 | |
| 3. F.D.R. on 515247 | 10000 | 23,000 |
| | | 9,67,007 |
| Add : Interest on H.D.F.C. to be included in F.D. | | 10,463 |
| As per records | | 9,77,470 |

These corrections may be noted in current year account and be rectified accordingly .

**ANAND KARVANDE**

CHARTERED ACCOUNTANT

# अव्वल दर्जाचा भारतीय अर्थशास्त्रज्ञ ब्रह्मानंद : भावपूर्ण श्रद्धांजली

● विनायक श्रीधर देशपांडे

*प्रमुख संपादक, अर्थसंवाद*

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ पी.आर. ब्रह्मानंद यांचे बेंगलूर येथे 23 जानेवारी 2003 रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 77 वर्षे होते. मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात ब्रह्मानंद मौद्रिक अर्थशास्त्र या विषयाचे पहिले प्राध्यापक होते. तत्त्ववेत्ता आणि व्यावसायिक विश्लेषक म्हणून त्यांची ख्याती होती. विकासाचे अर्थशास्त्र, आर्थिक नियोजन, पैसा, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र आणि आर्थिक विश्लेषणाचा इतिहास या क्षेत्रातील त्यांचे लिखाण विशेष उल्लेखनीय आहे. विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी आधुनिक काळात अभिमत संप्रदाय अर्थशास्त्राची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न ब्रह्मानंदांनी केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील त्यांच्या कार्याची दखल वेळोवेळी घेण्यात आली. त्यांचे 30 पेक्षा अधिक ग्रंथ आणि 600 लेख प्रकाशित झाले आहेत. 1977 साली मद्रास येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्षपद ब्रह्मानंद यांनी भूषविले होते. श्रमिक अर्थशास्त्र संस्थेचे देखील ते अध्यक्ष होते. इंडियन इकॉनॉमिक जर्नलचे ते सुरुवातीपासून व्यवस्थापकीय संपादक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली 40 विद्यार्थ्यांना आचार्य पदवी संपादन करण्याचे भाग्य लाभले.

ब्रह्मानंद यांच्या लेखन विषयांची व्याप्ती बरीच मोठी असली तरी पैसा, आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही त्यांच्या निरंतर अभ्यासाची आणि संशोधनाची क्षेत्रे राहिली. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे ब्रह्मानंद आद्य टीकाकार होते. अवजड उद्योगांना प्राधान्य देणे चुकीचे असून, वेतन वस्तू प्रतिमान हे भारताच्या विकासासाठी कसे समर्पक ठरु शकेल हे ब्रह्मानंद यांनी दाखविले. 1950 च्या दरम्यान मांडण्यात

आलेले वकील-ब्रह्मानंद वेतन-वस्तू प्रतिमान बरेच गाजले. समाजाच्या सर्वसाधारण स्तरातील कुटुंबवत्सल व्यक्ति त्याच्या रोजगाराचा मोठा हिस्सा दैनंदिन गरजेच्या ज्या वस्तूंच्या खरेदीवर खर्ची घालते त्या वस्तूंच्या निर्मितीस सरकारने अग्रक्रम द्यावयास हवा हा या प्रतिमानाचा गाभा. 19व्या शतकातील भारतात पैसा, उत्पन्न आणि किंमती हा त्यांचा ग्रंथ 2001 साली प्रसिद्ध झाला. मिल्टन फ्रिडमन आणि श्वार्ट्झ यांचा आदर्श समोर ठेवून ब्रह्मानंदांनी या पुस्तकाची मांडणी केली. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात 20व्या शतकातील पैसा, उत्पन्न आणि किंमतींचे विश्लेषण करण्याची त्यांची योजना होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे त्यांना या प्रकल्पासाठी अनुदान प्राप्त झाले होते.

विकसनशील देशांसमोरील सर्वांगीण विकासाचे आव्हान हा ब्रह्मानंद यांच्या चिरंतन चिंतनाचा विषय होता. ब्रह्मानंद यांनी सारे आयुष्यच अर्थशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनात व्यतीत केले. आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. बेंगलूर येथील इंस्टिट्यूट फॉर सोशल चेंज या संस्थेत ते निमंत्रित प्राध्यापक या पदावर कार्यरत होते. अव्वल दर्जाचा भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून ख्याती प्राप्त झालेल्या ब्रह्मानंद यांच्या आकस्मिक निधनाने अर्थशास्त्राच्या क्षेत्रात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे ब्रह्मानंद यांच्या स्मृतीला विनम्र अ।भवादन.

● ● ●

## श्रद्धांजली

दि. 25 ऑक्टोबर, 2002, रोजी **आ.ल. गुजर** (सातारा) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक दुःखद निधन झाले. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयातून 1999 मध्ये ते निवृत्त झाले. एक मनमिळावू, निगर्वी व वक्तशीर प्राध्यापक म्हणून ते परिचित होते. 1984 मध्ये ते मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा आप्तपरिवार आहे. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

**शि. ना. माने**

भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद